**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**गडचिरोली जिल्ह्यात झालेले आदिवासी सामुहिक विवाह सोहळ्यात सोन्यांच्या मंगळसूत्राऐवजी पितळेची मंगळसूत्रे देण्यात आल्याबाबत**

**(१) * ४१९७४ डॉ. निलम गोऱ्हे , श्री. अरविंद सावंत , श्री. सुरेश जेथलिया , श्री. गोपीकिसन बाजोरिया , श्री.परशुराम उपरकर , श्री. विनोद तावडे , श्री. जगदीश गुप्ता , श्री.केशवराव मानकर , श्री. मधुकर चव्हाण , श्री. नितीन गडकरी , श्री. प्रकाश शेंडगे , श्री. गुरुमुख जगवानी , श्री.सय्यद जामा , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्रीमती अलका देसाई , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान , श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील , श्री सुभाष चव्हाण :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे जानेवारी, २००८ ते दिनांक ३१ मे, २००८ या कालावधीच्या सुमारास राज्य शासनाच्या विविध यंत्रणामार्फत राबविण्यात आलेल्या मागासवर्गीयांच्या सामुहिक विवाह सोहळा योजनेमध्ये सुमारे ६५० नववधूंना सोन्याच्या मंगळसूत्राऐवजी पितळेची अथवा त्यावर सोन्याचा मुलामा लावलेली अशी मंगळसूत्रे दिल्याच्या घटना घडल्या, तसचे या सामुहिक विवाह सोहळ्याच्या वेळी नवविवाहितांना देण्यात आलेल्या संसारोपयोगी वस्तू निकृष्ट दर्जाच्या असून घोषित केल्यापेक्षा कमी भांडी देण्यात आल्याच्या घटना घडल्या व त्यात गडचिरोली जिल्ह्यातील जास्त घटना आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्याचा जिल्हानिहाय तपशील काय आहे,

(३) तद्नुसार, याबाबत नवविवाहितांना शासनाच्या योजनेनुसार मदत देण्याबाबत व याप्रकरणी दोषी आढळलेल्या व्यक्तींविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा येत आहे ?

**डॉ. विजयकुमार गावित** : (१) राज्यात माहे जानेवारी, २००८ ते ३१ मे, २००८ या कालावधीत आदिवीस विकास विभागामार्फत ४६८७ पात्र जोडप्यांचे विवाह झालेले आहेत.

गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी तालुक्यातील वांगेपल्ली येथे दि. ३०.३.२००८ रोजी झालेल्या विवाह सोहळ्यात सोन्याच्या मंगळसुत्राऐवजी पितळेची अथवा त्यावर सोन्याचा मुलामा लावलेली मंगळसुत्रे व कमी किंमतीच्या संसारापयोगी वस्तु दिल्याच्या घटना घडल्याची तक्रार झालेली आहे. उर्वरित विवाह सोहळयामध्ये गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(२) या प्रकरणी चौकशी करण्यात आली असून गडचिरोली जिल्ह्यात गैरप्रकार झालेला आहे. उर्वरित ठिकाणी तक्रारी नसल्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) तक्रारकर्त्या नववधूची मंगळसूत्रे संबंधित प्रकल्प अधिकारी यांनी बदलून दिलेली आहेत. तसेच प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अहेरी यांना या प्रकरणी जबाबदार धरुन निलंबित करण्यात आले असून त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत आहे.

..२..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41974...............

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, वारंवार आदिवासी समाजातील लोकांना, शेतकऱ्यांना शासनातर्फे ज्या वस्तू दिल्या जातात, त्याबाबत त्यांच्या ज्या अपेक्षा असतील किंवा त्या वस्तू ज्या कामासाठी उपयोगी असतील त्यापेक्षा कमी दर्जाच्या वस्तू दिल्या जातात. मंगळसुत्रासारखा पवित्र समजल्या जाणाऱ्या दागिन्याबाबत भ्रष्टाचार करणारी मोठी यंत्रणा कार्यरत आहे. ज्या जिल्हा यंत्रणेकडे जबाबदारी सोपविली होती त्यांच्याकडून वाटप केल्या जाणाऱ्या वस्तू योग्य दर्जाच्या आहेत की नाही याची तपासणी केली जात होती काय? पूर्वी देण्यात आलेली सुवर्ण पदके खोटी निघाली होती, आता मंगळसूत्रे खोटी निघाली आहेत. हा गैरप्रकार निदर्शनास आल्यानंतर संबंधित अधिकारी श्री.सुधाकर बोबडे यांच्यावर काय कारवाई केली? वस्तू म्हणून शासनातर्फे जी भांडीकुंडी दिली जातात त्यांचे स्वरुप काय आहे? प्रत्यक्षात भांडीकुंडी न देता कागदोपत्री दिली गेल्याचे दाखविले जाते हे खरे आहे काय?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, कन्यादान नावाची योजना आदिवासी विकास विभागामार्फत राबविली जाते. या योजनेंतर्गत 10 हजार रुपये संबंधित लाभार्थ्यांना दिले जातात. पूर्वी 6 हजार रुपयांचे 22 कॅरेटचे एक मंगळसूत्र व 4 हजार रुपयांची भांडी दिली जात होती. या भांड्यांमध्ये स्टोव्ह, पातेले, तवा, पेला, वाट्या वगैरे दैनंदिन जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेले साहित्य दिले जात होते. भांड्यांबाबत अद्याप तक्रार आलेली नाही. परंतु वांगेपल्ली या गावामध्ये 32 सामुहिक विवाह झाले, त्यावेळी जे मंगळसूत्र दिले गेले त्याच्या पावतीमध्ये 6 हजार रुपये किंमतीचे 4.3 ग्रॅम सोन्याचे वजन असल्याचे नमूद केले होते. प्रत्यक्षात मोजणी केली असता सोन्याचे वजन 1.6 ग्रॅम असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर संबंधित ज्वेलर्सला ती मंगळसूत्रे बदलून देण्यास सांगितल्यानंतर त्यांनी ती बदलून दिली. परंतु याबाबत ज्या प्रकल्प अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले, त्यांना जबाबदार धरुन निलंबित केलेले आहे.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, मी माननीय मंत्रीमहोदयांना धन्यवाद देतो. त्यांनी तातडीने प्रकल्प अधिकाऱ्यांना निलंबित केले, त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई सुरु केली आहे. ज्या लाभार्थ्यांना मंगळसूत्र दिले गेले ते पितळेचे असून त्यावर सोन्याचा मुलामा चढविल्याचे आढळून आले आहे. शासन त्या लाभार्थ्यांना खऱ्या सोन्याचे मंगळसूत्र देणार आहे का? असे मंगळसूत्र शासनाच्या तिजोरीतून दिले जाईल की, संबंधित ज्वेलर्सकडून दिले जाईल?

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41974..............

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, हा गैरप्रकार लक्षात आल्यानंतर तातडीने महाकाली ज्वेलर्स यांच्याकडून 6 हजार रुपयांचे मंगळसूत्र बदलून देण्यात आले आहे.

(नंतर श्री.खर्चे......

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 41974........ डॉ. विजयकुमार गावित......

आणि यापुढील काळात या योजनेतून आपण भांडीकुंडी व सोन्याचे मंगळसूत्र देत होतो त्याऐवजी वधु-वर अशा दोघांच्या नावाने 10 हजार रुपयाचा धनादेश देण्याचा निर्णय आज घेण्यात येईल. तसेच जी मंगळसूत्रे या जोडप्यांना दिली होती ती बदलून दिलेली आहेत.

श्रीमती मंदा म्हात्रे : महोदय, शासनाच्या वतीने आदिवासींसाठी अनेक योजना राबविल्या जातात. त्यातीलच ही एक महत्वाची योजना आहे. या योजनेच्या माध्यमातून आदिवासींच्या भावना विचारात घेऊन मंगळसूत्र देण्यात येते. या योजनेत आदिवासी वधुंना पितळेचे मंगळसूत्र दिलेले आहे. आताच माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे की, या योजनेच्या माध्यमातून दोघांच्या नावाने 10 हजार रुपयाचा चेक देण्यात येईल. त्याबद्दल माननीय मंत्री महोदयांना मी धन्यवाद देते. तसेच यासंबंधीचा ताबडतोब निर्णय घेऊन जबाबदार अधिकाऱ्याला निलंबित केले आहे. म्हणून यापुढील काळात या आदिवासी जोडप्यांना 10 हजार रुपयाचा चेक दिला तर बरे होईल. कारण सध्याच्या योजनेतून जी भांडीकुंडी त्यांना देण्यात येते ती हलक्या प्रतीची व स्वस्त दराची असतात व भाव मात्र पूर्ण दाखविला जातो, अशी दुरुस्ती शासन करणार काय ?

डॉ. विजयकुमार गावित : महोदय, कन्यादान योजनेमार्फत आदिवासी जोडप्यांना 10 हजार रुपयाचा चेक देण्याचा निर्णय आजच घेण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : महोदय, या योजनेच्या माध्यमातून सोन्याचा भाव 6 हजार रुपये तोळा असताना एक तोळ्याचे मंगळसूत्र दिले जात होते परंतु आता सोन्याचे भाव वाढल्यामुळे त्या रकमेत बसत असलेल्या सोन्याचे मंगळसूत्र दिले जाते. माझी अशी सूचना आहे की, सर्व गोष्टींचे भाव वाढलेले असल्यामुळे या रकमेत सुध्दा वाढ करण्याची गरज आहे. कारण आपण देखील आदिवासी भागात काम करतात म्हणून यासंबंधीची माहिती आपल्याला आहेच. म्हणून या आदिवासींना जो 10 हजार रुपयाचा चेक देण्याचा निर्णय धेतला तो चेक वटविण्यासाठी त्याला शहरात जाऊन 200 रुपयाचे बँक खाते दोघांच्या नावाने उघडावे लागणार. म्हणून या योजनेचे पुनर्विलोकन करुन अधिक सुटसुटीत कशी बनविता येईल यासंबंधी शासन विचार करणार काय ? आदिवासींसारख्या संवेदनशील भागात जे अधिकारी अपहार करतात त्यांना अधिक शिक्षा कशी होईल यासाठी सुध्दा तरतूद करण्याचा शासनाचा विचार आहे काय ?

.......2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41974......

डॉ. विजयकुमार गावित : आदिवासी भागात अपहार करणाऱ्या अधिकाऱ्याविरुध्द ॲट्रॉसिटी कायद्याअंतर्गत केस दाखल करण्याची तरतूद आहे. तसेच सध्या ज्या पध्दतीने अपहार केला असेल ती कलमे आपण लावत असतो. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही प्रयत्न जरुर करु. सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्यानुसार 10 हजार रुपये या रकमेत वाढ करण्याच्या दृष्टीनेही पाठपुरावा करण्याचे आमचे प्रयत्न राहतील.

श्री. रामनाथ मोते : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देत असताना मान्य केले की, जानेवारी, 2008 ते 31 मे, 2008 या काळात 4687 विवाह आदिवासी भागात संपन्न झाले. ही तक्रार गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी तालुक्यातून आलेली असल्यामुळे आपण त्या प्रकरणापुरती कारवाई केली आहे. परंतु इतर ठिकाणी सुध्दा अशी प्रकरणी सर्रास घडतात. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, तक्रारी आल्या नसल्या तरी असे प्रकार जे सर्रास चालू आहेत त्या उर्वरित प्रकरणांमध्ये आदिवासींची व मागासवर्गीयांची दिशाभूल होत असते. अशा प्रकरणांची आपण शासनाच्या स्तरावर चौकशी करणार काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, ज्यांची फसवणूक होत असते त्या प्रकरणांमध्ये अधिकाऱ्यांना केवळ निलंबित करुन चालणार नाही तर त्यांनी शासनाची देखील फसवणूक केलेली असते म्हणून अशा संबंधित व जबाबदार अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील काय ?

डॉ. विजयकुमार गावित : महोदय, प्रकल्प अधिकाऱ्यावर आपण फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे. त्याचबरोबर या प्रकल्पामध्ये एकूण 109 विवाह झाले त्यापैकी एकाच ठिकाणी हे प्रकरण घडले आणि त्यासंदर्भात वर्तमानपत्रातही बातमी आली होती, म्हणून त्याबाबत चौकशी केली आहे. पण ज्या ज्या ठिकाणच्या अशा तक्रारी येतील त्या त्या प्रकरणांमध्ये संपूर्ण चौकशी करुन आवश्यक कारवाई करण्यात येईल.

श्री. जयंत पाटील : माननीय मंत्री महोदयांनी फक्त प्रकल्प अधिकाऱ्यांवरच कारवाई केलेली आहे. परंतु ज्या ज्या टेबलवरुन फाईल सरकते त्या त्या क्लार्क आणि संबंधित अधिकाऱ्यांनाही निलंबित करणे आवश्यक आहे, कारण तेही त्यात सामील असतात. तसेच सर्व जबाबदार अधिकारी आणि ज्या सोनाराकडून ही मंगळसूत्रे खरेदी केली होती त्या दुकानदारावरही फौजदारी गुन्हा दाखल करणार काय ?

यानंतर श्री. जुन्नरे .......





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावीत : सभापती महोदय, सदर सोनारावर गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. प्रकल्प अधिकरी ही सर्व कामे पहात असतात त्यामुळे प्रकल्प अधिका-याला निलंबित करण्यात आलेले आहे.

--------------

**( ता.प्र.क्र. 45034 )**

**( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )**

-------------

...2

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पतसंस्थाकडील शेतकऱ्यांनी घेतलेली कर्जे**

**(३) * ४२३२७ श्री. दिवाकर रावते , डॉ. नीलम गोऱ्हे , श्री. गोपीकिसन बाजोरिया , श्री. सुरेश जेथलिया , श्री.परशुराम उपरकर , डॉ. एन. पी. हिराणी , श्री. जितेंद्र आव्हाड :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र व राज्य शासनाने शेतकऱ्यांची कर्ज माफी माफ केल्याने ज्या शेतकऱ्यांनी पतसंस्थांकडून कर्जे घेतली आहेत अशा पतसंस्थांचे हप्ते शेतकरी भरीत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सहकारी पतसंस्थांकडून शेतकऱ्यांना देण्यात आलेले कर्ज माफ करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय, असल्यास, केंद्र व राज्य शासनाने शेतकऱ्यांचे कर्ज माफ केल्याची घोषणा केल्याने शेतकऱ्यांना आपण घेतलेल्या सर्व पतसंस्थांकडील कर्ज माफ झाल्याच्या भावनेने शेतकरी सहकारी पतसंस्थांकडून घेतलेल्या कर्जाचे हप्ते भरीत नाहीत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र व राज्य शासनाने शेतकऱ्यांची कर्ज माफीची योजना जाहीर करण्यापूर्वी जिल्हा मध्यवर्ती बँकेमार्फत व राष्ट्रीयकृत बँकेमार्फत दिलेल्या कर्जाची शासनाने माहिती मागविली होती, परंतु नागरी सहकारी पतसंस्थांकडून घेतलेल्या कर्जाची माहिती मागविण्यात आली नव्हती, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकरी कर्जाचे हप्ते भरीत नसल्याने आता नागरी सहकारी पतसंस्थांनी शेतकऱ्यांवर कर्ज वसुलीच्या नोटीसा बजावून कायदेशीर कारवाई सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, शेतकऱ्यांनी कोणत्या वित्त संस्थेकडून घेतलेली कर्जे माफ करण्यात आली याबाबत राज्य शासनाने तसे जाहिर न केल्याने शेतकरी संभ्रमात पडला असल्याने कोणती कर्जे माफ झाली हे शासनाने जाहिर केलेले नाही ते जाहिर करण्यात आले नाही, हे खरे आहे काय ?

**श्री. जयप्रकाश दांडेगावकर,डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता**: (१) अंशत: खरे आहे.

(२) केंद्र शासनाकडून दि.२३.५.२००८ रोजी "कृषी कर्जमाफी व कर्ज परतफेड सवलत योजना-२००८" या योजनेच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सुचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेकडून शेतकऱ्यांना देण्यात आलेले कर्ज माफ करण्यात आलेले नाहीत.

(३) हे खरे नाही.

(४) कायदेशीर वसुलीसाठी प्रतिबंध नाही.

(५) नाही. तथापि शासन निर्णय २९.५.२००८ अन्वये केंद्रशासनाने जाहिर केलेल्या "कृषी कर्जमाफी व कर्ज परतफेड योजना-२००८" या योजनेची अंमलबजावणी व योजनेस प्रसिध्दी देणेबाबत निर्णय घेऊन सर्व संबंधीत कार्यालयाना कळविण्यात आलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...३

**ता.प्र.क्र. 42327....**

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, प्रश्न विचारण्याचा हेतू असा आहे की, आपण प्रश्न क्रमांक दोनच्या संदर्भात उत्तर दिलेले आहे की, "नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेकडून शेतक-यांना देण्यात आलेले कर्ज माफ करण्यात आलेले नाही." हे कर्ज माफ करण्याचे राज्यसरकारच्या विचाराधीन आहे काय ? शेतक-यांना दिलासा देण्याच्या संदर्भात आपण काय करणार आहात ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, कर्ज माफीची योजना ही केंद्रशासनाने लागू केलेली आहे. या योजनेमध्ये राष्ट्रीयकृत बँका, जिल्हा सहकारी बँका म्हणजे ज्यांच्यावर नाबार्ड आणि रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण आहे अशाच संस्थांची कर्जे माफ करण्यात आलेली आहेत. पतसंस्था नियंत्रणाखाली येत नसल्यामुळे याबाबत विचार करण्यात आलेला नाही. ज्या जिल्हयात कर्जमाफी झालेली नाही त्या जिल्हयात शासनाने 141 कोटी रुपये देण्याचे प्रस्तावित केलेले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : माननीय सभापती महोदय, महाराष्ट्रातील शेतक-यांच्या दृष्टीने हा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. कर्जमाफीची घोषणा झाल्यानंतर आम्ही यासंदर्भात अनेक वेळा प्रश्न उपस्थित केला होता तेव्हा माननीय सहकार मंत्री महोदयांनी पतसंस्थेचा सुध्दा यामध्ये उल्लेख आहे असे ठासून या सभागृहात सांगितले होते. माननीय सहकार मंत्रीमहोदयांनी सभागृहाची दिशाभूल केलेली आहे. कृषी कर्ज माफी व कर्ज परतफेड योजना 2008 ही ज्यावेळी आली त्यावेळी त्यामध्ये बिगर शेती पतसंस्थेचा उल्लेख नव्हता. या सभागृहाची दिशाभूल झालेली आहे. आम्ही अनेक वेळा मंत्रीमहोदयांना या सभागृहात सांगितले होते की, यामध्ये पतसंस्थेचा उल्लेख नाही त्यावेळी त्यांनी ठासून सांगितले होते की, पतसंस्थेचा उल्लेख नसेल तर तो मी घालून आणेन. तसेच आम्ही सांगितले होते की, 31 मार्च, 2007 ही तारीख आपण 31 डिसेंबर, 2007 करा त्यावेळी मंत्रीमहोदयांनी सांगितले होते की, यासंदर्भात देखील बैठकीत निर्णय झालेला आहे त्यामुळे या तारखेमध्ये सुध्दा बदल करुन आणेन असे आम्हाला उत्तर दिलेले आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे यांनी विचारल्या प्रमाणे शेतक-यांनी पतसंस्थेकडून जी कर्जे

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 42327.....

श्री. पांडुरंग फुंडकर.....

घेतलेली आहेत ती माफ करण्याच्या संदर्भात केंद्रसरकारकडे आग्रह धरणार आहात काय? प्रश्न क्रमांक 5 मध्ये विचारण्यात आलेले आहे की,शेतक-यांनी कोणत्या वित्त संस्थेकडून घेतलेली कर्जे माफ करण्यात आलेली आहेत याबाबत राज्य शासनाने तसे जाहीर न केल्याने शेतकरी संभ्रमात पडला आहे. त्यामुळे मला असे विचारावयाचे आहे की, कर्जमाफी व कर्ज परतफेड योजनेच्या संदर्भात शेतक-यांना काहीच माहिती नाही. कर्ज माफी व कर्ज परतफेड योजना 2008 याबाबतचे सर्क्युलर फक्त बँकाना गेलेले आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, माननीय मंत्रीमहोदयांनी सभागृहाची दिशाभूल केलेली आहे. पतसंस्थेचे कर्ज माफ करण्यासंबधी केंद्रसरकारकडे आपण प्रयत्न करणार आहात काय ? जितक्या सहकारी बँका आहेत त्यामध्ये अर्बन बँकाचा देखील उल्लेख आहे. त्यामुळे अर्बन बँक आणि नॅशनलाईज आणि जिल्हा सहकारी बँक यापैकी कोणकोणत्या बँकाचा कर्जमाफी व कर्ज परतफेड योजनेत समावेश करण्यात आलेला आहे?

यानंतर श्री. खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42327..

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे राष्ट्रीयकृत बॅन्का, ग्रामीण बॅन्का, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅन्का आणि अर्बन बॅन्का यांच्याकडून जो पत पुरवठा झालेला आहे आणि 31 मार्च 2007 रोजी जे थकबाकीदार होते व जी थकबाकी 29 फेब्रुवारी 2008 पर्यत वसूल झालेली नाही अशा सर्व सभासदांना कर्जमाफीचा तसेच ओ.टी.एस. चा फायदा मिळणार आहे. पत संस्थानी दिलेलेसुध्दा कर्ज माफ करण्यात यावे असे सन्माननीय सदस्य म्हणत असून ते वास्तव आहे. केन्द्र सरकारने केलेल्या पहिल्या वक्तव्यामध्ये " ऑल ॲग्रिकल्चर क्रेडिटस " असा शब्द वापरला होता. त्या शब्दाचा अर्थ काढून त्यावेळेला कदाचित माननीय मत्री महोदय सर्व कृषी कर्ज माफ करण्यात येईल असे बोलले असतील. परंतु त्या कर्जामध्ये लिफट इरिगेशनचे कर्ज आणि पत संस्थेतील कर्ज माफ झालेले नाही .....

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारतात )

**सभापती** : मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, शेतक-याच्या जिव्हाळाचा हा प्रश्न असल्यामुळे माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तर झाल्यानंतर एका वेळी एकाच सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांच्या मताशी शासनसुध्दा सहमत आहे. अजूनही जादा कर्जाला माफी मिळाली पाहिजे. परंतु कर्ज माफीचा हा पहिला फेज आहे . माननीय मंत्री महोदयांनी कदाचित तसा अर्थ काढून तसे बोलले असतील. राज्य शासनसुध्दा याबाबतीत प्रयत्न करीत आहे .....

**सभापती** : माननीय मंत्रिमहोदयांना मी सांगू इच्छितो की, सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी या प्रश्नाच्या माध्यमातून आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. अन्य सहकारी संस्थांनी शेतक-यांना कर्जे दिलेली आहेत त्या प्रमाणे पतसंस्थांनी देखील शेतक-यांना कर्जे दिलेली आहेत ती कर्जेसुध्दा माफ व्हावीत अशी शेतक-यांची आणि अनेक सन्माननीय सदस्यांची मागणी होती . ही मागणी राज्य शासनाला तत्वत: मान्य आहे असेही आपण सांगितलेले आहे. त्या अनुषंगाने राज्य शासनाने किती प्रयत्न केले आहेत आणि आणखी कोणते प्रयत्न गरजेचे आहे याबाबतीत खुलासा करावा.

2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42327

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी याबाबतीत नाबार्ड बरोबर बैठक घेतली होती. त्याचबरोबर त्यांनी माननीय पंतप्रधानांना आणि माननीय वित्त मंत्र्यांना पत्र दिले होते. त्याचबरोबर माननीय सहकार मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी भूविकास बॅन्काच्या कर्जाबाबत माननीय पंतप्रधानांना आणि वित्त मंत्र्यांना पत्र दिलेले आहे त्याचबरोबरुन मी सुध्दा माननीय केन्द्रीय कृषी मंत्री आणि कृषी सचिव तसेच वित्तीय मंत्र्यांना , त्यांचे सचिवांना असे पत्र दिले आहे की पत संस्था आणि भूविकास बॅन्का यांना या परव्हयूमध्ये आणावे. राज्य सरकारकडून अशा प्रकारचे पत्र दिले असून त्यासंबंधी पाठपुरावा करीत आहे आणि राज्य सरकारचीसुध्दा अशी भूमिका आहे की हे कर्ज माफ व्हावे आणि ते कर्ज माफ करण्यासाठी राज्य सरकार केन्द्र सरकारकडे पाठपुरावा करीत आहे.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, मला माननीय मंत्रिमहोदयांना एक स्पेसिफिक प्रश्न विचारावयाचा आहे. राज्य सरकार केन्द्र सरकारकडें याबाबतीत सतत पाठपुरावा करीत आहे परंतु पत संस्थांकडून ज्या शेतक-यांनी कर्ज घेतलेले आहे ते कर्जसुध्दा राज्य सरकार स्वत:च्या तिजोरीतून भरुन माफ करणार आहे काय ? या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी होय किंवा नाही एवढेच उत्तर द्यावे.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, कर्जमाफीची योजना ही केन्द्र सरकारची असल्यामुळे राज्य सरकार याबाबतीत केन्द्र सरकारकडेच पाठपुरावा करणार आहे

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या सभागृहात आपण चेअरवर असतांना सन्माननीय सहकार विभागाचे मंत्री माननीय डॉ..पतंगराव कदम यांनी असे सांगितले होते की केन्द्र सरकारने जर हे कर्ज माफ केले नाही तर राज्य सरकार स्वत:च्या तिजोरीतून आणि अर्थसंकल्पात यासाठी तरतूद करुन हे कर्ज माफ करील. परंतु आता वेगळे उत्तर देऊन या शेतक-यांची सरकार फसवणूक करीत आहे. यापूर्वी माननीय सहकार मंत्र्यांनी सभागृहात तसे उत्तर दिले होते दोन वर्षापूर्वी राज्यामध्ये पतसंस्थाकडून कर्ज वितरण होत नव्हते तेव्हा सहकार मंत्र्यानी असे सागितले होते की, अर्बन बॅन्का आणि पत संस्थांनी शेतक-यांना कर्जे दिली पाहिजेत. एखाद्या पतसंस्थेने जर शेतक-यांना कर्जे दिली नाही तर त्यांच्याविरुध्द कारवाई करु. या निमित्ताने मला माननीय मंत्रिमहोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की या पत संस्थांना कर्जे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही



VTG/ MMP/ SBT/ प्रथम श्री.जुन्नरे 10.15

देण्याच्या बाबतीत राज्य सरकारनेच भाग पाडलेले आहे म्हणूनवच राज्य सरकारने आपल्या अर्थसंकल्पातून त्यासाठी तरतूद करुन कर्ज माफी दिली पाहिजे.या निमित्ताने मला माननीय मंत्रिमहोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, राज्यातील किती पत संस्थांच्या माध्यमातून किती शेतक-यांना कर्जाचे वितरण झाले होते ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, राज्यामध्ये 679 पत संस्थांकडून 419 कोटी रुपयांच्या कर्जाचे वितरण झाले आहे . 2005 साली शासनाने जी.आर.काढूला होता की शेतीसाठी नवीन जादा कर्ज उपलब्ध होण्याच्या दृष्टीने पत सस्थांनी कर्ज उपलब्ध करुन द्यावेत परंतु त्यांना हे सक्तीचे करण्यात आलेले नव्हते. पत संस्थांना कर्ज देण्यास मुभा देण्यात आली होती . पत संस्थांनी पोट नियमात बदल करुन पत संस्थांनी कर्ज उपलब्ध करुन द्यावे यासाठी राज्य सरकारने त्यांना मुभा दिली होती...

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारण्यासाठी परवानगी मागतात )

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तर पूर्ण झाल्यानंतर त्यांनी प्रश्न विचारावा. मंत्रिमहोदयांचे उत्तर पूर्ण झाल्यानंतर मी सन्माननीय सदस्यांना उप प्रश्न विचारण्याची परवानगी देणारच आहे.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की,

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दांडेगावकर (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 42327 ....

पतसंस्थांच्या बाबतीत राज्य सरकार पुन्हा एक वेळ, 1997 पूर्वीचे जे थकबाकीदार या योजनेत आलेले नाहीत त्यांच्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करील.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, 1997 पूर्वीचे जे कर्जदार आहेत त्यांचे या महाराष्ट्रात जवळपास 2100 कोटी रूपयांचे कर्ज आहे. त्या कर्जाला माफी योजना लागू करण्यासाठी आम्ही केंद्र सरकारला पुन्हा पत्र लिहू असे आता माननीय राज्य मंत्री सांगत आहेत. परंतु 1997 पूर्वीचे जे थकबाकीदार शेतकरी राहिले आहेत त्यांचे सुमारे 220 कोटी रूपयांचे कर्ज हे राज्य सरकार आपल्या तिजोरीतून पैसे देऊन माफ करून या 1997 पूर्वीच्या कर्जदार शेतकऱ्याला त्या कर्जातून मुक्त करणार काय ? सभापती महोदय, विदर्भातील 6 जिल्ह्यांतील हा महत्त्वाचा प्रश्न आहे आणि या 6 जिल्ह्यातच जास्त आत्महत्या झालेल्या आहेत आणि त्या जिल्ह्यांसाठी पंतप्रधान आणि मुख्यमंत्री यांच्या पॅकेजच्या माध्यमातून जी व्याजमाफी केली आणि कर्जाचे हप्ते पाडून देऊन, ब्रेकअप पाडून नव्याने कर्ज दिले त्या शेतकऱ्यांना मार्च नंतर मे-जून मध्ये कर्ज मिळेल. त्यामुळे आता तुम्ही यासाठी 31 मार्च 2007 ची मर्यादा घातली आहे त्या मर्यादेत हे शेतकरी बसत नाहीत. तेव्हा ज्या सहा जिल्ह्यांमध्ये जास्त संख्येने आत्महत्या झालेल्या आहेत त्या जिल्ह्यांतील 90 टक्के शेतकरी या कर्जमाफीपासून वंचित होत आहेत. म्हणून आमचा आग्रह आहे की, यासाठीची मुदत 31 मार्च ऐवजी 31 डिसेंबर पर्यंत करावी म्हणजे मग विदर्भातील सगळेच शेतकरी त्या मर्यादेत बसू शकतील. तेव्हा 31 डिसेंबर ही मुदत आम्ही करू असे आश्वासन या ठिकाणी यापूर्वी दिलेले आहे. तेव्हा या बाबतीत केंद्र सरकारने मदत दिली नाही तर या सहा जिल्ह्यांपुरते तरी महाराष्ट्र सरकार आपल्या तिजोरीतून पैसे देऊन हे कर्ज माफ करणार आहे काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी जो मुद्दा येथे उपस्थित केला आहे त्या संदर्भात मी आपल्यामार्फत त्यांना सांगू इच्छितो की, सुरूवातीस या कर्जमाफीचे आकडे पाहिले तर 71 हजार कोटी पर्यंत ही माफी येत होती. आता देशातील या संबंधातील सगळी आकडेवारी एकत्रित करून पाहिल्यास ही आकडेवारी 50 हजार कोटीपर्यंत खाली येण्याची शक्यता आहे. त्यामुळेच आम्ही पुन्हा एकदा केंद्र सरकारकडे यासाठी पाठपुरावा करणार आहोत. पतसंस्था, 1997 पूर्वीचे

..... इ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

थकबाकीदार शेतकरी किंवा विदर्भात्‌ील 6 जिल्ह्यातील शेतकरी अशा सगळ्यांनाच या योजनेचा जास्तीत जास्त फायदा मिळावा या दृष्टीने राज्य सरकार पाठपुरावा करणार आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, प्रत्येक गोष्ट जर तुम्ही केंद्र सरकारवर ढकलणार असाल तर मग यामध्ये महाराष्ट्र सरकारची देखील स्वत:ची म्हणून काही जबाबदारी आहे की नाही ? 1997 पूर्वीचे जे शेतकऱ्यांचे सुमारे 220 कोटीचे कर्ज आहे ते आणि विदर्भातील 6 जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे पुनर्वसन झालेले आहे ते कर्ज मिळून 400-500 कोटीचे कर्ज होते. तेव्हा यामध्ये महाराष्ट्र राज्य सरकारची काही जबाबदारी आहे की नाही ? महाराष्ट्र सरकार या कर्जासंबंधात विचार करून पुढील अधिवेशनापर्यंत याबाबत काही विचार करणार आहे की नाही ?

श्री. जयप्रकाश दांडेकर : सभापती महोदय, या संदर्भात मी महाराष्ट्रापुरती आकडेवारी आपल्या माहितीसाठी सांगू इच्छितो. महाराष्ट्रामध्ये 121 लाखापैकी 67 लाख शेतकरी हे कर्ज-खातेदार आहेत. त्यापैकी 31 मार्च 2007 पर्यंत 48 लाख खातेदार हे थकबाकीदार होते. 5 एकर किंवा 2 हेक्टरच्या योजनेत साधारणत: 28 लाख शेतकरी बसत आहेत आणि ओटीएस योजनेमध्ये 7 लाखाच्या जवळपास असे एकूण 36-37 लाख शेतकरी यामध्ये बसतात. म्हणजे केवळ 10-11 लाख शेतकरी यापासून वंचित होते. त्यामुळे महाराष्ट्रापुरते पाहिल्यास हे कर्ज साडेसात-आठ हजार कोटीपर्यंत आलेले आहे. त्यामुळे केंद्र सरकारने जी रक्कम यासाठी दिली आहे ती आणि राज्य सरकारची 11-12 कोटीची रक्कम होते. तेव्हा हा मुद्दा केंद्र सरकारकडे प्रभावीपणे मांडून जास्तीत जास्त लाभ आपल्या शेतकऱ्याला मिळेल या दृष्टीने मागणी करण्याचीही आपल्याला संधी आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ....

**सभापती** : माननीय विरोधी पक्षनेते श्री.फुंडकर यांना मी सांगू इच्छितो की, आता माननीय राज्यमंत्र्यांनी या अनुषंगाने राज्य सरकार काय करणार आहे ते आपल्याला सांगितले आहे. ....

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, राज्यातील शेतकऱ्यांच्याबाबतीत राज्य सरकारची भूमिका ही नेहमीच सकारात्मक राहिलेली आहे. तसेच जे 6 जिल्हे यामध्ये आलेले नाहीत त्यासाठी 21 कोटीचा बोजा राज्य सरकारने उचललेला आहे त्याबाबतीत देखील केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून याबाबत जरूर राज्य सरकार विचार करील.

( यानंतर श्री. सरफरे .... एफ 1 ..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 42327...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, केंद्र सरकारने 5 एकरापर्यंत शेतजमीन असलेल्या शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा केली. त्यानंतर या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले की, 5 एकर ते 15 एकरापर्यंत ज्या शेतकऱ्यांकडे जमीन असेल त्या शेतकऱ्यांची कर्जमाफी जर केंद्र सरकारने माफ केली नाहीतर त्यासंबंधी राज्य शासन विचार करुन आपल्या तिजोरीमधून पैसे देण्याची व्यवस्था करु. राज्यामध्ये दुष्काळ पडलेला असतांना, शेतकरी आत्महत्त्या करीत असतांना हे शासन 65 कोटी रुपयांचे विमान खरेदी करावयास निघाले आहे, त्याकरिता या शासनाजवळ पैसे आहेत.परंतु 1997 पूर्वी घेतलेले कर्ज फेडावयास शासनाजवळ पैसे नाहीत. विदर्भाच्या सहा जिल्हयातील 1997 पूर्वी कर्ज घेतलेल्या 15 एकरावरील शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याच्या बाबतीत राज्य शासनाने केंद्र सरकारकडे बोट दाखवू नये. हे महाराष्ट्र शासन स्वत:ला शेतकऱ्यांचा कैवारी समजते. तरमग शेतकऱ्याचे कर्जमाफ करण्याची या राज्य शासनाची जबाबदारी आहे की नाही? हे कर्ज माफ करण्याबाबत राज्य शासनाने विचार करावा अशी माझी आग्रहाची मागणी आहे, ते करणार आहे काय?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, या सभागृहाचे माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि आणि माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी केंद्र सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफी केल्यानंतर ज्या शेतकऱ्यांना त्या कर्जमाफीचा लाभ मिळाला नाही त्यांच्याबाबतीत सूचना केली. आणि ही सूचना करीत असतांना ते माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि माननीय सहकार मंत्र्यांनी त्यासंबंधी आश्वासन दिल्याचे वारंवार सांगत आहेत. सभापती महोदय, मी आपणामार्फत या सदनाला सांगू इच्छितो की, दुष्काळामध्ये सापडलेल्या आणि यावर्षी कर्जमाफी जाहीर झाल्यानंतर त्याचा लाभ न मिळाल्यामुळे पुन्हा आत्महत्त्येकडे वळलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याबाबत आपण केलेल्या सूचनांचा शासन जरुर विचार करील एवढेच यानिमित्ताने सांगतो.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, शासन जरुर विचार करील म्हणजे काय? याठिकाणी आम्हाला ठोस आश्वासन देणार आहात की नाही?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी प्रश्न विचारतांना आमच्या मागणीबाबत विचार करावा असे म्हटले आहे.

(गोंधळ)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

ता.प्र.क्र. 42327...

**सभापती** : माननीय विरोधी पक्षनेत्यांना या प्रश्नाच्या बाबतीत पाच वेळा उपप्रश्न विचारण्यास मी परवानगी दिली आहे. हा प्रश्न शेतकऱ्यांशी संबंधित असल्यामुळे आणि दोन्ही बाजूकडील माननीय सदस्यांच्या जिव्हाळयाचा असल्यामुळे या प्रश्नाची उकल होण्याच्या दृष्टीने त्यांना प्रश्न विचारण्यास परवानगी देण्यामागे माझा उद्देश होता. त्याबाबत माननीय राज्यमंत्र्यांनी देखील राज्य शासन कोणत्या पध्दतीने पाठपुरावा करीत आहे, प्रयत्न करीत आहे यासंबंधी उत्तराच्या माध्यमातून स्पष्टीकरण केले आहे. त्यानंतर माननीय महसूल मंत्र्यांनी देखील या प्रश्नासंबंधी शासनाची असलेली भावना याठिकाणी सांगितली आहे. त्यामुळे आता मी माननीय सदस्या सर्वश्रीमती उषाताई दराडे, मंदा म्हात्रे यांचा तारांकित प्रश्न क्रमांक 42064 पुकारीत आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**बीड जिल्ह्यात माहे मे, २००८ च्या दरम्यान अवकाळी पाऊस पडून मोठ्या प्रमाणात जिवीत व वित्तहानी झाल्याबाबत**

**(४) * ४२०६४ श्रीमती उषाताई दराडे , श्रीमती मंदा म्हात्रे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात मे, २००८ च्या तिसऱ्या आठवड्यात अवकाळी पाऊस पडून मोठ्या प्रमाणात जिवीत व वित्तहानी झाल्याच्या घटना घडल्या हे खरे आहे काय,

(२) उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय, असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार कोणती मदत केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच मदत केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (१), (२) व (३) अंशत: खरे आहे, सदर आपत्तीमध्ये दोन व्यक्ति मृत पावल्या आहेत. त्यांना स्थायी आदेशातील तरतुदीनुसार मदत करण्याची कार्यवाही क्षेत्रियस्तरावर करण्यात येत आहे. पिकाच्या नुकसानी संदर्भात जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी, बीड यांचेकडून अहवाल मागविण्यात आलेला आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, मे महिन्यामध्ये अवकाळी आलेल्या पावसामुळे बीड जिल्हयात मोठया प्रमाणात जीवित व वित्त हानी झाली. यामध्ये ज्या व्यक्ती मृत झाल्या त्यांच्या पिकांचे देखील फार नुकसान झाले आहे. अशा शेतकऱ्यांना शासनाकडून तात्काळ मदत मिळाली नाही, ती केव्हा देण्यात येणार आहे?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मे 2008 च्या तिसऱ्या आठवडयात अवकाळी पाऊस झाल्यामुळे जीवितहानी झाली. दिनांक 21.5.2008 रोजी अंगावर वीज पडल्यामुळे दोन व्यक्ती मृत पावल्या. त्यामध्ये श्री. राजेंद्र दादासाहेब गायकवाड हे बीड जिल्हयातील केज तालुक्यातील आहेत. त्यांना दि.27.5.2008 रोजी 1 लाख रुपये दिले आहेत. त्याचप्रमाणे श्रीमती कुसुमताई आत्माराम काशिंद या 60 वर्षे असलेल्या वृद्ध महिलेच्या अंगावर वीज पडल्यामुळे त्या मृत झाल्या. परंतु त्यांच्या मृतदेहाचे शव विच्छेदन न झाल्यामुळे शासनाच्या स्थायी आदेशातील तरतुदीनुसार त्यांना मदत देता आलेली नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42064 . . . .

डॉ.राजेंद्र शिंगणे . . . .

अवकाळी पाऊस पडल्यामुळे पिकाचे नुकसान झालेले आहे असा प्रश्नामध्ये उल्लेख केलेला आहे. परंतु तशा पध्दतीची घटना घडलेली नाही. परंतु अवकाळी पावसामुळे ज्या व्यक्ती मृत झालेल्या आहेत, त्यातील एका व्यक्तिच्या कुटुंबियांना मदत दिलेली आहे. मात्र पिकाचे नुकसान न झाल्यामुळे याबाबतीत नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न येत नाही.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, याठिकाणी उत्तरामध्ये म्हटल्याप्रमाणे पिकाच्या नुकसानी संदर्भात जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी, बीड यांचेकडून अहवाल मागविण्यात आलेला आहे. तर सदरहू अहवाल प्राप्त झालेला आहे काय ? हा अहवाल प्राप्त झाला असल्यास, त्यामध्ये कृषी अधिकाऱ्यांनी काय प्रस्तावित केलेले आहे ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मे महिन्याच्या तिसऱ्या आठवडयात अवकाळी पाऊस पडलेला आहे आणि तिसऱ्या आवठडयामध्ये कोणतीही पिके घेण्यात आली नव्हती. त्यामुळे पिकाचे नुकसान झालेले नाही अशा प्रकारचा अहवाल प्राप्त झालेला आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, बीड जिल्हयामध्ये मे महिन्यामध्ये अवकाळी पाऊस पडल्यामुळे जिवीत व वित्तहानी झालेली आहे. त्याचप्रमाणे वीज पडून अनेकांचा मृत्यू झालेला आहे. याबाबतीत शासन काय कार्यवाही करणार आहे ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे, त्याबाबतीत सांगावयाचे तर वीज पडून दोन व्यक्तिंचा मृत्यू झालेला आहे. त्यापैकी एका व्यक्तिंच्या कुटुंबियांना मदत देण्यात आली आहे. श्रीमती कुसूमताई काशिंद यांचा देखील वीज पडल्यामुळे मृत्यू झालेला आहे. पण त्यांच्या घरातील लोकांनी त्यांचे पोस्टमार्टम केले नाही, त्या- मुळे आपण त्यांच्या कुटुंबियांना एक लाख रुपयांची मदत देऊ शकलो नाही. वीज पडून मृत्यू झाला असेल तर पोस्टमार्टम होणे आवश्यक असते आणि त्याचा रिपोर्ट आल्यानंतर संबंधित मृत व्यक्तिंच्या कुटुंबियांना आपण एक लाख रुपयांची मदत देऊ शकतो. पण याठिकाणी श्रीमती कुसुमताई काशिंद यांच्या मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबियांनी पोस्टमार्टम केलेले नसल्यामुळे त्यांच्या कुटुंबियांना मदत दिलेली नाही.

डॉ.दीपक सावंत :सभापती महोदय, आता माननीय मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे ......

. . . .जी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42064 . . . .

डॉ.दीपक सावंत . . . .

पोस्टमार्टमच्या रिपोर्टवरच ही बाब अवलंबून आहे. परंतु दुसरीकडे माननीय मंत्री महोदय ही गोष्ट मान्य करीत आहेत की, श्रीमती कुसुमताई काशिंद यांचा वीज पडल्यामुळे मृत्यू झालेला आहे. त्या मुळे विशेष बाब म्हणून त्यांच्या कुटुंबियांना मदत मिळणार आहे काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केलेली आहे, त्याचा विचार केला जाईल. याबाबतीत आयुक्तांकडून अहवाल मागवून, जर संबंधितांच्या कुटुंबियांना मदत देता आली तर ती निश्चितपणे दिली जाईल.

-----

. . . .जी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

### पिंपळगांव राजा (ता.खामगांव, जि.बुलढाणा) येथील ज्ञानगंगा नदीतील अनधिकृत रेती उत्खननाबाबत

**(५) * ४२२९५ श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. जगदीश गुप्ता : तारांकित प्रश्न क्रमांक ३८०४१ ला दिनांक २७ मार्च, २००८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळगांव राजा (ता.खामगांव, जि.बुलढाणा) येथील ज्ञानगंगा नदीपात्रातील उत्खननाबाबत तहसिलदार, खामगांव यांनी नियमबाह्य पद्धतीने परवाने दिल्यामुळे त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी अद्याप कोणतीही कारवाई झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तहसिलदार, खामगांव यांच्यावर कारवाई न होण्याची कारणे काय आहेत व ती केव्हा होणार आहे,

(४) कारवाई झाली असल्यास, कारवाईचे स्वरुप काय आहे ?

**श्री. नारायण राणे** : (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) तहसीलदार,खामगाव यांच्याविरुध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडून विभागीय आयुक्त अमरावती यांना सादर करण्यात येत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी मागच्या अधिवेशनामध्ये दि.27 मार्च 2008 रोजी हाच प्रश्न विचारलेला होता. त्यावेळी माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणे सदनामध्ये उपस्थित होते. त्यावेळी त्यांनी दिलेल्या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की,"तहसीलदार, खामगाव यांचा खुलासा समर्थनीय नसल्यामुळे त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना देण्यात आलेले आहेत." मी आज देखील तोच प्रश्न विचारलेला आहे. यासंदर्भात असे उत्तर देण्यात आलेले आहे की, "तहसीलदार, खामगाव यांच्याविरुध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडून विभागीय आयुक्त अमरावती यांना सादर करण्यात येत आहे." म्हणजे एकदा ते दोषी असल्याचे आढळून आल्यानंतर पुन्हा विभागीय चौकशी करण्यात येत आहे. खामगाव तालुक्यामध्ये "ज्ञानगंगा" नावाची नदी वाहते. त्यातून रेती उत्खननाकरता संबंधित तहसीलदारांनी नियमबाह्य पध्दतीने परवाना दिला. याबाबतीत एस.डी.ओ.यांनी चौकशी केली. त्यामध्ये प्रत्येकी 100 ब्रास प्रमाणे 300 ब्रास रेती उत्खनन करण्यासाठी तहसीलदार यांनी परवाना दिला असल्याचे सिध्द झालेले आहे. तसेच संबंधितांना कारणे दाखवा नोटीस देखील देण्यात आली. परंतु त्यांना कलेक्टर वाचविण्याचा प्रयत्न करीत आहेत. मात्र तहसीलदारांनी अशा प्रकारे नियमबाह्य चुकीचे काम केलेले आहे, रेती उत्खननासाठी परवाने दिलेले आहेत. भूजल सर्व्हेक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी परवाना देण्याचे अमान्य केलेले ...

असतानाही संबंधित तहसीलदार यांनी परवाना दिलेला आहे. परंतु त्यांच्यावर अजूनपर्यंत कारवाई केलेली नाही. त्यामुळे तहसीलदार यांना निलंबित करण्याच्या बाबतीत ताबडतोब घोषणा करण्यात येणार आहे काय ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या प्रश्नाच्या संबंधात यापूर्वी देखील आपल्या भावना व्यक्त केलेल्या होत्या आणि त्यावेळी कारवाई करु असे सांगण्यात आले होते असे सांगितले. त्याप्रमाणे कलेक्टर यांना चौकशीबाबत आदेश दिलेले आहेत. पण त्यामध्ये मुदत देण्यात आलेली नाही. मी सांगू इच्छितो की, याबाबतीत चौकशीचे काम आयुक्तांकडे दिलेले आहे. ही चौकशी तीन महिन्यामध्ये पूर्ण करुन चौकशीअंती जो निर्णय दिला जाईल, त्या नुसार कारवाई करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी दि.27 मार्च 2008 रोजी सदनामध्ये याच विषयाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी संबंधित तहसीलदार यांनी नियमबाह्य वर्तन केलेले आहे असे सभागृहामध्ये उत्तर देण्यात आले आहे. तहसीलदार, खामगाव यांनी केलेला खुलासा समर्थनीय नसल्यामुळे त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्याचे निर्देश दिलेले आहेत. असे असताना पुन्हा विभागीय चौकशी का करण्यात येत आहे ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, तहसीलदार यांनी वाळूच्या लिलावासाठी टेंडर काढावयास पाहिजे होते. पण तसे काढलेले नाही. त्याचप्रमाणे संबंधितांना निलंबित करण्याएवढा सकृतदर्शनी दोष दिसत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 42295 ......

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझी इथेच हरकत आहे. भूजल सर्वेक्षण विभागाची मनाई असताना त्यांनी नियमबाह्य पध्दतीने टेंडर काढण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. त्या नदीतील वाळू उपसण्यात येऊ नये अशा प्रकारे भूजल सर्वेक्षण विभागाने सांगितले असताना त्या ठिकाणी टेंडर काढण्याचा विषयच निर्माण होत नाही. टेंडरचा विषय तर सोडाच पण मनाई असताना त्यांनी परवानग्या देऊन टाकलेल्या आहेत आणि हे सिध्द झालेले आहे. आपण हे मान्य केले आहे. आपण मान्य केलेले असताना तीन महिन्यानंतर कमिशनर सांगेल त्या पदतीने कारवाई करु असे माननीय मंत्रिमहोदय सांगत आहेत. ज्या माणसाने खऱ्या अर्थाने गुन्हा केलेला आहे अशा गुन्हेगाराला पुन्हा तीन महिने आपण वाढवून देणार आहात. माननीय मंत्रिमहोदय सांगत आहेत की, त्यांची बदली केली आहे. त्यांची बदली नियमानुसार झालेली आहे. त्यांचे टेन्युअर पूर्ण झालेले होते म्हणून त्यांची बदली झालेली आहे. आपण मान्य केल्यानंतरही कारवाई कशासाठी रोखत आहात ? त्यांच्यावर शासनाने कारवाई करावी. शासन ती कारवाई करणार काय ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, आजच तहसीलदाराला निलंबित करणे योग्य होणार नाही. त्याचा दोष सिध्द होऊ द्या. मी तीन महिने म्हणजे जास्त मुदत मागितलेली नाही. तीन महिन्यात चौकशी पूर्ण केली जाईल आणि त्यांनी जी चूक केली असेल त्या चुकीप्रमाणे तशा प्रकारची शिक्षा किंवा कारवाई होईल. त्याला जिल्हाधिकारी किंवा कमिशनर कोणीही पाठीशी घालणार नाही. आपल्याला तीन महिन्यांच्या आत त्यांच्यावर कारवाई झालेली दिसेल.

-----

**तारांकित प्रश्न क्रमांक 44983**

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

---

**तारांकित प्रश्न क्रमांक 43088**

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

**मुंबईतील टिळकनगर अक्षय सहकारी गृहनिर्माण संस्थेवर प्रशासक नेमल्याबाबत**

**(८) * ४२५७७ श्री. प्रतापराव सोनवणे , श्री. नितीन गडकरी , श्री.केशवराव मानकर , श्री.सय्यद पाशा पटेल :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १६ एप्रिल, २००८ रोजी वा त्या सुमारास जा.क्र.उपनि/सस/मु.प.८३६/२००८ अन्वये डॉ,किशोर पांडे उपनिबंधक सहकारी संस्था मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ मुंबई यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८(१) अन्वये टिळक नगर अक्षय को.ऑप.हौ.सोसायटी लि. या संस्थेची व्यवस्थापक कमिटी बरखास्त करुन त्या जागी संस्थेचा दैनंदिन कारभार पाहण्यासाठी श्री.राजेंद्र निकम प्रमाणित लेखा परिक्षक यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) सदरचा आदेश संबंधित संस्थेचे चेअरमन श्री.शांतीवीर, सेक्रेटरी, श्री.बी.एस.देसाई, खजिनदार, ए.पी.बडेकर यांना त्याच दिवशी देण्यात आला आहे काय, असल्यास, सदरचा आदेश देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) उपनिबंधकांनी नेमणूक केलेल्या प्रशासकाने सदर संस्थेच्या कारभाराचा ताबा कधी घेतला व कामाला कधी सुरुवात केली,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. जयप्रकाश दांडेगावकर, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (१) होय,

दिनांक १६/४/२००८ च्या आदेशान्वये उपनिबंधक, डॉ. किशोर मांडे, उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई यांनी टिळकनगर अक्षय को.ऑप.हौ.सोसा.लि.,मुंबई या संस्थेवर श्री.राजेंद्र निकम, प्रमाणित लेखापरिक्षक यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केलेली आहे.

(२) नाही. सदरचा आदेश संस्थेला पोस्टाद्वारे पाठवण्यात आलेला आहे.

(३) प्रशासकांनी अद्यापपर्यंत संस्थेच्या दप्तराचा ताबा घेतलेला नाही व संस्थेच्या कामकाजास सुरुवात केलेली नाही.

(४) दिनांक १६/४/२००८ रोजी टिळकनगर अक्षय को.ऑप.हौ.सोसा.लि., मुंबई या संस्थेवर श्री.राजेंद्र निकम, प्रमाणित लेखापरिक्षक यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केलेली होती, तथापि सदर प्रशासक आजारी पडल्याने त्यांना उपचार घेण्यासाठी दवाखान्यात दाखल व्हावे लागले त्यामुळे त्यांनी संस्थेच्या दप्तराचा ताबा घेतलेला नाही. दरम्यानच्या कालावधीत संस्थेच्या व्यवस्थापन समितीने मा.विभागीय सहनिबंधक या अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे दिनांक ३/६/२००८ रोजी अपिल दाखल केल्यामुळे मा.विभागीय सहनिबंधकांनी दिनांक १७/६/२००८ रोजी उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई या कार्यालयाने निर्गमित केलेल्या दिनांक १६/४/२००८ रोजीच्या प्रशासक नियुक्तीच्या आदेशास अंतरिम स्थगिती दिलेली आहे व सदर अपिलाची पुढील सुनावणी दिनांक २१/८/२००८ रोजी निश्चित केलेली आहे.

..३...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

ता. प्र. क्र. 42577 .....

श्री. प्रतापराव सोनवणे : सभापती महोदय, उपनिबंधक , सहकारी संस्था यांनी दिनांक 16 एप्रिल, 2008 रोजी टिळकनगर अक्षय को.ऑप.हाऊसिंग सोसायटी या संस्थेची कमिटी बरखास्त करुन त्या जागी श्री. राजेंद्र निकम, लेखापरीक्षक यांची प्रशासक म्हणून नेमणूक केलेली आहे. या प्रशासन नेमणुकीचे कारण काय ? अक्षय कॉर्पोरेशन नामक विकासकाने सदरची इमारत बेकायदेशीरपणे तोडलेली आहे अशी तक्रार त्या सोसायटीतील रहिवाशी श्री. संजयराव मंगेशकर यांनी केलेली आहे. तेव्हा प्रशासक श्री. निकम यांनी त्यासंदर्भात कोणती कारवाई केलेली आहे ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, त्या संस्थेचे 11 वर्षाचे ऑडिट केलेले नव्हते म्हणून सदर संस्थेच्या समितीला पहिल्या वेळी बरखास्त करण्यात आले होते. त्यावर त्यांनी जॉइन्ट रजिस्ट्रारकडे अपील केले की, हा ऑडिटचा दोष आमचा नाही, आम्ही निवडून येण्याच्या पूर्वीचे ऑडीट झालेले नाही. या आधारावर पहिल्यावेळी बरखास्ती झालेली होती. दुसऱ्या वेळी परत बंधपत्र दिले नाही त्याप्रमाणे त्यांना कारणे दाखवा नोटिसेस देऊन बरखास्त करुन श्री. राजेंद्र निकम या प्रशासकाची नियुक्ती केलेली आहे. आम्हाला नोटीस दिली नाही म्हणून त्याला पुन्हा चॅलेंज केले गेले. नॅचरल जस्टीसखाली जॉइन्ट रजिस्ट्रार यांनी त्याला स्टे दिलेला आहे. उद्याच्या 21 तारखेला त्याची सुनावणी आहे. त्यावेळी योग्य तो निर्णय घेऊन कार्यवाही केली जाईल.

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

**धेरंड, शहापूर (ता.अलिबाग,जि.रायगड) आदी ९ गावातील शेतकऱ्यांचा रिलायन्स व टाटा वीजनिर्मीती प्रकल्पास विरोध असल्याबाबत**

**(९) * ४२७९२ श्री. जयंत पाटील , श्री.कपिल पाटील , श्री. अरविंद सावंत , श्री. दिवाकर रावते , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. अनिल परब , श्री.किरण पावसकर , श्री.परशुराम उपरकर , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. संजय दत्त :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धेरंड, शहापूर (ता.अलिबाग, जि.रायगड) आदी ९ गावातील शेतकऱ्यांचा रिलायन्स व टाटा वीज निर्मिती प्रकल्पासाठी भूसंपादनास विरोध असताना जिल्हा प्रशासनाने पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या कलम १३ अन्वये दिनांक १७ एप्रिल, २००८ व दिनांक २० एप्रिल, २००८ रोजी जाहीर नोटीस प्रसिध्द केल्या हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांनी रिलायन्स व टाटा वीज निर्मिती प्रकरणी पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या कलम १३ अन्वये प्रसिध्द झालेल्या नोटीसांना माहे मे, २००८ च्या दुसऱ्या आठवड्यात जिल्हा प्रशासनाकडे आक्षेप नोंदविला हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली आहे ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (१) होय.

(२) व (३) होय. रिलायन्स एनर्जी जनरेशन लि.साठी पुनर्वसन अधिनियमानुसार कलम १३(१) ची अधिसूचना दिनांक ८/५/२००८ रोजी प्रसिद्ध केली आहे. त्या अधिसूचनेस ७९१ हरकती प्राप्त झाल्या असून सदर हरकतीवर कंपनीचे अभिप्राय घेऊन विभागीय आयुक्त, कोकण यांच्या कार्यालयाकडून संबंधित हरकतींची छाननी करण्यात येत आहे.

टाटा विद्युत प्रकल्पास पुनर्वसन कायदा लागू केला आहे. याबाबत अधिसूचना प्रसिद्ध करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय पुनर्वसन मंत्र्यांनी असे सांगितले होते की, शेतकऱ्यांचा विरोध असेल तर सक्तीने जमिनी घेणार नाही. त्याप्रमाणे आम्ही कार्यवाही करु. धेरंड आणि शहापूरमध्ये 791 लोकांनी हरकती घेतल्या हे शासन कबूल करते. तरीही वेळोवेळी शासन सहा महिन्यांनी नोटिसेस काढून त्या ठिकाणी शेतकऱ्यांच्या जमिनी घेण्याचा प्रयत्न करते. ही प्रक्रिया शासन थांबविणार काय ? कंपनीला हरकतीवर अभिप्राय देण्याचा अधिकार कोणत्या कायद्याने दिला आहे हे सांगावे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/ श्री.बरवडनंतर 10:40

ता.प्र.क्र.42792...

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य यांनी विचारलेला प्रश्न रायगड जिल्हयातील अलिबाग तालुक्यातील धेरंड, शहापूर आणि इतर 8 गावांसंबंधातील आहे. रिलायन्स, टाटा या वीज निर्मिती प्रकल्पासाठी पाहिजे. रिलायन्सने 8 गावातील 2437 हे हेक्टर जमीन आणि टाटा या कंपनीने दोन्ही गावातील 468 हेक्टर जमीन संपादित करण्याचे ठरविले होते. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली वस्तुस्थिती आहे की, रिलायन्स कंपनीला या प्रकल्पासाठी ज्या गावातील जमीन पाहिजे होती तेथील गावक-यांनी हा प्रकल्प होऊ नये अशी हरकत घेतली आहे. जमीन संपादन करण्यासाठी कलम 11 (1) ची अधिसूचना प्रसिध्द केली होती. या अधिसूचनेद्वारे लोकांकडून हरकती मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार या प्रकल्पाला विरोध असणा-या हरकती लोकांकडून जिल्हाधिका-यांकडे प्राप्त झाल्या असून या हरकती विभागीय आयुक्तांकडे तपासण्यासाठी पाठविल्या आहेत. आयुक्तांनी त्याबाबत अजून निर्णय दिलेला नाही.

श्री.कपिल पाटील : मागील अधिवेशनामध्ये रायगड जिल्हयामधील या प्रकल्पासंबंधी माननीय मदत व पुनर्वसन मंत्र्यांनी सांगितले होते की शेतक-यांचा विरोध असेल तर जमीन संपादित करणार नाही. रायगड जिल्हयामध्ये जमीन संपादनाच्या विरोधात वारंवार आंदोलने उभी राहिली आहेत. सन्माननीय श्री.एन.डी.पाटील हे या निर्णयाच्या विरोधात आंदोलनाला बसणार आहेत. या पार्श्वभूमीवर शासन जमीन संपादन करण्याची कार्यवाही थांबविणार आहे काय आणि ज्यांनी अधिसूचना काढली आहे त्यांच्याविरुध्द कारवाई केली जाणार आहे काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सन्माननीय सांगितलेली गोष्ट खरी आहे. शेतक-यांचा विरोध असेल जर जमीन संपादित करणार नाही असे सरकारने वारंवार जाहीर केलेले आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे या दोन्ही प्रकल्पासाठी जमीन संपादन करण्याची प्रत्यक्षात कार्यवाही सुरु केलेली नाही. केवळ कलम 11 (1) ची अधिसूचना काढलेली आहे. त्यानंतर कलम 13(1) ची अधिसूचना काढून हरकती मागविल्या आहेत. त्यामध्ये या प्रकल्पाला लोकांचा विरोध असल्याचे दिसून आले आहे. या हरकतीचा तपासून शासन स्तरावर निर्णय घेण्यात येईल.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, गोवा राज्यामध्ये सरकारने जनतेचा विरोध असेल तर आम्हाला एस.इ.झेड.नको अशी भूमिका घेतलेली आहे. पुणे जिल्हयामध्ये वाघोली आणि लोणीकंद या भागामध्येही जमीन संपादन करण्यासाठी अशा नोटिसा जाहीर झाल्या आहेत. पण शेतक-यांचा

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42792... डॉ.नीलम गो-हे.....

विरोध आहे असे म्हटल्यावर नोटिसा देण्याची कार्यवाही थांबविली आहे. रायगड जिल्हयात या दोन गावातील लोकांकडून आलेल्या हरकतींची छाननी सुरु आहे असे आताच सांगण्यात आले आहे. स्थानिक पातळीवर या प्रकल्पाला विरोध होत असेल, या प्रकल्पात त्यांची सुपीक जमीन जात असेल, त्यांना जमीन विकावयाची नसेल असे स्पष्ट मत ते नोंदवित असतील तर शासनाने संपादण्याची कार्यवाही थांबविली पाहिजे. यासंबंधातील संघर्ष समितीने आंदोलनात सातत्याने हा मुद्दा मांाडला आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने या प्रकल्पाला स्थगिती दिली आहे काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : या प्रकल्पाला स्थगिती दिलेली नाही. परंतु यासंबंधात हरकती जरुर मागविल्या आहेत. त्या तपासण्याचेच काम करीत आहोत. जमिनीच्या मोबदल्याबाबत लोकांचा विरोध असेल, हा प्रकल्प व्हावा किंवा होऊ नये याबाबतीतील मत असेल यासंबंधात हरकती मागविल्या आहेत. त्या तपासण्याचे काम सुरु आहे. ते काम पूर्ण झाल्यानंतर लोकांचे म्हणणे असेल त्यानुसार यासंबंधीचा निर्णय केला जाईल.

---------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

## राज्यातील गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याबाबतचे प्रस्ताव

**(१०) * ४२८२७ श्री सुभाष चव्हाण , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री सुभाष चव्हाण , श्री. सुरेशदादा देशमुख , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३९१८४ ला दिनांक १० एप्रिल, २००८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रस्त्याच्या कडेला चामड्याच्या वस्तू व पादत्राणे दुरुस्ती करणाऱ्या अनुसूचित जातीच्या गटई कामगार वर्गाच्या लोकांच्या उन्नतीच्या उद्देशाने राज्य सरकारकडून सन २००७-२००८ पासून पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना राबविण्यात येत आहे हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, आजतागायत या योजनेसाठी किती निधी राखून ठेवण्यात आला आहे व किती लोकांना याचा लाभ झाला आहे,

(३) उपरोक्त प्रकरणीचा तपशील उपलब्ध नसल्यास याबाबतचा आढावा घेऊन योजना अधिक चांगल्याप्रकारे राबविण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा येत आहे ?

**ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर, श्री.चंद्रकांत हंडोरे यांच्याकरिता** : (१) होय.

(२) व (३) या योजनेसाठी रु.१४ कोटी इतका निधी राखून ठेवण्यात आलेला आहे. एकूण २८४८ गटई स्टॉल पुरवठा करण्याचे आदेश निविदाधारकांस देण्यात आलेले आहेत.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी नेहमीप्रमाणे उत्तर दिलेले आहे. उत्तराचा भाग क्र.2 व 3 मध्ये असे नमूद केले आहे की, "या योजनेसाठी रुपये 14 कोटी इतका निधी राखून ठेवण्यात आलेला आहे. यासंदर्भात निविदा मागविण्यात आल्या आहेत. सभापती महोदय, दबलेल्या समाजाचा हा महत्वाचा प्रश्न असल्यामुळे मी त्यावर अधिक बोलू इच्छितो. या समाजातील लोक रस्त्यावर, पावसात, उन्हात लोकांची सेवा करतात. त्या लोकांचे पावसापासून, उन्हापासून संरक्षण व्हावे आणि त्यांची आर्थिक उन्नती व्हावी म्हणून 14 कोटीची तरतूद केलेली आहे. पण हा निधी अद्यापही खर्च झालेला नाही. अर्थसंकल्पीय अधिवेशनात अनुसूचित जाती व जमातीतील दबलेल्या लोकांसाठी राखून ठेवलेला निधी पाटबंधारे विभागाकडे वर्ग केला आहे काय ?

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.42827...

ॲड. प्रीतमकुमार शेगावंकर : हा निधी पाटबंधारे विभागाकडे वर्ग करण्यात आलेला नाही. हा निधी तसाच शिल्लक आहे. ऑडर प्रमाणे स्टॉल तयार न झाल्यामुळे त्याचे पेमेंट केलेले नाही. त्यामुळे तो निधी शिल्लक आहे.

श्री. दिवाकर रावते : हा प्रश्न मागील अधिवेशनामध्ये या सदनामध्ये उपस्थित करण्यात आलेला होता आणि त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते की, 2-4 महिन्यामध्ये स्टॉलचे वाटप होईल.

डॉ. नीलम गो-हे : त्यावेळी कच्च्या मालाची तपासणी करण्यासाठी एक समिती देखील नेमण्यात आली होती असेही माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरामध्ये सांगितलेले होते.

श्री. चंद्रकांत हंडारे : दबलेल्या वर्गाचा विकास करण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद केलेली आहे, ती तरतूद इतर ठिकाणी वळविण्यात आलेली आहे काय असा सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांचा प्रश्न आहे. तर ती तरतूद आम्ही दुसरीकडे वळवू दिलेली नाही. स्टॉलसाठीच ती तरतूद ठेवलेली आहे. सन 2007-08मध्ये 1 कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली होती. त्यानंतर पुनर्योजनेमध्ये पुन्हा 13 कोटीची तरतूद करुन एकूण 14 कोटीची तरतूद स्टॉल देण्यासाठी केलेली आहे. मध्यंतरीच्या काळामध्ये न्यायालयीन प्रकरणे आणि तांत्रिक बाबी उभ्या राहिल्या. त्यामुळे स्टॉल देण्यास विलंब झाला. गेल्या कित्येक वर्षापासून हा प्रश्न प्रलंबित राहिल्यामुळे आम्ही विधी व न्याय विभागाकडे हे प्रकरण पाठविले. न्यायालयीन आदेशाच्या अधीन राहून या लोकांना स्टॉल मिळाले पाहिजेत अशी भूमिका आम्ही घेतली. कोर्टाने तसे कोणतेही आदेश दिले नाहीत. 2848 स्टॉलची वर्कऑर्डर देण्यात आली. 4.85 कोटी रुपये लिडकॉमकडे वर्ग केले. ज्यांना हे स्टॉल बनविण्याचे काम दिले त्यांच्याकडून काम सुरु झालेले आहे. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी सांगितल्याप्रमाणे कच्च्या मालाची तपासणी करण्यासाठी जी समिती नेमली होती त्या समितीने रिपोर्ट देखील दिलेला आहे. स्टॉल बनविण्याचे काम आता सुरु झालेले असून जसजसे हे स्टॉल तयार होतील तसतसे त्यांचे वाटप करण्यात येईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.42827...

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : या दबलेल्या वर्गासाठी शासनाने जो निधी एका बाजूला काढून ठेवलेला आहे तो निधी पाटबंधारे खात्याकडे वर्ग केलेला आहे काय असा स्पेसिफिक प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी विचारलेला असून हा निधी पाटबंधारे खात्याला उपलब्ध करुन दिलेला नाही किंवा तो उपलब्ध करुन दिला जाणार नाही आणि हा निधी त्याच वर्गासाठी खर्च केला जाईल अशा प्रकारचे स्पेसिफिक उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावयास पाहिजे.

श्री. चंद्रकांत हंडोरे :मी स्पेसिफिक उत्तर दिलेले आहे. पाटबंधारे खात्याकडे निधी वळविण्याचा प्रश्नच नाही. दबलेल्या वर्गासाठीच हा निधी असणार आहे.

श्री. प्रकाश शेंडगे : स्टॉलसाठी वर्कऑर्डर दिल्याचे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. हे स्टॉल ज्या मुदतीत तयार करुन द्यावयाचे आहेत त्या मुदतीत ते तयार करुन दिले नाहीत तर संबंधितांवर काय कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : ही योजना लवकरात लवकर कार्यान्वित व्हावी यादृष्टीने मी पयत्नशील आहे. यामध्ये वगवेगळया अडचणी उदभवल्यामुळे त्या अडचणी दूर करुन हा प्रश्न धसास लावून तात्काळ स्टॉलचे वाटप करण्याचे माझे प्रयत्न आहेत. याबाबतीत स्टॉल बनविण्याची प्रोसेस सुरु झालेली आहे. मी स्वत: याबाबतीत लक्ष घालत आहे.

डॉ. दीपक सावंत : ही योजना कार्यान्वित करण्यामध्ये तांत्रिक अडचणी आहेत असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. या प्रकरणी विधी व न्याय विभागाकडे जाण्याचे कारण काय ?

....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ABG/ SBT/ SBT/ MMP/ प्रथम श्री. शिगम 10:50

ता.प्र.क्र.42827....

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, ज्या लोकांनी यासंदर्भात निविदा भरल्या होत्या, त्यातील ज्या लोकांच्या निविदा कमी दराच्या होत्या, त्यांच्या निविदा मंजूर करण्यात आल्या होत्या. काही निविदाधारकांनी जास्त दराने निविदा भरल्या होत्या. ज्यांना 2006-07 मध्ये यासंदर्भातील निविदा मंजूर केल्या होत्या, त्यांना स्टॉल बनविण्याची ऑर्डर देण्यात आली होती. ज्यांना निविदाकारांना ऑर्डर देण्यात आली होती, त्यांनी सुरक्षा अनामत रक्कम भरली नाही म्हणून त्यांना दिलेली ऑर्डर कॅन्सल करण्यात आली. ती ऑर्डर कॅन्सल केल्यानंतर याबाबतीत पुन्हा फ्रेश निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्या निविदांमध्ये ज्यांना ऑर्डर दिली होती त्यांनी जास्त दराने निविदा भरल्या. त्या निविदाधारकांचे म्हणणे असे म्हणणे असे होते की, आम्ही पूर्वीचा निविदा कमी दराने भरलेल्या होत्या. आताचा जो दर जास्त आहे. आम्हाला कमी दराने निविदा मंजूर केल्या पाहिजेत म्हणून ते लोक कोर्टात गेलेले आहेत.

श्री. कपिल पाटील : या प्रश्नात दोन गंभीर बाबी आहेत. गेल्या दोन वर्षापासून गटई कामगारांना स्टॉल देण्याचा प्रश्न रखडलेला आहे. कंत्राटदारांचे आणि दलालांचे भले करण्यापेक्षा गटई कामगारांना या पैशाचे वाटप का केले जात नाही ? गटई कामगारांच्या स्टॉलच्या रक्कमेची मागणी पाटबंधारे विभागाने आपल्या विभागाकडे मागणी केली होती काय ?

श्री. चंद्रकांत हंडारे : गटई कामगारांना स्टॉल उपलब्ध करुन देतो शिवाय त्यांना 500 रुपये अनुदान देतो.

श्री. दिवाकर रावते : पाटबंधारे विभागाने सदरहू रक्कमेची मागणी आपल्याकडे केली होती काय?

श्री. चंद्रकांत हंडारे : नाही.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मागील अधिवेशनात गटई कामगारांना स्टॉल लवकरात लवकर उपलब्ध करुन द्यावेत यासंबंधी आपण शासनाला निदेश दिले होते. त्या अनुषंगाने सन्माननीय मंत्री महोदयांनी आश्वासन दिले होते. त्या आश्वासनांची अजून पूर्तता झालेली नाही. गटई कामगारांना आता तरी स्टॉल उपलब्ध करुन दिले जातील काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42827....

श्री. चंद्रकांत हंडारे : यासंदर्भात सध्या जी ऑर्डर दिली आहे...

श्री. कपिल पाटील : ती ऑर्डर रद्द करा...

श्री. चंद्रकांत हंडारे : सर्व बाबी तपासून त्यानंतर त्याबाबतीत विचार निश्चितपणे विचार करु.

---------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबई शहर व उपनगरातील मालमत्ता करामध्ये मोठी तफावत असल्यामुळे**

**त्यामध्ये समानता रहावी यासाठी नियोजन करण्याबाबत**

**(११) * ४३०३८ श्री. चरणसिंग सप्रा , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरातल्या मालमत्ता करामध्ये मोठी तफावत असल्याचे आढळून येत असल्याने शासनाच्या धोरणाप्रमाणे सध्या निवासासाठी ८३.५ टक्के व व्यावसायिक गाळ्यांना ११२ टक्के कर आकारण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) सदर मालमत्ता करामध्ये समानता आणण्याबाबत काही खास नियोजन आखले आहे काय असल्यास, त्याचा तपशील काय,

(३) करामध्ये समानता रहावी यासाठी नियोजन आखले नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे,श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : १) ज्या मालमत्तांना जलमापकाव्दारे पाणीपुरवठा होतो अशा मुंबई शहर व उपनगर या दोन्ही ठिकाणच्या निवासी इमारतींना करपात्र मुल्याच्या ८३.५% इतका मालमत्ता कर आकारण्यात येतो व अनिवासी इमारतींना करपात्र मुल्याच्या ११२.५% इतका कर आकारला जातो.

२) व ३) मालमत्ता करामध्ये सुसुत्रीपणा आणण्यासाठी करपात्र मुल्यावर आधारित करप्रणालीऐवजी, भांडवली मुल्यावर आधारित करप्रणाली लागू करण्याच्या दृष्टीने बहन्मुंबई महानगरपालिका विधेयक अधिनियमात सुधारणा करण्याबाबत आले आहे.

श्री. चरणसिंग सप्रा : सभापती महोदय, मुंबई शहरात जवळ जवळ 50 टक्के जनता ही निवासी आणि अनिवासी गाळयांमध्ये भाडेतत्वावर रहात आहेत. सध्या नव्याने कमर्शियल मॉल सुरु होत आहेत. ते मॉल देखील लीज ॲग्रीमेंटवर चालतात. प्रॉपर्टी टॅक्स वाढल्यावर अशी भीती निर्माण होत आहे की, लोक लीज ॲग्रीमेंट करणार नाहीत. ते अंडरकोट करुन करतील. तर यावर महानगरपालिकेने किंवा शासनाने काही उपाययोजना केलेली आहे काय ? थकलेला मालमत्ता कर भरण्याची मुदत वाढविताना दंडाची रक्कम 20 टक्के करण्याची योजना शासनाच्या विचाराधीन आहे. सदर दंडाची रक्कम 20 टक्क्यांवरुन 2 टक्क्यांवर करण्याची शिफारस संयुक्त समितीने केलेली आहे. सदर दंडाची रक्कम 20 टक्क्यांवरुन 2 टक्क्यांपर्यंत करण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे काय ?

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.43038....

श्री.राजेश टोपे : सन्माननीय सदस्य श्री. सप्रा यांनी दोन प्रश्न विचारले आहेत. त्याबाबतीत खुलासा करु इच्छितो की, आजची प्रॉपर्टी टॅक्स आकारण्याची कार्यपध्दती रेटेबल बेस सिस्टीमनुसार आहे. या ठिकाणी विशेषत: लीज ॲग्रीमेंटच्या संदर्भात बोलले गेले. 112.05 टक्क्यांपर्यंत प्रॉपर्टी टॅक्स रेटेबलच्या व्हॅल्यूवर आकारला जातो. लीजवर दिल्या जाणा-या प्रॉपर्टीज आहेत, त्यातल्या त्यात जी ॲक्च्युअल लीज असते, ती गृहीत धरली तर त्यावर 112.05 टक्क्यांपर्यंत प्रॉपर्टी टॅक्स लावला तर भाडयाने देणा-या व्यक्तीची प्रॉपर्टी टॅक्स भरण्यातच मोठी रक्कम खर्च होते, अशी कार्यपध्दती सध्याच्या करप्रणालीमध्ये आहे. लीज ॲग्रीमेंटच्या बाबतीत जास्त कर भरावा लागत आहे. यासंदर्भात शासन काय करीत आहे हे उत्तरातच नमूद केले आहे. कॅपिटल व्हॅल्यू बेस सिस्टीमवर आपण शिफ्ट करीत आहोत. प्रॉपर्टी टॅक्सच्या संदर्भात विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाची संयुक्त समिती स्थापन करण्यात आली आहे. त्या समितीचा फायनल ड्राफ्ट करण्यात आलेला आहे. या ड्राफ्टमध्ये सगळया गोष्टींचा अंतर्भाव करण्यात आला आहे. निवासी आणि अनिवासी प्रॉपर्टीच्या बाबतीत एक नवीन फॉर्म्यूला तयार होणार आहे, त्या फॉर्म्यूल्यात सुसूत्रता आणण्याचे मुख्य धोरण आहे. यादृष्टीकोनातून जेएनयूआरएमच्या ज्या अटी आणि शर्ती आहेत त्यासंदर्भात देखील काळजी घेण्यात आली आहे.

यानंतर श्री. कानडे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SSK/ SBT/ MMP/ 10:55

ता.प्र.क्र. 43038 पुढे सुरु ...

श्री. राजेश टोपे ...

निवासी आणि अनिवासी या सगळयांच्या बाबतीत फॉर्ममध्ये जी काही तरतूद असेल त्यामध्ये निश्चित प्रकारे सुसूत्रता आणण्याचे मुख्यतः धोरण आहे. यादृष्टीने काळजी घेण्यात आलेली आहे. दुसरा प्रश्न माननीय सदस्यांनी दंडाच्या रकमेबाबत विचारला आहे. याबाबतीत मी एवढेच सांगू इच्छितो की, यासंदर्भात विचार करण्यासाठी संयुक्त समिती नेमली होती. दंड भरण्याची मुदत 3 महिन्यापर्यंत होती ती वाढवून दिलेली आहे. तसेच दंड 20 टक्क्यावरुन 2 टक्के करण्याची शिफारस होण्यासाठी योग्य तो विचार केलेला आहे. यासंदर्भात मी एवढेच सांगेन की संयुक्त समितीचा फायनल ड्राफ्ट लवकरच सभागृहासमोर आम्ही आणत आहोत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला माननीय मंत्र्यांकडून माझ्या प्रश्नाला स्पेसिफिक उत्तर हवे आहे. 500 चौ.फूटाच्या सदनिका मलबारहिल, गिरगांव, दादर, खार, सांताक्रूझ, अंधेरी, बोरिवली, मुलुंड, घाटकोपर आणि सायन या भागातील आहेत त्यांना ऑक्युपेशन सर्टिफिकेट मिळालेले असेल आणि करपात्र मूल्य जे ठरविलेले आहे ते 1980,1990 आणि 2000 या 3 टप्प्यांमध्ये ठरविलेले असल्यामुळे या इमारतींचे करपात्र मूल्य या भागांमध्ये किती आहे ? मुंबई शहर आणि उपनगरातील मालमत्ता करामध्ये तफावत असल्याबद्दलचा हा विषय असल्यामुळे मी सदरहू प्रश्न विचारला आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी शहर आणि उपनगरातील 500 चौ.फूट सदनिकेचे 1980,1990 आणि 2000 सालातील करपात्र मूल्य किती आहे असा प्रश्न विचारला आहे. शहर आणि उपनगरामध्ये .....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी मगाशी सांगितलेल्या भागामध्ये मार्च किंवा एप्रिल 1980, मार्च किंवा एप्रिल 1990, आणि मार्च किंवा एप्रिल 2000 मध्ये नवीन झालेल्या इमारतींचे करपात्र मूल्य आणि त्यासाठी किती कर आकारणी झालेली आहे याची माहिती मला हवी आहे. सदनिकेसाठी करपात्र मूल्य ठरविल्यानंतर त्यासाठी कर किती येतो ? मुंबई शहर आणि उपनगरामध्ये करामध्ये तफावत आहे किंवा नाही ?

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी सिस्टीम कशी आहे ती सांगितली. रेटेबल व्हॅल्यू सिस्टीम आहे. 1980, 1990 आणि 2000 सालातील ज्या इमारती आहेत त्यावेळी सदर इमारतीची रेटेबल व्हॅल्यू त्यावेळी काढण्यात आलेली आहे.....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी स्पेसिफिक प्रश्न विचारला आहे. उत्तरामध्ये घोळ घालण्यात येऊ नये. मला स्पेसिफिक उत्तर हवे आहे. माहिती नसेल तर ती पटलावर ठेवा.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, कॅलक्युलेट करुन माहिती सांगावयाची असेल तर ती माहिती मी सदनाच्या पटलावर ठेवतो.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब यांनी प्रश्न विचारला आहे तो शहर आणि उपनगरे यामध्ये करामध्ये जी तफावत आहे त्यासंदर्भात विचारला आहे. शहरामध्ये हौसिंग सोसायटीमधील जागा असेल किंवा भाडेकरुची जागा असेल त्याठिकाणी आकारला जाणारा कर रेटेबल व्हॅल्यूच्या आधारावर आकारला जातो आणि उपनगरामध्ये तेवढीच जागा भाडे तत्वावर किंवा स्वत:ची असेल तर जो कर आकारला जातो त्यामध्ये तफावत आहे. उपनगरातील इमारतींना दोन ते अडीच पटींनी जास्त कर आकारला जातो. महापालिकेमध्ये सुध्दा याबाबतीत विचार झालेला आहे. शासनाकडे यासंदर्भातील एक विधेयक प्रलंबित आहे. रेटेबल व्हॅल्यूच्या आधारे कर आकारावयाचा असेल तर मुंबई शहरामध्ये कमी भरावयाचा आणि उपनगरामध्ये जास्त भरावयाचा अशी जी तफावत आहे ती शासन दूर करणार आहे काय ?

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.43038........

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या संदर्भात मी सुरुवातीलाच माहिती दिली आहे.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारला आहे. तफावत आहे का? असेल तर ती दूर करणार आहात का?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, हे नक्की आहे की, शासन यामध्ये रॅशनलायझेशन आणण्याचा प्रयत्न करीत आहे. रेंट ॲक्ट फ्रोझन झाल्यामुळे शहरामध्ये इमारत ज्यावेळी बांधली असेल त्यावेळी जे भाडे असेल ते गृहित धरुन रेटेबल व्हॅल्यू काढली जाते. त्यास अनुसरुन रेटेबल व्हॅल्यू शहर आणि उपनगरामध्ये समान आहे. निवासी इमारतीसाठी 83.5 टक्के आणि अनिवासी इमारतीसाठी 112.5 टक्के याप्रमाणे रेट ऑफ टॅक्स समान आहे. प्रॉपर्टी टॅक्स हा जून्या आणि नव्या इमारतीसाठी याप्रमाणे लावला जातो. हा बेस कॅपिटल व्हॅल्यूवर काढला तर या पध्दतीची समानता आणण्याचे काम, मुंबई शहर आणि उपनगरामध्ये कॅपिटल व्हॅल्यू बेसच्या माध्यमातून होऊ शकेल. या संदर्भात जॉईंट सिलेक्ट कमिटीचा फायनल ड्राफ्ट तयार झाला आहे. या संदर्भातील बिल दोन्ही सभागृहात निश्चितपणे आणणार आहोत आणि त्या अनुषंगाने निश्चित निर्णय होईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विधानपरिषद सदस्य अनुपस्थिती समितीचा अहवाल सादर करणे.

**मु.शी.**: विधानपरिषद सदस्य अनुपस्थिती समितीचा श्री.नवनाथ आव्हाड, वि.प.स. यांच्या विधानपरिषदेच्या बैठकींना 60 दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी अनुपस्थितीबाबतचा विशेष अहवाल सादर करणे व अहवालास अनुलक्षून प्रस्ताव.

श्री.मुझफ्फर हुसेन (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानपरिषद सदस्य अनुपस्थिती समितीचा श्री.नवनाथ आव्हाड, वि.प.स. यांच्या विधानपरिषदेच्या बैठकींना 60 दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी अनुपस्थितीबाबतचा विशेष अहवाल सभागृहाला सादर करीत आहे.

"ऑक्टोबर, 2007 मध्ये मुंबई येथून प्रसिध्द होणाऱ्या वृत्तपत्रामध्ये श्री.नवनाथ आव्हाड, वि.प.स. हे आजारपणामुळे रुग्णालयात दाखल असतानाही विधानपरिषद सदस्यांच्या हजेरीपटामध्ये नावासमोर स्वाक्षऱ्या असल्याचे वृत्त प्रसिध्द झाले होते. या संदर्भात चौकशी करुन अहवाल सादर करण्याची बाब माननीय सभापतींनी सदर समितीकडे सोपविली.

त्यानंतर समितीने दिनांक 15 डिसेंबर, 2007 रोजी पुणे येथील श्री.नवनाथ आव्हाड, वि.प.स.यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या प्रकृतीची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांचे कुटुंबीय तसेच त्यांच्यावर उपचार करणाऱ्या दिनानाथ मंगेशकर रुग्णालय, पुणे येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांशी चर्चा केली. श्री.नवनाथ आव्हाड, वि.प.स. दिनांक 18 ऑक्टोबर, 2004 रोजी धार्मिक कार्यक्रमास गेले असता त्या ठिकाणी धूर, धूप व इतर वासामुळे व त्यांना अगोदरपासून दम्याचा त्रास असल्यामुळे गुदमरण्याचा त्रास झाला. त्यांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्या दिवसापासून ते "हायपोक्सिया" या रोगामुळे कोमा अवस्थेत आहेत. श्वासोच्छवासाव्यतिरिक्त त्यांची कोणतीही हालचाल नाही. ते बोलू शकत नाहीत, लिहू शकत नाहीत, पलंगावरुन उतरु शकत नाहीत. माहे नोव्हेंबर, 2007 मध्ये रुग्णालयातील सर्व सोयी श्री.नवनाथ आव्हाड यांच्या कुटुंबियांनी त्यांच्या घरीच केल्यामुळे त्यांना घरी आणण्यात आले आहे. अशा रुग्णामध्ये सुधारणा होण्याचे प्रमाण फारच अल्प असते. श्री.आव्हाड यांना व्हेंटीलेटरवर ठेवलेले असल्यामुळे ते व्हेंटीलेटर तसेच त्यांच्या शरीराला लावलेल्या नळ्या शरीरात असेपर्यंत ते जिवंत राहू शकतील असे मत वैद्यकीय अधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

(नंतर श्री.खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुजफ्फर हुसैन .......

त्यानंतर देशातील इतर राज्य विधिमंडळांमधून श्री. नवनाथ आव्हाड, वि.प.स. यांच्या प्रकरणासारखी उदाहरणे आहेत काय याबाबत समितीने माहिती घेतली. त्यानुसार देशातील 22 राज्य विधानसभा व 4 विधानपरिषदा यांच्याकडून माहिती प्राप्त झाली. राजस्थान विधानसभेचे सदस्य श्री. किसन मोटवानी हे जवळपास एक वर्षापेक्षा जास्त कालावधीपर्यंत कोमावस्थेत असल्यामुळे सभागृहात अनुपस्थित होते. राजस्थान विधानसभेने अनुपस्थितीस अनुमती दिली पण त्यानंतर लगेच श्री. किसन मोटवानी यांचे दु:खद निधन झाले. अन्य राज्य विधान मंडळांमध्ये मात्र अशा प्रकारची घटना घडलेली नाही.

सन्माननीय सदस्य श्री. नवनाथ आव्हाड हे गेली साडे तीन वर्षेपेक्षा जास्त कालावधी बेशुध्दावस्थेत (कोमामध्ये) असून सभागृहातील त्यांच्या अनुपस्थितीचा कालावधी 60 दिवसांपेक्षा जास्त असल्यामुळे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 190, खंड (4) च्या तरतुदीनुसार त्यांची महाराष्ट्र विधानपरिषदेची जागा रिक्त झाली असल्याचे घोषित करण्यात यावे, अशी शिफारस समितीने अहवालात केली आहे. समितीचा सदर अहवाल सभागृहाने स्वीकारावा. सदर बाब अतिशय महत्वाची असल्यामुळे याप्रकरणी सभागृहाने निर्णय घ्यावा.

**सभापती** : सदस्य अनुपस्थिती समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

--------------

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : महोदय सन्माननीय सदस्य श्री. नवनाथ आव्हाड यांच्या संदर्भात जो 60 दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी अनुपस्थित असल्यासंबंधी विशेष अहवाल सादर केलेला आहे त्या अनुषंगाने आमची अशी मागणी आहे की, समितीने ही जी शिफारस केली आहे तो अहवाल अगोदर सभागृहासमोर येणे आवश्यक होते. या सभागृहात देशातील इतर राज्यांकडून माहिती मागवून राजस्थान विधानसभा व इतर विधानपरिषदांच्या अनुषंगाने उदाहरण दिलेले आहे. राजस्थान विधानसभेतील एका सन्माननीय सदस्याचा येथे उल्लेख करण्यात आला. राजस्थान विधानसभेने त्यांच्या एका सदस्याची एक वर्षाची रजा मंजूर केली परंतु दुर्देवाने त्या सदस्यांचा मृत्यू झाला म्हणून त्या सदस्याचे पद रिक्त झाले होते. पण देशात अन्य कुठल्याही ठिकाणी असे उदाहरण घडलेले नाही. सन्माननीय सदस्य श्री. नवनाथ आव्हाड हे जाणुनबुजून 60 दिवस गैरहजर राहिलेले नाहीत तर दुर्देवाने त्यांना दम्याचा आजार होता. ते एका सार्वजनिक कार्यक्रमात गेले असता त्यांना सफोकेशन होऊन त्यांचा दम्याचा अटॅक बळावला व त्यावेळेपासून ते कोमात गेलेले आहेत. मी त्यांना दोन वेळा भेटण्यासाठी गेलो, त्यांच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांशी देखील चर्चा केली. या देशात अशी कुठलीही गोष्ट अशक्य नाही, अशा प्रकारचे अनेक चमत्कार घडलेले आहेत. 20-20 वर्षे कोमात असलेले लोक नंतर शुध्दीवर आलेले आहेत. तसेच असे कुठलेही उदाहरण घडलेले नसताना केवळ नियमाचा आधार घेऊन एखाद्या सभासदावर दुर्देवाने घाला घातला असता म्हणा अथवा परमेश्वराच्या कोपामुळे म्हणा त्यांच्या बाबतीत अशा प्रकारे निर्णय घेऊन त्यांचे सभासदत्व रद्द करावे, हे योग्य आहे असे मला वाटत नाही. मी असे म्हणणार नाही, परंतु अशा प्रकारचे प्रसंग भविष्यात कोणावरही येऊ शकतात. म्हणून माझी माननीय मुख्यमंत्र्यांना अशी विनंती आहे की, केवळ नियमाला धरुन आणि नियमाचे काटेकोरपणे पालन करुन हा प्रस्ताव आजच येथे आणण्याची आवश्यकता नव्हता, इतर अनेक प्रस्ताव पडून आहेत. हक्कभंगाचे अनेक प्रस्ताव आम्ही मांडले परंतु दोन-दोन वर्षापर्यंत ते अहवाल सभागृहासमोर येत नाहीत. मग हा प्रस्ताव मात्र घाईघाईने आणण्याचे कारण काय ? आज सन्माननीय सदस्य श्री. नवनाथ आव्हाड यांच्या कुटुंबियांवर अतिशय भयानक परिस्थिती उद्‌भवलेली आहे. त्यासंदर्भात आम्ही माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीच्या वेळी चर्चाही केली होती आणि आपण सर्व मिळून त्यांच्या कुटुंबियांना मदत करु असेही

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ........

त्यावेळेस सांगितले होते. आणि अशा परिस्थितीत त्यांचे सदस्यत्व रद्द करुन त्यांच्या कुटुंबियांवर अगोदरच दुर्देवाने घाला घातलेला असतांना त्यात आणखी हे दु:ख त्यांना पेलावे लागणार आहे. आज त्यांच्या उपचारावर 25 लाखाच्या वर खर्च झालेला आहे. अशा परिस्थितीत हा निर्णय घेणे म्हणजे त्यांच्या कुटुंबियांना आणखी दुर्देवाला सामोरे जायला लावणे असे होईल, म्हणून हा प्रस्ताव आज मान्य करणे योग्य होईल असे मला वाटत नाहीत. या अनुषंगाने माझी माननीय मुख्यमंत्र्यांना अशी विनंती आहे की, हा प्रस्ताव आज सथगित ठेवण्यात यावा. कारण कोणावरही असा प्रसंग येऊ नये.

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ......

खरे म्हणजे सन्माननीय सदस्य 60 दिवस अनुपस्थित राहण्यासंदर्भात जो नियम आहे तो टेक्निकल आहे, कायद्याला धरुन आहे. परंतु आपण बरेच वेळा नियमामध्ये शिथीलता आणून निर्णय घेत असतो. आज या विधान परिषद सभागृहात सदस्य अनुपस्थितीच्या संदर्भात जो प्रस्ताव मांडलेला आहे तो प्रस्ताव संमत न करता तो स्थगित करावा अशी माझी आग्रहाची विनंती आहे.

डॉ. दीपक सावंत : माननीय सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नवनाथ आव्हाड यांच्या अनुपस्थितीच्या संदर्भात जो प्रस्ताव आलेला आहे तो विषय टेक्निकल आहे. त्यामुळे टेक्निकल विषयाच्या संदर्भात मी या ठिकाणी दोन-चार मुद्दे मांडणार आहे. एखादा माणूस कोमात गेला तर तो किती दिवस जिवंत राहू शकेल यासंदर्भात वैद्यकीय शास्त्राजवळ काही उत्तर नाही. मागील वर्षी रेल्वेमध्ये जो बॉम्बस्फोट झाला होता त्यासंदर्भात श्री. सावंत यांचे उदाहरण आपल्या डोळयासमोर आहे. श्री. सावंत हे बॉम्बस्फोटात जखमी झाले होते व अचानक कोमामध्ये गेले होते. परंतु आता ते पूर्वस्थितीला येण्याचा प्रयत्न करीत आहेत. श्री. सावंत हे आपल्या समोरचे ताजे उदाहरण आहे. त्यामुळे श्री. नवनाथ आव्हाड यांच्या संदर्भात सभागृहाने सहानुभूतीपूर्वक विचार करावा अशी माझी आग्रहाची विनंती आहे. एखाद्या सदस्याला तांत्रिक कारण दाखवून निलंबित करणे किंवा कायद्यात तरतूद आहे म्हणून कारवाई करणे योग्य होणार नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री नवनाथ आव्हाड यांच्या संदर्भात मानवतेच्या दृष्टीने विचार करावा अशी विनंती आहे. सन्माननीय सदस्य श्री. नवनाथ आव्हाड यांना दम्याचा त्रास होता तसेच ते एका कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी गेले असतांना त्यांना अटॅक आला व ते कोमात गेले. अशी अनेक उदाहरणे आहेत की, एखादा माणूस कोमात गेल्यावर तो 2-3 वर्षानंतर पूर्वस्थितीमध्ये येऊ शकतो. कोमात गेलेला माणूस पूर्वस्थितीला येऊ शकतो याचे ताजे उदाहरण श्री.सावंतच्या रुपाने आपल्याकडे आहे. सदस्य अनुपस्थितीच्या संदर्भात आपली जी नियमावली आहे त्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. या नियमावलीमध्ये कोमाच्या संदर्भात काही सुध्दा अंतर्भात करण्यात आलेला नाही. त्यामुळे ही बाब इनव्हूमन होऊ नये अशी माझी विनंती आहे. एखादी सन्माननीय सदस्या प्रसूतीमुळे अनुपस्थित राहिली व दोन तीन महिने बैठकीला उपस्थित राहू शकली नाही तरी त्यासंदर्भात नियमावलीमध्ये कोणताही अंतर्भाव नाही. प्रसूतीमुळे सन्माननीय सदस्या दोन-तीन महिने उपस्थिती

...2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....

राहू शकली नाही तर तिच्यावर सुध्दा 60 दिवसापेक्षा अधिक कालावधीसाठी अनुपस्थितीचा नियम लागू शकतो. त्यामुळे आपल्या नियमावलीमध्ये अनेक त्रुटी आहेत. आपली नियमावली पुन्हा तपासण्याची आवश्यकता आहे. वैद्यकीय आजाराची कारणे आणि त्यांसंदर्भातील बाबींचा समावेश आपल्या नियमावलीमध्ये करणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सहानुभूतीपूर्वक विचार करावा व यासंदर्भातील नियमावली तयार करतांना मेडिकल एक्सपर्ट, न्युरॉलॉजीस्टची टीम नेमून त्यावर सांगोपांग चर्चा घडवून आणावी. तसेच सन्माननीय सदस्य श्री. नवनाथ आव्हाड यांच्या संदर्भात सभागृहाने मानवतेच्या दृष्टीने विचार करावा.

सभापती महोदय, मला अजून एक मुद्दा मांडावयाचा आहे तो असा आहे की, ज्यावेळी सदस्य अनुपस्थितीच्या समितीमध्ये सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे तसेच सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांचा समावेश आहे. ज्यादिवशी सन्माननीय सदस्य श्री. नवनाथ आव्हाड यांच्या संदर्भात बैठकीत निर्णय घेण्यात आला होता त्यावेळेस सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे तसेच सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील हे त्या दिवशी इलेक्शन असल्यामुळे बैठकीसाठी उपस्थित राहू शकले नव्हते त्यामुळे या दोघा सन्माननीय सदस्यांना या विषयाच्या संदर्भात आपले विचार मांडता आले नव्हते. त्यामुळे या दोन्ही सदस्यांना पुन्हा विचार मांडण्याची संधी द्यावी अशी विनंती आहे. तसेच सन्माननीय सदस्य श्री. आव्हाड हे जाणीवपूर्वक काही अनुपस्थित राहिलेले नाहीत त्यामुळे या ठिकाणी मांडलेल्या अनुपस्थितीच्या प्रस्तावाला सर्व सन्माननीय सदस्यांनी विरोध करुन, सभागृहाने त्यांच्या बाबत सहानुभूतीपूर्वक विचार करावा व सभागृहाने हा प्रस्ताव फेटाळावा अशी माझी नम्र विनंती आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, देशाची घटना, कायदा आणि नियमावली याच्या पेक्षा त्यातील तरतुदी कशासाठी आहेत, तो उद्देश प्रामुख्याने तपासला गेला पाहिजे. कायद्यावर बोट ठेवून निर्णय घेण्यापेक्षा जो उद्देश आहे तो तपासला जाणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री. नवनाथ आव्हाड बैठकीसाठी का येत नाहीत यासंदर्भातील कारण अगदी स्पष्ट आहे. सन्माननीय सदस्य जाणीवपूर्वक गैरहजर राहिले असते तर आपण समजू शकलो असतो परंतु सन्माननीय

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

सदस्य जाणीवपूर्वक गैरहजर राहिलेले नाहीत. दुर्दैवी अपघातामुळे ते हजर राहू शकलेले नाहीत, त्यांच्यावर झालेल्या आघाताने ते हजर राहू शकलेले नाहीत. सदस्य जाणीवपूर्वक गैरहजर राहिला तर सदस्यांची अनुपस्थिती गृहीत धरली पाहिजे. हे कृत्य त्यांनी जाणीवपूर्वक केले नसून त्यांच्यावर झालेल्या नैसर्गिक आघाताने हे कृत्य घडलेले आहे. अनैसर्गिक आघाताची शिक्षा सन्माननीय सदस्यांना देणे योग्य नाही. त्यांनी जाणीवपूर्वक न केलेल्या कृत्याची शिक्षा त्यांना देणे योग्य नाही. गैरहजर राहण्याच्या चुकीमध्ये त्यांचा कोणताही संबंध नाही.

यानंतर श्री. खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील ..

हे अतिशय अमानवीय, असंसदीय आहे तसेच कायद्याच्या आणि घटनेच्या मूळ उद्देशाला धरुन होणार नाही. हे मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. सभापती महोदय, माझी आपणाला, सभागृहाला तसेच माननीय मुख्यमंत्र्यांना कळकळीची अशी विनंती आहे की, सदस्य अनुपस्थिती समितीने काहीही शिफारस केलेली असली तरी हा अहवाल त्यांनी स्वत: होऊन स्थगित करावा , माननीय मुख्यमंत्र्यानी हा प्रस्ताव मांडू नये.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, सदस्य अनुपस्थिती समितीच्या अहवालाच्या निमित्ताने नियमामध्ये कोणता बदल करावयास पाहिजे किंवा त्याबाबतीत पुन: विचार करावयास पाहिजे असे अनेक मुद्दे समोर आलेले आहेत. या ठिकाणी "कोमाचा" उल्लेख करण्यात आला आहे. त्याप्रमाणेच अभूतपूर्व परिस्थितीमध्ये स्मृतीभ्रंश किंवा इतरही असे काही आजार असू शकतात त्यामुळे आम्ही असे सुचवलेले आहे की, मनुष्याला वैद्यकीय दृष्टया स्वत:ची संवेदनशीलता आणि शुध्दी शाबूत न राहता त्याच्या शक्तीच्या बाहेरील अशा पध्दतीचे कोण कोणते आजार होऊ शकतात हे पाहण्यासाठी वैद्यकीय तज्ज्ञांची एखादी समिती गठीत करुन हया आजारांचा समावेश नियमांमध्ये करावयास पाहिजे. अशा पध्दतीने अमुक अमुक कारणामुळे हा सन्माननीय सदस्य अनुपस्थित राहिला व अमुक अमुक कारणे असू शकतात असे सांगावयास पाहिजे. हा माझा पहिला मुद्दा आहे. मघाशी सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी उल्लेख केला होता की प्रसूतीच्या रजेसाठीसुध्दा ...........

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या सदस्य अनुपस्थिती समितीच्या सदस्या आहेत. त्यामुळे त्यांना या संदर्भात बोलता येणार नाही.

डॉ.नीलम गो-हे :सभापती महोदय, मी केवळ या समितीच्या अहवालाबद्दलच बोलत नाही तर नियमांच्या बाबतीत मी बोलत आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांना सांगू इच्छितो की, सदस्य अनुपस्थिती समितीच्या आपण सदस्य आहात ..

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, त्या दिवशी निवडणूक असल्यामुळे ज्या ज्या सन्माननीय सदस्यांच्या निवडणुका होत्या ते सन्माननीय सदस्य त्या दिवशी समितीच्या बैठकीला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आलेले नव्हते,येऊ शकले नव्हते त्यामुळे अशा परिस्थितीत. त्या सन्माननीय सदस्यांची स्वत:ची निवडणूक आहे याचा देखील विचार समितीची बैठक ठरवितांना करावयास पाहिजे होता.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : हा अपवाद होऊ शकत नाही.

डॉ.नीलम गो-हे : ठीक आहे. सभापती महोदय, भारतीय जनता पक्षाच्या एका सन्माननीय सदस्याचे सदस्यत्व रद्द होणार असल्यामुळे सन्माननीय सदस्यांचा रामशास्त्री प्रभुणे बाणा मी समजू शकते परंतु जो सन्माननीय सदस्य मृत्यूशय्येवर झगडत आहे त्यांच्या बाबतीत आमचे मत न ऐकता जर निर्णय घेतला असेल तर आमचाही बोलण्याचा अधिकार आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी कृपया खाली बसावे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे सदस्य अनुपस्थिती समितीच्या सदस्या असल्यामुळे, त्यांचे या सबंधातील म्हणणे कामकाजातून काढून टाकण्यात यावे.

(एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात )

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी या संदर्भात काही तांत्रिक मुद्दे उपस्थित केलेले आहेत. मी आणखी एक दोन गोष्टींकडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. सन्माननीय सदस्य श्री.नवनाथ आव्हाड हे गेल्या चार वर्षापासून सभागृहात अनुपस्थित राहिले आहेत.सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांना मी सांगू इच्छितो की, या ठिकाणी 60 दिवस अनुपस्थितीसंबंधीचा नियम सांगण्यात आला आहे. नियमांचे जर काटेकोर पालन करावयाचे होते तर 60 दिवस कधीच उलटून गेले होते, असे असतांना आपण एवढे दिवस का थांबलो ? आपण एवढे दिवस थांबलो ते योग्यच होते कारण अनुपस्थित राहिलेला सन्माननीय सदस्य दुर्दैवाने अजूनही आजारीच आहे. मला हेसुध्दा माहिती आहे की या सभागृहातील असे अनेक सन्माननीय सदस्य आहेत . मी आदरपूर्वक त्यांचा नामोल्लेख करीत नाही. गेली चार वर्षे त्यांनी बाहेर सहया केलेल्या आहेत परंतु ते सभागृहात आलेले नाहीत. सभागृहाच्या प्रोसिडींग्जमध्ये त्यांचा एका शब्दाचाही सहभाग नाही. मात्र दुर्देवाने आजारी पडलेल्या एखाद्या सन्माननीय सदस्यांच्या बाबतीत

3...





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

आपण काटेकोर यासाठी राहत आहोत की तो अनुपस्थित राहिला आहे. सभागृहाच्या कामकाजात भाग घेता यावा यासाठी सन्माननीय सदस्यांला लोकांनी निवडून दिलेले आहे.परंतु तो सन्माननीय सदस्य 60 दिवस अनुपस्थित राहिला आहे....

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्याच्या भाषणाला माझा विरोध नाही परंतु त्याच्या एका वाक्याला माझी हरकत आहे.सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी या ठिकाणी बोलण्याच्या ओघात असा उल्लेख केला की, या सभागृहातील किती तरी असे सन्माननीय सदस्य आहेत की ज्यांचा मी नामोल्लेख करीत नाही परंतु ते चार चार वर्षे येथे येतात बाहेरच्या बाहेर सहया करतात परंतु सभागृहाच्या प्रोसिडींग्जमध्ये त्यांचा एका शब्दाचासुध्दा सहभाग नसतो. अशा सन्माननीय सदस्यांचे सभासदत्व का रद्द करण्यात येत नाही. असे बोलून त्यांनी सर्वच सन्माननीय सदस्यांच्या बाबतीत असा संभ्रम निर्माण केलेला आहे.चार वर्षे बाहेर सहया करणारे परंतु सभागृहात न येणा-या सन्माननीय सदस्यांची त्यांनी नावे सांगावीत. त्याबाबतीत माझी काहीही हरकत नाही. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी अशा सदस्यांची नावे सांगावीत परंतु सर्वच सन्माननीय सदस्यांच्या बाबतीत संभ्रम निर्माण करु नये असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**सभापती** : आपला हरकतीचा मुद्दा मान्य आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांच्या हरकतीच्या मुद्याच्या अगोदर "अनेक सन्माननीय सदस्य" मी शब्द मागे घेतो आणि त्या सन्माननीय सदस्याचे नाव सांगतो.

श्री.पांडुरंग फुंडकर : त्याचे नाव कशाला सांगता ?

काही सन्माननीय सदस्य : त्यांचे नाव सांगा.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझी आपल्याला अशी विनंती आहे की जर एखादा सन्माननीय सदस्य दुर्देवाने आजाराच्या कारणासाठी गैरहजर राहिला असेल तर त्याचे सदस्यत्व रद्द केले आहे..........

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

अशी आणखी काही उदाहरणे असल्यास ती दाखवून द्या. सभापती महोदय, येथे सन्माननीय सदस्यांनी जो विषय मांडला, त्यावर बोलत असताना त्यांनी असे म्हटले की, वैद्यकीय शास्त्रामध्ये असा रूग्ण कोठल्याही प्रकारे शुद्धीमध्ये येऊ शकत नाही असे काहीही सांगितलेले नाही. केवळ डॉक्टरांनी तेथे आपले मत संदिग्ध दिलेले आहे. सभापती महोदय, एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यामध्ये दुर्दैवाने असा प्रसंग आला असता आपण त्याच्याबाबतीत असा निर्णय घेऊन त्याचे सदस्यत्वच रद्द करणार असाल तर महाराष्ट्रातील या संवेदनशील सभागृहामध्ये ते योग्य होणार नाही असे मला वाटते. हे पुरोगामी राज्य आहे. सभापती महोदय, मी एक सभ्यतेचा भाग म्हणून येथे कोणाही सदस्याचे नाव घेतलेले नाही. परंतु अनेकांना ते सदस्य कोण आहेत हे माहिती आहे.

सभापती महोदय, आणखी एक मुद्दा मी या निमित्ताने आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो. आता सध्या पार्लमेंटमध्ये सरकार पक्षाकडून विश्वासदर्शक ठराव मांडण्यात येणार आहे आणि अशा वेळी ज्या सदस्यांना अनेक वर्षांच्या शिक्षा झालेल्या आहेत, गुन्हेगारी स्वरूपाच्या प्रकरणामध्ये त्यांना या शिक्षा झालेल्या आहेत अशा सदस्यांना देखील सभागृहामध्ये मतदानासाठी बोलाविले जाणार आहे. कारण ते गुन्हेगार असले तरी ते त्या सदनाचे सदस्य आहेत असा अर्थ त्याबाबत लावला जात आहे. आता हा माणूस तर तसा नाही, त्यांच्यावर कोणत्याही प्रकारे गुन्हेगारी आरोप नाहीत तसेच त्याने जाणीवपूर्वक सदनामध्ये गैरहजेरी लावली आहे असेही नाही, त्याच्या गैरहजेरीमध्ये बेफिकीरी दिसून येते आहे असेही नाही. तेव्हा हा प्रस्ताव आपण मागे घेऊन एक चांगला संकेत देशात जावा असे करावे एवढेच मी आपल्याला सांगेन.

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या सदनाचे एक सन्माननीय सदस्य श्री.नवनाथ आव्हाड यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते सदनामध्ये सतत 4 वर्षे गैरहजर राहिले आहेत त्या संबंधातील जो प्रस्ताव येथे मांडलेला आहे त्याबद्दल येथे अनेकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. पण हा प्रश्न केवळ भावनिक आहे असे आपण समजू नये. मी देखील आता कोणत्याही भावनांच्या ओघात येऊन काही बोलणार नाही. पण यामध्ये वस्तुस्थिती अशी आहे की, या सदनामध्ये सदस्य म्हणून येणारी व्यक्ती ही निरनिराळ्या पद्धतीने सदनामध्ये येत असते. कोणी विधानसभेतून येथे येऊ शकतात तर कोणी स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी म्हणून येऊ शकतात. मात्र येथे आलेल्या सदस्याची टर्म ही 6 वर्षापुरतीच असते. आता या ठिकाणी कोमामध्ये गेलेल्या रूग्णाबाबत

..... क्यू 2 ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कुलकर्णी ....

सांगताना सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले की, असा माणूस 15 वर्षांनी देखील शुद्धीवर येऊ शकतो. आता सन्माननीय श्री.नवनाथ आव्हाड हे या सदनामध्ये सदस्य म्हणून आलेले आहेत आणि त्यांच्यावर आज जो प्रसंग ओढवला आहे त्यामध्ये आमच्या सर्वांच्याच सहवेदना, सहानुभूती आहे. दुर्दैवाने त्यांच्यावर आघात झाला आणि त्या दिवसापासून ते गेली चार वर्षे कोमामध्ये आहेत ही वस्तुस्थिती आहे, ती कोणीही नाकारलेली नाही. आता त्या संबंधात येथे 60 दिवसांचा नियम दाखविला गेला आहे. आपल्या नियमावलीतील तो नियम असा आहे की, कोणीही सदस्य सतत 60 दिवस सदनामध्ये हजर राहिला नाही तर त्याचे सदस्यत्व रद्द केले जाऊ शकते. म्हणजेच याबाबतीत 60 दिवसांची मुदत आहे आणि केवळ त्या नियमावर बोट ठेवून हे सदस्यत्व रद्द केले जात आहे का ? तर ते तसे नाही. या ठिकाणी त्या संबंधात जो अहवाल दिलेला आहे त्यामध्ये त्याबाबतची सर्व पार्श्वभूमी दिलेली आहे. गेली चार वर्षे श्री.नवनाथ आव्हाड हे कोमामध्ये असल्याने त्यातून ते सावरतील हे सहजी शक्य नाही असा डॉक्टरांनी अहवाल दिलेला आहे. त्यामुळे आम्हाला या निमित्ताने कोणावर तरी कुरघोडी करायची आहे, त्यांच्या जागी कोणाला तरी भरायचे आहे असे कृपा करून आपण कोणी समजू नये. तेव्हा येथे कोणाबद्दलही कितीही सहानुभूतीची भावना असली तरी शेवटी भावनेपेक्षा कर्तव्य मोठे आहे, महत्त्वाचे आहे. त्यामुळे केवळ कर्तव्य भावनेतूनच हा अहवाल दिला गेलेला आहे हे लक्षात घेऊन आपण तो स्वीकारावा अशी आग्रहाची विनंती आहे.

( यानंतर श्री. सरफरे .... आर 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, या सभागृहाचे माननीय सदस्य तसेच सदस्य अनुपस्थिती समितीचे समिती प्रमुख श्री. सय्यद मुझफ्फर हुसेन नझर हुसेन यांनी सभागृहामध्ये अहवाल मांडण्यास परवानगी मागितल्यानंतर आपण ती परवानगी दिली. त्यानंतर हा अहवाल या सभागृहाची मालमत्ता झाली आहे असे मी समजतो, आणि त्यादृष्टीने मी माझे मत याठिकाणी मांडतो.

सभापती महोदय, याठिकाणी सांगण्यात आले की, ज्यावेळी एखादा रुग्ण रेस्पिरेटरवर आणि व्हेंटिलेटरवर असल्यामुळे तो कोणत्याही प्रकारच्या आपल्या ॲक्टिव्हिटीज करीत नाही, सही करु शकत नाही, बोलू शकत नाही. फक्त त्याचा श्वास आणि हृदय चालू असते. अशा रुग्णांच्या बाबतीत डब्लू.एच.ओ. ने वेगळी व्याख्या केली आहे. अशा विषयामध्ये आपण धार्मिक आणि भावनिक होतो, त्यामुळे ती व्याख्या अजून आपल्याला अवगत झालेली नाही. जोपर्यंत एखाद्या रुग्णाचे हृदय आणि फुफ्फुस चालू असते तोपर्यंत तो रुग्ण जीवंत आहे असे समजले जाते. परंतु आजच्या काळात जरी त्या रुग्णाचे हृदय आणि फुफ्फुस चालू असले तरी त्याचा मेंदू मृत झाल्यामुळे तो मृत झाल्याची कन्सेप्ट डब्लू.एच.ओ. ने मान्य केली आहे. रेस्पिरेटरमुळे हृदय आणि फुफ्फुस कितीही काळ चालू रहात असल्यामुळे माणूस जीवंत राहू शकतो.परंतु त्याचा मेंदू एकदा मृत झाल्यानंतर त्याच्यावर कितीही उपचार केले तरी तो त्या आजारामधून बाहेर येऊ शकत नाही. सभापती महोदय, समितीने आपल्या अहवालामध्ये त्यासंबंधीची परिस्थिती विशद केली आहे. माननीय सदस्यांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबियांशी बोलून त्यासंबंधीचा अभ्यास केला आहे. त्यानुसार घटनेतील कलम 190(4) मधील तरतुदीनुसार सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधीत त्यांना रजेचा अर्ज लिहिता येत नाही, त्यांना आमदार म्हणून मिळत असलेल्या प्रवास भत्ता, दैनिक भत्ता किंवा इतर भत्त्यांकरिता सही करता येत नाही. मध्यंतरी वर्तमानपत्रामध्ये छापून आलेल्या एका बातमीचा या अहवालात उल्लेख करण्यात आला आहे. या सभागृहाच्या तीन हजेरी पटांवर त्यांची स्वाक्षरी असून त्यांच्या नावाने स्थानिक विकास निधीमधून विविध प्रकारच्या कामांची नियोजन विभागाकडे शिफारस करण्यात आली होती. तेव्हा याबाबतीत भावनेच्या आधारावर हा विषय न मांडता कर्तव्य म्हणून जी काही घटनात्मक जबाबदारी आहे ती पार पाडली पाहिजे. भावनेच्या दृष्टीकोनातून मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करीन की, माजी आमदार म्हणून त्यांच्या वैद्यकीय बिलांचा भरणा मुख्यमंत्री निधीमधून करावा. माजी आमदार म्हणून मिळणाऱ्या सवलती त्यांना आणि त्यांच्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कुटुंबियांना कायम मिळणार आहेत. त्यामुळे या प्रकरणी आपण त्यांच्यावर खूप अन्याय करीत आहोत असे मला वाटत नाही. शेवटी आपल्याला ब्रेन डेड ही डब्लू.एच.ओ. ची कन्सेप्ट मान्य करावी लागेल. त्यादृष्टीने आपण याठिकाणी निर्णय घेणे अत्यंत गरजेचे आहे असे मला वाटते.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय सदस्यांनी आता सांगितले की, या संदर्भात डब्ल.एच.ओ. या संस्थेने काही निकष ठरविले आहेत. त्याप्रमाणे जर रुग्णांचा मेंदू चालत नसेल तर त्याला मृत घोषित केले जाते. अशाप्रकारचा उल्लेख या अहवालामध्ये आलेला आहे काय? माननीय मुख्यमंत्र्यांना आपण केलेली विनंती अतिशय चांगली आहे. तशाप्रकारची सहानुभूती भारतीय जनता पक्षाकडे आहे. त्यामुळे याबाबतीत तांत्रिक मुद्दा असा की, डब्लू.एच.ओ. या संस्थेने जे निकष स्वीकारले आहेत, ते भारत सरकारने स्वीकारले आहेत काय? त्यानुसार मेंदू मृत घोषित झाल्याचा उल्लेख अहवालात आहे काय?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या हरकतीच्या मुद्याला माझे समर्थन आहे. मी या सभागृहामध्ये इच्छामरणासंबंधी अशासकीय विधेयक मांडले होते. एखाद्या व्यक्तिचा ब्रेन डेड झाला तर त्या व्यक्तिला डेड डिक्लेअर करावे यासाठी ते विधेयक आणले होते. त्यावेळी मंत्रिमहोदयांनी अशाप्रकारचे विधेयक आणणे असंवेदशील होईल म्हणून त्याला विरोध केला होता.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 11:30

डॉ.दीपक सावंत . . . .

याला कायद्यानुसार बंदी आहे आणि निदान भारतामध्ये तरी यासाठी बंदी आहे. फक्त टोरँटो मध्ये हा कायदा करण्यात आला होता, परंतु तेथे देखील तो मागे घेण्यात आलेला आहे. डब्ल्युएचओ ने जर अशा प्रकारे निकष केले असतील तर सन्माननीय सदस्यांनी कृपया त्याची प्रत मला द्यावी.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून मी एक बाब सांगू इच्छितो. मी कन्सेप्टच्या बाबतीत असे सांगितले की, अजूनही आपल्या देशामध्ये ब्रेन डेड ही कन्सेप्ट मान्य झालेली नाही. पण याठिकाणी डब्ल्युएचओ ने ही कन्सेप्ट दिलेली आहे. We are not declaring him dead.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, He is not dead.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, हे मान्य आहे. पण ही कन्सेप्ट आहे हे लक्षात घेण्यात यावे. जर ब्रेन डेड असेल तर इच्छा व्यक्त करण्याचा प्रश्नच येत नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे "He is not dead, it is a fact."

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, धन्यवाद.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी अतिशय गंभीर मुद्दा उपस्थित केलेला आहे की, पहिली गोष्ट म्हणजे ब्रेन डेड ही कन्सेप्ट अद्याप पर्यंत मान्य झालेली नाही. दुसरी गोष्ट म्हणजे ब्रेन डेड असला तरी त्यांना अद्याप डेड म्हणून जाहीर केलेले नाही. त्यामुळे त्याबाबतीत देखील तपासणी झाली पाहिजे. तिसरा मुद्दा म्हणजे माजी सन्माननीय सदस्य श्री.सदानंद वर्दे यांनी इच्छा मरणाच्या बाबतीत विधेयक मांडण्याचा प्रयत्न केला होता. पण सभागृहाने ते विधेयक फेटाळलेले आहे. या देशाचा कायदा, या देशाची घटना अजूनही इच्छा मरणासाठी परवानगी देत नाही. या स्थितीमध्ये भारत सरकारने ब्रेन डेडला परवानगी दिलेली आहे काय ?

**सभापती** : याबाबतीत "नाही" असे त्यांनी सांगितले आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, याठिकाणी ब्रेन डेड म्हणून डिक्लेअर केलेले आहे काय ? त्या संबंधात अहवाल प्राप्त होईपर्यंत या समितीचा अहवाल पेंडींग ठेवण्यात यावा.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

. . . .एस-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले की, इच्छा मरणाच्या बाबतीत अशासकीय ठराव आणला होता. . . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आम्हाला सदरहू अहवाल आताच प्राप्त झालेला आहे. आम्ही अजूनपर्यंत अहवाल वाचलेला नाही. या समितीच्या काही बैठका झालेल्या आहेत. त्यानुसार पहिल्या बैठकीमध्ये मार्गदर्शक तत्वे व रजेसाठी ग्राह्य कारणांची यादी विचारात घेऊन त्यामध्ये फेरफार करण्यात आले. तसेच श्री.नवनाथ आव्हाड, वि.प.स.यांच्या सभागृहातील अनुपस्थिती बाबत त्यांच्या निवासस्थानी तसेच पुणे येथील दिनानाथ मंगेशकर रुग्णालयास भेट देण्याचे ठरविण्यात आले.

सभापती महोदय, दुसऱ्या बैठकीमध्ये श्री.नवनाथ आव्हाड, वि.प.स.यांच्या निवासस्थानी समितीने भेट देऊन त्यांच्या कुटुंबियांशी त्यांच्या प्रकृतीबाबत चर्चा केली. तसेच त्यांच्यावर उपचार करणारे वैद्यकीय अधिकारी यांच्याशी चर्चा केली.

सभापती महोदय, तिसऱ्या बैठकीमध्ये श्री.नवनाथ आव्हाड, वि.प.स.यांच्या सभागृहातील अनुपस्थितीबाबत चर्चा केली आणि देशातील सर्व राज्य विधानमंडळा-कडून श्री.आव्हाड, वि.प.स.यांच्यासारखे प्रकरण आहे काय याबाबतची माहिती मागविण्याचा निर्णय घेतला.

सभापती महोदय, यानंतर जी निर्णयासाठी चौथी बैठक झाली, त्यावेळी फक्त दोनच सन्माननीय सदस्य उपस्थित होते. समितीचे बाकीचे सन्माननीय सदस्य त्यादिवशी निवडणूक असल्यामुळे गैरहजर होते. त्यादिवशी बैठकीसाठी समितीचे समिती प्रमुख सन्माननीय सदस्य श्री.सय्यद मुझफ्फर हुसेन आणि सन्माननीय सदस्य श्री.सदाशिवराव पोळ हे दोनच सन्माननीय सदस्य उपस्थित होते. ज्या दिवशी सन्माननीय सदस्य श्री.नवनाथ आव्हाड यांचे सभासदत्व रद्द करण्याबाबत निर्णय झाला, त्या दिवशी फक्त दोनच सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

**सभापती** : कोरम तर असणारच.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, त्यादिवशी निवडणूक असल्यामुळे काही सन्माननीय सदस्य गैरहजर होते आणि त्यादिवशी जाणीवपूर्वक ही बैठक घेण्यात आली. त्यावेळी जर हा निर्णय घेतला असेल तर ते योग्य नाही. या समितीचे सर्व सन्माननीय सदस्य हजर असताना निर्णय





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

घेतला असता . . . .परंतु हे बरोबर नाही. अशा प्रकारे समितीतील इतर सन्माननीय सदस्य अनुपस्थित असताना, केवळ दोन सन्माननीय सदस्यांनी निर्णय घेणे हे योग्य नाही. तसेच दोन सन्माननीय सदस्यांच्या शिफारशीवर जर आपण एखाद्या सन्माननीय सदस्याचे सभासदत्व रद्द करणार असाल तर देशाच्या दृष्टीने, संकेताच्या दृष्टीने, मॅसेजच्या दृष्टीने, आपल्या महाराष्ट्र राज्याच्या दृष्टीने हे संयुक्तिक होणार नाही.म्हणून मी माननीय मुख्यमंत्र्यांना वारंवार विनंती करीत आहे की, सभागृहामध्ये अशा प्रकारचा प्रस्ताव येण्यापासून थांबविण्यात यावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला अत्यंत खेद होत आहे की, या सदनामध्ये एका दुर्दैवी घटनेच्या बाबतीत अशा प्रकारे चर्चा करीत असताना, आमच्याच एका सहकाऱ्याच्या बाबतीत आपण काय-काय बोलत आहोत ? कसे बोलत आहोत ?

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

अनेकदा राजकीय समीकरणासाठी जेव्हा हे सगळे घडते त्यावेळी तुमच्या अंतस्थ अशा भावना व्यक्त होतात याचा मला खेद होतो. हा अहवाल आमच्या हातात आला. आपण कोणत्या पक्षाचे आहोत यापेक्षाही आपण या विधिमंडळाचे सदस्य आहोत आणि त्यातही या वरच्या सभागृहाचे सदस्य असलो तर आपल्या वागण्यामध्ये आणखी थोडासा भारदस्तपणा असावा अशी अपेक्षा आहे. श्री. नवनाथ आव्हाड यांच्या बाबतीत जे घडले ते त्यांच्या कुटुंबाकरिता अत्यंत दुर्दैवी आहे. अशीच एक घटना मागे घडली होती. या सदनातील भारतीय जनता पक्षाचे सदस्य श्री. धरमचंद चोरडिया हे अपघातामध्ये जखमी झाले होते. ते मुंबई हॉस्पिटलमध्ये असताना मी त्यांना दोन तीन वेळा भेटावयास गेलो होतो. ते या सदनातील एक जबरदस्त सदस्य होते. तेही असेच कोमात होते. आज ते धडधाकट आहेत. पण आपण असे म्हणून शकत नाही. त्यांची टर्म संपली त्यामुळे ते निवृत्त झाले. ते परत या ठिकाणी आले नाहीत पण ते आजही कार्यरत आहेत. हा अहवाल तयार झाला त्यावेळी आपण हे लक्षात घ्यावयास पाहिजे होते. या समितीचे प्रमुख म्हणून ही त्यांची नैतिक जबाबदारी आहे की, माझ्या समितीवरच्या सदस्यांची निवडणूक असेल तर ही बैठक 26 तारखेच्या ऐवजी दुसऱ्या दिवशी 27 तारखेला लावू शकले असते. अगदी तीच तारीख पकडावयास पाहिजे असे नाही. मग त्यातून हे सगळे गुंते निर्माण होतात. त्याच्या मागचा उद्देश हा संशयास्पद निर्माण होतो. मी आक्षेप घेणार नाही कारण ते माझ्या सदनाचे सदस्य आहेत. पण अंतर्मुख होऊन आणि प्रामाणिकपणे समिती प्रमुख म्हणून सांगावे की, त्या दिवशीच्या बैठकीमध्ये कोण उपस्थित होते ? या ठिकाणी सचिव बसलेले आहेत. फक्त सचिव आणि एकटे समिती प्रमुख होते. त्यामुळे हा अहवाल आणण्यामध्ये आपण न्याय दिला आहे काय ? 2004 साली घडलेली घटना आहे. 2008 मध्ये काय घाई होती ?

श्री. मुझफ्फर हुसैन : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, त्या बैठकीमध्ये समिती प्रमुख आणि सचिव उपस्थित होते. त्या दिवशी बैठकीमध्ये सन्माननीय सदस्य श्री. सदाशिवराव पोळ उपस्थित होते.

श्री. दिवाकर रावते : मी ते वाचले आहे. मी त्यांच्याबद्दल बोलत नाही.

**सभापती** : ते वाक्य मी कामकाजातून काढून टाकत आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी असे म्हणालो की, मी बोलणार नाही, भावना व्यक्त करणार नाही. काही सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत. मी सांगू इच्छितो की, अत्यंत हिडीसपणे एखाद्या व्यक्तिची निर्भत्सना करणे तुम्हाला जमत असेल पण आम्ही कितीही आक्रमकपणे बोलत असलो तरी माणसाला असे हिडीसपणे वागवणार नाही. अगदी शत्रूलाही वागवणार नाही. सभापती महोदय, याच अहवालामध्ये कौल आणि शकधरचा उल्लेख आहे. ज्या ज्या वेळी आम्ही गुंते निर्माण करतो त्यावेळी कौल आणि शकधर यांचे पुस्तक घेऊन उभे राहतो आणि आपण त्याप्रमाणे जो निर्णय देता तो आपण वंदनीय मानतो. या ठिकाणी कौल आणि शकधर यांनी जे म्हटलेले आहे ते महत्वाचे आहे. या बैठकीत संविधानाच्या अनुच्छेद 190(4) मधील तरतूदी वाचून दाखविण्यात आल्या. श्री. आव्हाड, वि.प.स. यांची एकूण 98 दिवसांची अनुपस्थिती झालेली असल्याने भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 190(4) च्या तरतुदीनुसार सदर जागा रिक्त म्हणून घोषित करता येईल. याबाबतचा निर्णय समितीने घ्यावा असे प्रधान सचिवांनी समितीस सांगितले. तसेच सचिवांनी खालीलप्रमाणे माहिती दिली. हा सर्वात महत्वाचा भाग आहे. यामध्ये असे म्हटले आहे की, "ही अपवादात्मक अशी घटना आहे." हे कोणाचे वाक्य आहे ? हे वाक्य सचिवांचे असेल तर त्यांना धन्यवाद देतो. यामध्ये असे म्हटले आहे की, ही अपवादात्मक अशी घटना आहे. अशी घटना लोकसभेमध्ये सुध्दा घडली नसावी असे मला वाटते. याबाबतीत कौल आणि शकधर यांच्या पुस्तकातील प्रकरण 16 मधील तरतुदींकडे मी समितीचे लक्ष वेधू इच्छितो. या तरतुदीमध्ये असे म्हटले आहे की, "The constitutional provisions are only directory and not mandatory and a seat may not be declared vacant unless there is a contumacious disregard of duty as a member of the House."

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

या प्रत्येक शब्दाचा डिक्शनरीतून अर्थ काढून त्याची चिकित्सा करीत बसलो तर त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.आव्हाड हे कोठेच बसत नाहीत. यामध्ये पुढे असे म्हटले आहे की, "The power to declare a seat vacant being only an enabling power, it is within the competence of the House to condone the absence of any member exceedingt a period of sixty days." या सभागृहाचा किती मोठा सन्मान या वाक्यामध्ये कौल आणि शकधर यांनी लिहून ठेवला आहे. अशाप्रकारे अगतिकतेमध्ये सापडलेला एखादा सदस्य असेल तर हा गैरहजेरीचा कालावधी क्षमापित करण्याचा सभागृहाला अधिकार आहे. तसे केले असते तर मला बरे वाटले असते. कारण ते आपले सदस्य आहेत. त्यांचे सदस्यत्व रद्द झाल्यामुळे सरकारच्या बहुमतामध्ये फार फरक पडणार आहे अशातील भाग नाही. पण एक माणुसकीचा आणि सद्‌भावनेचा विषय असतो. समिती प्रमुख म्हणून ही वस्तुस्थिती असताना आणि माणुसकीचा व सद्‌भावनेचा आदर करुन मी असा प्रस्ताव मांडतो की, कौल आणि शकधर या पुस्तकात नमूद केल्याप्रमाणे श्री.आव्हाड यांचा गैरहजेरीचा कालावधी क्षमापित करावा असे जर आपण म्हटले असते तर सत्तारुढ पक्षाचा केवढा तरी सन्मान झाला असता. वरिष्ठ सभागृहाला मोठा सन्मान मिळाला असता आणि या सभागृहाबाबत आदर निर्माण झाला असता. या अहवालात पुढे असेही म्हटले आहे की, "Where a member has already been absent for over sixty days on the date of application for leave of absence the permission of the House given to remain absent up to the date of the application is termed as 'condonation of absence' and the permission to remain absent the date of the application if applied for, is termed as 'grant of leave of absence'.

कौल आणि शकधर यांचा किती मोठा विषय या अहवालात नमूद केला आहे ? याबद्दल मी सचिवांना धन्यवाद देतो. आपण या समितीसमोर हा विषय ठेवला असावा. सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांचा लौकिक आम्हाला माहीत आहे. परंतु आपली अगतिकता समजू शकतो. सभापती महोदय, मला अत्यंत दुःख झाले असल्यामुळे आपण नियमावलीच्या संदर्भात नियम समितीची तातडीने बैठक घ्यावी. एखादा माणूस अगतिकतेने, अपघाताने, कळत नकळत अशा दुर्दैवी फे-यामध्ये सापडला असेल तर सभागृहाला त्यांची गैरहजेरी क्षमापित करण्याचा अधिकार असतानाही ती केली जाणार



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.दिवाकर रावते....

नाही ? हे बंधनकारक नाही ? पण या नियमामध्ये असे गृहित धरले आहे की, या विधिमंडळामध्ये गुन्हेगारीतील श्री.पप्पु कलानी was absent for years together. This was never discussed. त्यामुळे ही काय भानगड आहे हे मी तपासले. नियमामध्ये तुरुंगात स्थानबध्द असलेल्या सदस्याबाबत तरतूद आहे. तुम्ही गुन्हे करा, निवडून या, आमदार व्हा, खासदार व्हा, सभागृहात कधीही येऊ नका, तुरुंगामध्ये जाऊन बसा पण तुमचा गैरहजेरीचा कालावधी क्षमापित केला जाईल अशी ही तरतूद आहे. काय नियम बनविले आहेत ? गुन्हेगारांना संरक्षण देणारा पहिला हा नियम रद्द करावा. अगतिकपणे आपल्या जीवनाशी झगडा देणा-या सदस्यांबाबत हा अमानवीय नियम आहे तो देखील रद्द करावा. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेला सदस्य तुरुंगात असला तरी त्यांची गैरहजेरी क्षमापित करणारे नियम आपल्या सभागृहाला शोभनीय नाहीत. या नियमांकडे आमचे लक्ष गेले नव्हते, पण हा अहवाल आल्यामुळे आम्ही ते पाहिले आहे. ही आमची चूक असेल, आम्ही पहावयास पाहिजे होते. सभापती महोदय, आपल्याच नेतृत्वाखाली या नियमामध्ये बदल झाला पाहिजे असा माझा आग्रह आहे. सभापती महोदय, हे नियम वाचल्यानंतर मला दुःख झाले. मी आता कोणाचे नाव घेत नाही, कारण सगळ्यांना ते माहीत आहे. या सभागृहात निवडून आल्यावर ते सदस्य कधी सभागृहात येतच नाहीत, मी त्यांना पाहिलेच नाही. ते आपलेच सदस्य असल्यामुळे त्यावर बोलू नये. पण 2004 पासून श्री.आव्हाड हे गैरहजर आहेत. त्यांच्याबाबतीत असे एकाएकी काय घडले ? लगेच त्यांची अगतिकता सर्वांसमोर आली, वर्तमानपत्रातून बातम्या आल्या. मग माझ्या लक्षात आले की, दुर्दैवाने काल झालेल्या निवडणुकीमधील झगडा आज बंधनकारक स्वरुपात सभागृहासमोर आला आहे. पण हे बंधनकारक नाही. हा झगडा दोन मंत्र्यांमधील आहे. कोणाला पाडले, कोणाला जिंकून आणले हा विचार त्यामागे आहे. जे निवृत्त झाले त्यांना पुन्हा या सभागृहात आणावयाचे आहे. त्यांच्याकरिता हा प्रस्ताव आणावा लागला. पण सरकारने असे करु नये. श्री.सुधाकरराव हे पुन्हा या सभागृहात कसे येतील हा मुद्दा आहे. पाहिजे तर त्यांना आम्ही आणू. आम्हाला त्यांची प्रतिष्ठा माहिती आहे. पण केवळ सभागृहात पुन्हा येऊ न शकलेल्या सदस्याकरिता अशाप्रकारचे डावपेच राजकारणामध्ये करणे उचित नाही. आपण सगळे एकच असल्यामुळे मी अमानवीय बोलणार नाही.

नंतर श्री.शिगम..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

जास्त खोलात जाऊन मला बोलायची इच्छा नाही. मला मने दुखवायची नाहीत. ती दुखवायची असतील तर या प्रस्तावावर खूप बोलता येईल. सभापती महोदय, मी आपणास विनंती करतो की , कौल आणि शकधर या पुस्तकामध्ये जे मत व्यक्त केलेले आहे त्याप्रमाणे आपण या प्रकरणी निर्णय घ्यावा. मी या अहवालातील समितीचे मत सन्मानीत करतो. माननीय मुख्यमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. पाहिजे तर त्यांनी याबाबतीत एक प्रस्ताव आणावा. सन्माननीय सदस्यांची गैरहजेरी स्वीकारण्याचे आणि त्यांचे सदस्यत्व चालू ठेवण्याचे या सदनाला अधिकार आहेत आणि तसे केले तर आपल्या सदनाचा सन्मान होईल असे वाटते. त्यामुळे आणखी वेड्यावाकड्या खोलात न जाता सभापती महोदय, मी आपणास विनंती करतो की, या नियमावलीमध्ये "सदस्याची तुरुंगात स्थानबध्दता झाली असल्यास" अशी जी प्रोव्हीजन करण्यात आलेली आहे ती ताबडतोबीने काढून टाकावी. गुन्हेगाराच्या बाबतीत अशा प्रकारची तरतूद कशाला पाहिजे ? मग त्या ठिकाणी कोणीही असो, आम्ही असलो तरी. तेव्हा सभापती महोदय, ही नियमावली बदलण्याकरिता एक बैठक घ्यावी. माननीय मुख्यमंत्र्यांना मी विनंती करतो की, आपल्यातीलच ते एक सदस्य आहेत. आपण त्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना वेदना होणार नाहीत अशा प्रकारचा प्रस्ताव आणला तर आम्हाला आनंदच होईल. अन्यथा बहुमताच्या जोरावर हा प्रस्ताव संमत होईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, अहवालाच्या पृ.क्र. 8वर असे नमूद केलेले आहे की, " (1) तामिळनाडू विधानसभेत सन 1987मध्ये तत्कालीन मा. विरोधी पक्ष नेते श्री. ओ. सुब्रह्मण्यम हे 55 दिवस प्रकृतीच्या कारणास्तव सभागृहाच्या बैठकींना अनुपस्थित होते. त्यांना या कालावधीची रजा देण्याचा प्रस्ताव त्यांच्याच पक्षाच्या (कॉंग्रेस) सदस्यांनी सभागृहात दिनांक 10.11.1987 रोजी मांडला व तो संमत झाला.

(2) बिहार विधानसभेचे सदस्य श्री. मनोरंजन सिंह, हे मिदनापूर सुधारगृहात असल्यामुळे दि. 1.12.2005 ते 28.3.2007 या कालावधीतील सभागृहाच्या एकूण 86 बैठकींना अनुपस्थित होते. त्यांनी त्यांची अनुपस्थिती क्षम्य करण्याबाबत व सभागृहाच्या बैठकींमध्ये भाग घेण्याची अनुमती देण्याबाबत पत्र विधानसभा सचिवालयास पाठविले होते. त्यावेळी विधानसभेच्या माननीय अध्यक्षांनी

(श्री.मधुकर चव्हाण...)

सदर पत्र सभागृहासमोर ठेवले व बिहार विधानसभेच्या नियम 69(1)कडे सदस्यांचे लक्ष वेधले आणि सभागृहाचे मत विचारले. सभागृहात सर्वानुमते श्री. मनोरंजन सिंह यांचा दिनांक 9.12.2005 ते 13.7.2007 या कालावधीचा सभागृहातील अनुपस्थितीचा कालावधी क्षमापित करण्यात आला."

सभापती महोदय, समितीच्या अहवालाचा आम्ही आदर ठेवतो. तरी सुध्दा हे सभागृह सर्वोच्च आहे. अनुपस्थितीचा कालावधी क्षमापित केल्यासंबंधीची माहिती या अहवालाच्या माध्यमातून सभागृहाला दिलेली आहे. शेवटची दोन वाक्ये सोडली तर आम्ही जे काही म्हणतो त्याला सपोर्टिंग असे निवेदन या संपूर्ण अहवालामध्ये तसेच माननीय सचिवांनी दिलेल्या माहितीमध्ये करण्यात आलेले असून ते आपण लक्षात घ्यावे अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : हा अहवाल आमच्या हाती आधीच यावयास पाहिजे होता. या अहवातील पान क्रमांक 9वर समितीचा अभिप्राय व शिफारशी आहेत. त्यामध्ये असे नमूद केलेले आहे की, "1. सन 1982-83 या वर्षाच्या सदस्य अनुपस्थिती समितीच्या पहिल्या अहवालात नमूद केलेली मार्गदर्शक तत्वे व अनुपस्थितीची कारणे या संदर्भात समितीच्या आयोजित बैठकीत सखोल विचार करण्यात आला. सुमारे 24-25 वर्षाचा कालावधी होऊनही या कालावधीत सदर मार्गदर्शक तत्वे व अनुपस्थितीची कारणे यामध्ये सुधारणा झालेली नाही. तरी त्यामध्ये खालील मार्गदर्शक तत्वे व आजारपणाची कारणे अंतर्भूत करण्यात यावीत, अशी समितीची शिफारस आहे.

(अ) सदस्यास गंभीर अपघात किंवा दुर्धर आजार झालेला असेल की ज्यामुळे सदस्य स्वत: अर्ज लिहिण्याच्या शारीरिक अवस्थेत नसेल किंवा कोमामध्ये असेल अशा स्थितीत त्या सदस्यांना रजेसाठी अर्ज करता येणार नाही अशा सदस्यांच्या कुटुंबियांनी अर्ज केले असल्यास त्या अर्जाचाही विचार करणे."

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, "ब"मध्ये असे म्हटले आहे की, महिला सदस्यांना तीन महिन्यांच्या प्रसूती रजेची देखील तरतूद करण्याची आवश्यकता आहे व हे मार्गदर्शक तत्वामध्ये समाविष्ट करावयास पाहिजे अशी समितीने शिफारस केली आहे.

समितीने त्या परिच्छेदाखाली श्री. नवनाथ आव्हाड यांचा उल्लेख करुन असे म्हटले आहे की, सदरहू सदस्य गेल्या साडेतीन वर्षापासून अनुपस्थित आहेत. या अहवालात समितीने पृष्ठ क्रमांक 9 वर असे म्हटले आहे की, श्री. नवनाथ आव्हाड, वि.प.स. यांची विकलांगता पराकोटीची असल्याने डॉक्टरांनी प्रतिपादन केल्याप्रमाणे असे रुग्ण बरे होण्याची शक्यता अत्यंत दुरापास्त आहे, परिणामी, भविष्यात ते बरे होऊन सभागृहात येणे ही अशक्यप्राय गोष्ट आहे, असे समितीला वाटते. सन्माननीय सदस्य सभागृहात येणे अशक्यप्राय आहे हे समितीने कशाच्या आधारावर ठरविले ? सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी माजी विधानपरिषद सदस्य श्री. धरमचंद्र चोरडिया यांचा उल्लेख केला. श्री.धरमचंद चोरडिया हे आठ महिने कोमात होते. काही रुग्ण 20 वर्षापासून कोमात आहेत. श्री. नवनाथ यांना सभागृहात येणे अशक्यप्राय आहे असे समितीने अभिप्राय देऊन टाकले आहेत. समितीने वैद्यकीय अभिप्राय कसे काय दिले? हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. या प्रकरणाच्या संदर्भात न्युरॉलॉजिस्टच्या तज्ज्ञ डॉक्टरांचे एक पॅनल तयार करावे, त्या पॅनलला सन्माननीय सदस्यांच्या प्रकृतीची तपासणी करु द्यावी. त्यांची तपासणी करुन त्या पॅनलचे ओपिनियन काय आहे ते जाणून घ्यावे ते ओपिनयन सभागृहासमोर सादर करावे आणि त्यानंतर यासंबंधी निर्णय घ्यावा असे मला वाटते. मी मानवतेच्या दृष्टीकोनातून वारंवार सांगतो आहे की, देशात अशा प्रकारचा पायंडा कृपया पडू देऊ नका. या ठिकाणी सन्माननीय सदस्य डॉ. वसंतराव पवार यांनी आपले मत व्यक्त करताना घटनेचा उल्लेख केला. आपणाकडून घटनेची पायमल्ली किती वेळा केली गेली आहे, कोणकोणत्या विषयाच्या बाबतीत पायमल्ली केली गेली आहे, कौल आणि शकधर या ग्रंथाची किती वेळा पायमल्ली झाली आहे, यासंबंधीची अनेक उदाहरणे मला देता येतील. संपूर्ण देशात असा चुकीचा मॅसेज जाऊ नये अशी आमची प्रामाणिक इच्छा आहे. भविष्यात कोणत्याही सन्माननीय सदस्यांवर अशी वेळ येऊ नये असे माझे मत आहे. यासंबंधीच्या नियमामध्ये निश्चितपणे दुरुस्ती तर झालीच पाहिजे, पण आज सभागृहासमोर जो प्रस्ताव मांडला गेला आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

त्यास स्थगिती देण्यात यावी अशी माझी विनंती आहे. या विषयाच्या अनुषंगाने आम्ही ज्या मागण्या केल्या आहेत, त्याबाबतीत तातडीने नियम समितीची बैठक घेऊन तद्‌नंतर या प्रकरणी निर्णय घेण्यात यावा अशा प्रकारची कळकळीची मागणी माननीय मुख्यमंत्र्यांकडे करतो.

श्री. मुझफ्फर हुसेन : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण आणि माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी जे मुद्दे उपस्थित केले आहेत, त्यांनी अहवालातील पृष्ठ क्रमांक 8 वरील तामिळनाडू विधानसभेतील सदस्य आणि बिहार विधानसभा सदस्य यांच्या अनुपस्थितीबाबतचा मुद्दयांचा उल्ल्ेख केला आहे. यासंदर्भात मी खुलासा करु इच्छितो की, त्या सदस्यांची रजा मंजूर झ ााली असली तरी ते सदस्य कोमात नव्हते किंवा त्यांना हायपोक्सिया झाला नव्हता. ते लाईफ सपोर्ट सिस्टीमवर रुग्णालयात ॲडमीट नव्हते. समितीने संपूर्ण देशातील 22 राज्यातील विधानसभेकडून अशा प्रकरणासंबंधीची माहिती मागितली होती, त्यापैकी 4 विधानसभेतून अशा प्रकारची माहिती समितीला प्राप्त झाली आहे आणि त्या माहितीचा समितीने आपल्या अहवालात संदर्भ दिलेला आहे. या प्रकरणाशी कंपेरिजन व्हावे म्हणून राजस्थान विधानसभेचे प्रकरणांचा देखील संदर्भ समितीने आपल्या अहवालात दिलेला आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी पुन्हा नम्रपणे सांगू इच्छितो की, हा अहवाल तयार करण्यापूर्वी समिती पुणे येथे भेटीसाठी गेली. त्या ठिकाणी समितीने बैठक घेतली. ज्या वैद्यकीय अधिका-यांच्या नियंत्रणाखाली सन्माननीय सदस्य श्री. नवनाथ आव्हाड ॲडमीट झाले. जे वैद्यकीय अधिकारी त्यांना ट्रीटमेंट देत आहेत, त्या सर्व वैद्यकीय अधिका-यांचे व्हूज समितीच्या बैठकीत ऐकून घेण्यात आले. त्यांच्या व्हूजप्रमाणे हा अहवाल तयार करण्यात आलेला आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सन्माननीय सदस्य श्री. नवनाथ आव्हाड ज्या रुग्णालयात ॲडमीट आहेत त्या ठिकाणी समितीने भेट दिली आणि तेथील वैद्यकीय अधिका-यांचे मत जाणून घेतले त्याबाबतची माहिती समितीने अहवालात दिली पाहिजे होती.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख (मुख्यमंत्री) : माननीय सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील प्रस्ताव मांडतो.

**सभापती** : समितीचा जो अहवाल सदनासमोर आलेला आहे आणि सदनामध्ये दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांकडून जी भाषणे झालेली आहेत.....

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, हा जो प्रस्ताव समिती प्रमुखांनी सदनासमोर मांडलेला आहे तो मांडत असताना अतिशय अपवादात्मक परिस्थिती निर्माण झालेली आहे. कुठल्याही सन्माननीय सदस्यांची स्थिती अशी झाली असेल तर सर्वांची सहानुभूती त्या सदस्याच्या प्रती असणे हे आवश्यक आहे आणि ती आहे. कुणाच्याही मनामध्ये दुसरा विचार नाही. परंतु सभापती महोदय, एक सन्माननीय सदस्य गेली चार वर्षे सदनामध्ये येऊ शकत नाही. 60 दिवसांचा टेक्नीकल मुद्दा उपस्थित केला की 60 दिवसांची गैरहजेरी क्षमापित करता येते. गैरहजर सदस्य आहे त्याचा जेव्हा अर्ज येतो तेव्हा त्या अर्जावर समिती विचार करते आणि सदनात अहवाल आल्यानंतर गैरहजेरी क्षमापित करण्याचा अधिकार सदनाला आहे. या प्रकरणामध्ये चित्र असे आहे की, गेली 3/4 वर्षे दुर्देवाने या सदनाचे सदस्य श्री. नवनाथ आव्हाड हे आजारी आहेत. संविधानिक आणि वैधानिक जी जबाबदारी त्यांच्यावर आहे ती जबाबदारी दुर्देवाने ते पार पाडू शकत नाहीत. एवढेच नाही तर सदनाची पूर्ण सहानुभूती त्यांना राहिलेली आहे. परंतु काही वेळा त्यांच्या नावावर जे काही घडायला नको होते ते घडले. वर्तमानपत्रामध्ये त्याच्याबद्दल प्रचंड लिखाण छापून आले. त्यांच्या नावाच्या खोटया सहया करुन पत्रे दिली गेली. वैधानिक निधी वापरला गेला. सदनाचा सदस्य म्हणून बाहेर जी प्रतिमा आहे त्याला नुकसान पोहोचले. कुठल्याही घाई-गर्दीत हा प्रस्ताव आणला असे समजण्याचे कारण नाही. यासंदर्भात समितीच्या बैठका झाल्या, समितीच्या प्रमुखांनी आणि समितीने प्रत्यक्ष रुग्णालयात जाऊन भेटी दिल्या आणि तेथील डॉक्टरांशी चर्चा केली. यासंदर्भात जे जे म्हणून करणे आवश्यक आहे ते केलेले आहे. त्यामुळे कुठेही घाई करुन सदस्याचे सदस्यत्व रद्द करायला निघालो आहोत असे विरोधी पक्षनेत्यांनी समजण्याचे कारण नाही. उलट श्री. नवनाथ आव्हाड यांच्या कुटुंबियांवर दुर्देवाने जो प्रसंग आलेला आहे त्याप्रसंगाबद्दल सदनाची सहानुभूती त्यांच्या कुटुंबियांना असणार आहे आणि अशा परिस्थितीत त्यांच्या कुटुंबियांना कशा प्रकारे मदत करता येते ती मदत करण्याचा विचार करु. सर्वसाधारणपणे सदस्य सदनात

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख ..

उपस्थित होण्याची शक्यताच नाही आणि वैधानिक काम करण्यासाठी प्रतिनिधी म्हणून निवडून पाठवितो ती जबाबदारी पार पाडणे शक्य नसेल तर सहानुभूती असूनही काही वेळा कर्तव्य पार पाडावे लागते. म्हणून अतिशय जड अंत:करणाने प्रस्ताव मांडलेला आहे. आनंदाने मांडला असे समजण्याचे कारण नाही. त्यांच्याबद्दल मनामध्ये सहानुभूती ठेऊनच याठिकाणी हा प्रस्ताव मांडलेला आहे. म्हणून हा प्रस्ताव मांडण्यासाठी परवानगी द्यावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अहवाल आताच प्राप्त झाला आहे. तो वाचून झाल्यानंतर पुढील आठवडयात याबाबतचा प्रस्ताव मांडण्यात यावा.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. मुजफ्फर हुसेन, समिती प्रमुख, सदस्य अनुपस्थिती समिती यांनी अहवाल सदनासमोर सादर केल्यानंतर जवळजवळ दीड तास दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना या अहवालाच्या अनुषंगाने आपापल्या भावना व्यक्त करण्यासाठी मी संधी दिलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. नवनाथ आव्हाड यांच्या बाबतीत विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांच्या भावना आहेत त्याच भावना दोन्ही बाजूच्या सदस्यांच्या आहेत. या अनुषंगाने मी एवढेच म्हणेन की, मध्यंतरीच्या काळामध्ये दुर्देवाने श्री.नवनाथ आव्हाड हे रुग्णालयात असताना हजेरीपत्रकावर 2/3 वेळा सहया केल्या गेल्या असा आक्षेप आला आणि त्या आक्षेपाच्या अनुषंगाने जवळजवळ 2/3/4 वर्ष श्री. आव्हाड हे रुग्णालयात आहेत आणि ते येथे येऊ शकणार नाहीत अशी परिस्थिती आहे. 2/3 ठिकाणी श्री. नवनाथ आव्हाड यांच्या सहया झाल्यानंतर त्यावर भाष्य झाले आणि श्री. नवनाथ आव्हाड हे रुग्णालयात असताना सुध्दा काही लोकांनी याअनुषंगाने तक्रारी सुध्दा केल्या.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**..............

की, स्थानिक विकास निधीचा सुध्दा वापर झाला, तो कसा झाला यावर सुध्दा भाष्य झाले. कामकाज सल्लागार समितीमध्ये एक दिवस श्री.नवनाथ आव्हाड साहेबांच्या अनुषंगाने ज्यावेळी चर्चा झाली त्यावेळेला सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी मुद्दा मांडला की, त्या कुटुंबियांचा फार मोठा आर्थिक खर्च झालेला आहे, तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांनी माझ्यासमोर सांगितले की, त्या अनुषंगाने शासन जरुर विचार करील. आज सुध्दा माननीय मुख्यमंत्र्यांनी याठिकाणी सांगितले की, श्री.नवनाथ आव्हाड, वि.प.स. यांच्या कुटुंबियांची जी काही आर्थिक किंवा अन्य अडचण असेल त्याबाबत शासन आणि आपण सर्वच त्यांच्याबरोबर या भावनेमध्ये एकत्रित आहोत.

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी कौल आणि शकधर यांचे पृष्ठ क्रमांक-7 वरील इंग्रजीमध्ये असलेले अभिप्राय वाचले. मी याठिकाणी अहवालातील पृष्ठ क्रमांक-10 वरील मुद्दा क्रमांक-3 बाबतचा जो शेवटचा निष्कर्ष आहे तो वाचून दाखवितो. "श्री.नवनाथ आव्हाड यांची निवड विधानपरिषद या सर्वोच्च सभागृहात झालेली आहे. या सर्वोच्च सभागृहाचे काम संविधानातील तरतुदीप्रमाणे चालते. संविधानातील तरतुदीप्रमाणे सदस्यांची या सभागृहाच्या प्रती काही विशिष्ट संविधानात्मक व वैधानिक (Constitutional and Legislative duties) अशी कर्तव्ये व जबाबदाऱ्या आहेत. श्री.नवनाथ आव्हाड यांची एकंदरीत परिस्थिती पाहता ते अशी संविधानात्मक, वैधानिक तसेच संसदीय कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडू शकण्याची शक्यता दिसत नाही. या परिस्थितीमध्ये त्यांचे सदस्यत्व चालू ठेवणे ही बाब संयुक्तिक होणार नाही. या अनुषंगाने घटनेतील तरतुदीसुध्दा स्पष्ट आहेत." अशा पध्दतीने पृष्ठ क्रमांक-10 वर समितीने आपले अभिप्राय नोंदविले आहेत. 10 व्या पृष्ठावरील या परिच्छेदाशी मी सहमत आहे. याठिकाणी दोन्ही बाजूकडून सुध्दा या समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा झाली आणि म्हणून मी याठिकाणी सांगेन की,..............

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, असे जरी असले तरी निर्णय घेणे हे सर्वस्वी आपल्या हाती आहे. अहवालात पुढे म्हटले आहे की, सभागृहाने निर्णय घ्यावा. म्हणून माझी पुन्हा सभागृहाला अशी विनंती आहे की, मानवतेच्या दृष्टीकोनातून पुन्हा एकदा विचार व्हावा आणि जर समितीने शिफारस केली आहे की, आजारपणाच्या कारणास्तव 24-25 वर्षानंतरही नियम





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.............

समितीमध्ये विचार झाला नाही, तो विचार करण्यात यावा अशी शिफारस समितीने केलेली असताना जर आज सभागृहात निर्णय घेणार असाल तर मी पुन्हा एकदा विनंती करतो की, अशा पध्दतीने एखाद्या सदस्याचे सदस्यत्व निलंबित करण्यात येऊ नये आणि प्रस्ताव मांडण्यास देऊ नये अशी आग्रहाची विनंती करतो.

**सभापती** : श्री.नवनाथ आव्हाड, वि.प.स. यांच्या विधानपरिषदेच्या बैठकींना 60 दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी अनुपस्थितीबाबत समितीचा विशेष अहवाल सादर झाला आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : अशा पध्दतीने बहुमताच्या जोरावर निर्णय घेतला जाणार असेल तर आम्ही प्रस्ताव मांडण्याच्या प्रसंगी उपस्थित राहू इच्छित नाही. आम्ही सभात्याग करीत आहोत.

(विरोधी पक्षाच्या सदस्यांनी बहिर्गमन केले)

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : अहवाल विचारात घेण्यात आला आहे. आता माननीय मुख्यमंत्र्यांनी प्रस्ताव मांडावा.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो :-

"श्री.नवनाथ आव्हाड, वि.प.स. हे ऑक्टोबर, 2004 पासून कोमा अवस्थेत पुणे येथील रुग्णालयात दाखल असल्यामुळे तेव्हापासून सभागृहाच्या बैठकींना अनुपस्थित आहेत. विधानपरिषद सदस्य अनुपस्थिती समितीने पुणे येथे जाऊन श्री.नवनाथ आव्हाड, वि.प.स. यांच्या प्रकृतीची पाहणी केली. त्यांच्या कुटुंबियांशी तसेच त्यांच्यावर उपचार करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांशी चर्चा केली. श्री.नवनाथ आव्हाड, वि.प.स. हे बरे होऊन सभागृहात येऊन पुन्हा काम करु शकतील अशी त्यांची प्रकृती नाही, याबद्दल समितीची खात्री झाली आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 190(4) नुसार राज्य विधानमंडळाचा एखादा सदस्य 60 दिवसाच्या कालावधीसाठी सभागृहाच्या अनुमतीशिवाय अनुपस्थित राहिल्यास त्याचे सदस्यत्व रद्द करण्याचा अधिकार सभागृहास दिलेला आहे.

(नंतर श्री.खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख ........

श्री. नवनाथ आव्हाड वि.प.स. यांचा सभागृहातील अनुपस्थितीचा कालावधी 60 दिवसांपेक्षा अधिक आहे. श्री. नवनाथ आव्हाड, वि.प.स. यांच्या प्रकृतीबाबत वर नमूद केलेली परिस्थिती व संविधानातील तरतूदी इत्यादिंचा विचार करता भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 190 खंड (4) च्या तरतुदीनुसार श्री. नवनाथ आव्हाड,वि.प.स. यांच्या अनुपस्थितीचा कालावधी 60 दिवसांपेक्षा अधिक झालेला असल्यामुळे त्यांची विधानपरिषदेवरील जागा रिक्त असल्याचे घोषित करण्याबाबत समितीने आपल्या विशेष अहवालात शिफारस केली आहे. समितीचा अहवाल विचारात घेतल्यानंतर समितीने सभागृहातील श्री. नवनाथ आव्हाड, वि.प.स. यांची सभागृहातील जागा रिक्त झाली असल्याचे घोषित करण्याबाबत जी शिफारस केली आहे त्या शिफारशीशी हे सभागृह सहमत असून असा ठराव करीत आहे की, श्री. नवनाथ आव्हाड यांची विधानपरिषद सभागृहातील जागा रिक्त झाली असल्याचे घोषित करण्यात यावे."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

----------------

**सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 12.40 वाजता पुन : भरेल.

( सभागृहाची बैठक 12.07 ते 12.40 पर्यंत स्थगित झाली. )

--------------

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**उपसभापती** : सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक 12:42 ते 12.52 पर्यंत स्थगित करण्यात आली.)

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगिती नंतर )

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.उल्हास पवार)**

**तालिका सभापती (श्री.उल्हास पवार)** : सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करण्यात येईल.

( सभागृहाची बैठक 12.53 ते 1.03 पर्यंत स्थगित झाली )

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगिती नंतर .. )

**<u>सभापतीस्थानी - माननीय उपसभापती</u>**

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण सभागृहाचे कामकाज सुरू करण्यापूर्वी मला आपल्याला काही सांगावयाचे आहे. मघाशी हे सभागृह स्थगित होण्यापूर्वी मनाला अत्यंत वेदना देणारा असा प्रस्ताव माननीय मुख्यमंत्र्यांनी येथे मांडला आणि तो प्रस्ताव येथे पारित करण्यात आला. या सदनाचे एक सन्माननीय सदस्य ....

**उपसभापती** : मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, या संबंधात यापूर्वी येथे चर्चा झालेली आहे ....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, तो जो ठराव येथे मांडला तेव्हा आम्ही बाहेर गेलो होतो कारण इतका वेदना देणारा ठराव आम्ही ऐकू शकत नव्हतो. .....

( यानंतर श्री. सरफरे .... डीडी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आम्हाला सभागृहाच्या कामकाजामध्ये स्वारस्य नाही. आम्हाला कामकाजावर बहिष्कार टाकावयाचा आहे. आपण आमचे म्हणणे ऐकून घ्यावे आणि त्यानंतर आम्हाला जावू द्यावे. अशाप्रकारे लोकशाहीमध्ये जीवंत माणसाचा मृत्यू आमच्या डोळयांनी या सभागृहामध्ये पहाण्याची वेळ आमच्यावर आली आहे. आजचा हा काळा दिवस आहे. तेव्हा आपण आमच्या भावना ऐकून घ्याव्यात. जर आपणास त्या ऐकावयाच्या नसतील तर काय सांगायचे? आपण आमचेही सदस्यत्व घालविणार आहात काय?

**उपसभापती** : मी तसे म्हणत नाही, माझे असे म्हणणे आहे की,....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या सभागृहाला पक्षीय कार्यालयाचे स्वरुप आले आहे. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये यासंबंधी विषय मांडण्यात आलेला नाही, काय चालले आहे? या सभागृहाचे कामकाज नियमाप्रमाणे चालणार आहे की नाही? आपण आमची तोंडे दाबणार आहात काय? दाभण आणून आमचे तोंड शिवायचे आहे काय? तुमच्या मनामध्ये काय आहे? तुम्ही अमरपट्टा घेऊन आलेले आहात काय? तुम्हाला आयुष्यभर राज्य करण्याची संधी मिळणार आहे काय? आमच्याकडे ती संधी येणार नाही काय? आजपर्यंत या देशाच्या लोकशाहीमध्ये, संसदेच्या इतिहासामध्ये एखादा सदस्य शारीरिकदृष्टया अस्वास्थ असतांना त्याला अशाप्रकारे डिस्क्वॉलिफाय करण्याची घटना घडली आहे काय? आपण एवढी चार वर्षे थांबल्यानंतर दोन वर्षाकरिता कशासाठी घाई झाली? सभागृहातील एखाद्या सदस्यांचा मृत्यू याठिकाणी आपल्याला घोषित कां करावा लागला? एवढी सहिष्णुता आपल्यामध्ये कोठून आली? आपण आमच्या भावना ऐका....

**उपसभापती** : या सभागृहामध्ये या विषयावर पूर्णपणे चर्चा झाली आहे, त्या चर्चेमध्ये दोन्ही बाजूकडील माननीय सदस्यांनी आपले म्हणणे मांडले आहे. त्यामुळे मी आता पुढील कामकाज घोषित करतो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, असे चालणार नाही. आमचे म्हणणे आपण ऐकून घेतले पाहिजे. ही लोकशाही आहे काय? तुम्ही लोकशाहीचे वाक्य काढून टाकावे.....

(गोंधळ)

ही काय कॉग्रेसची संस्कृती आहे? माननीय सदस्य डॉ. पवार साहेब आपण एक सुसंस्कृत राजकारणी आहात. जीवंत माणसाला मारावयाची ही तुमची संस्कृती आहे काय? ही तुमची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

सहिष्णुता आहे काय? एखाद्या सदस्याचे सदस्यत्व काढून घ्यावयाचे? सभापती महोदय, आपल्याविषयी मला पूर्ण आदर आहे...

(गोंधळ)

**उपसभापती** : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी त्यांचा औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी औचित्याचा मुद्दा मांडणार नाही आणि सभागृहाच्या कोणत्याही कामकाजामध्ये भाग घेणार नाही. मी पहिल्यांदा या सभागृहातील घटनेचा याठिकाणी निषेध करणार आहे. हिंदुस्थानच्या इतिहासामध्ये स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदा कुठल्याही देशाच्या आणि राज्याच्या विधीमंडळामध्ये, लोकसभेमध्ये किंवा राज्यसभेमध्ये अशाप्रकारचा निर्णय आजपर्यंत झालेला नाही. या सभागृहाचे एक सन्माननीय सदस्य चार वर्षे बेडवर पडून असतांना त्यांचे सदस्यत्व रद्द करण्याचा निर्णय पुरोगामी म्हणविणाऱ्या महाराष्ट्र सरकारने याठिकाणी घेतला. सभापती महोदय, आम्ही याठिकाणी वारंवार विनंती केली. मला याठिकाणी दोनच गोष्टी सभागृहाच्या निदर्शनास आणावयाच्या आहेत. सदस्य अनुपस्थिती समितीमध्ये चार सदस्य असतांना फक्त दोन सदस्यांनी एका विधानपरिषद सदस्याचे सदस्यत्व निलंबित करण्याचा निर्णय घेतला. अशाप्रकारे कुणाचे राजकीय पुनर्वसन करण्यासाठी...

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सभागृहाचे कामकाज हे नेहमी नियमाने, प्रथेने आणि परंपरेने चालले पाहिजे. या सभागृहाचे माननीय विरोधी पक्षनेते ज्या पध्दतीने बोलत आहेत....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मला सभागृहाच्या नियमावर बोलावयाचे आहे...

श्री. भास्कर जाधव : मी हरकतीच्या मुद्दयासंबंधी बोलत आहे...

श्री. नितीन गडकरी : आपले बोलणे संपल्यानंतर मी बोलणार आहे...

श्री.भास्कर जाधव : ठीक आहे, सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, सभागृहाचे कामकाज हे नियमानुसार, प्रथा आणि परंपरेनुसार चालते. विरोधी पक्षाचे नेते आदरणीय श्री. भाऊसाहेब फुडकर हे या सभागृहामध्ये मांडण्यात आलेल्या प्रस्तावाबद्दल आपल्या भावना व्यक्त करीत आहेत. सदस्य अनुपस्थिती समितीचे समिती प्रमुख या सदनाचे माननीय सदस्य श्री. मुजफ्फर हुसेन यांनी समितीचा अहवाल सभागृहामध्ये मांडला. तो सदस्यांना वितरीत करण्यात आला. तो अहवाल मांडल्यानंतर व वितरीत केल्यानंतर पलिकडच्या माननीय सदस्यांनी



DGS/ KGS/ MMP/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

आपल्या भावना व्यक्त केल्या, अलिकडच्या माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यानंतर सभागृहाच्या पीठासीन अधिकाऱ्यांनी तो प्रस्ताव मांडला. तो प्रस्ताव मांडल्यानंतर या सभागृहाचे नेते आदरणीय श्री. विलासराव देशमुख, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, यांनी हा प्रस्ताव मांडला. आणि तो प्रस्ताव ज्यावेळी मतास टाकला गेला त्यावेळी विरोधी पक्षाचे माननीय सदस्य पलिकडे निघून गेले. याचा अर्थ त्या प्रस्तावावर त्यांनी नापसंती व्यक्त केली. त्यानंतर प्रस्ताव आवाजी मतदानाने याठिकाणी मंजूर झाला.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव . . . .

आणि ही प्रक्रिया पूर्ण झाली. त्यानंतर त्या प्रस्तावाच्या बाबतीत पुन्हा चर्चा करण्यात येऊ नये असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी नियमाच्या बाबतीत बोलत आहे. कामकाज सल्लागार समितीमध्ये विरोधी पक्षातर्फे आणि सत्तारुढ पक्षातर्फे प्रस्ताव देण्यात येतो आणि त्यावरील चर्चेसाठी दिवस ठरविला जातो. सभापती महोदय, आपणही त्या समितीचे सदस्य आहात. आपण मला एक गोष्ट सांगावी की, सभागृहाच्या नेत्यांनी सत्तारुढ पक्षामार्फत प्रस्ताव मांडला आहे. पण अशा प्रकारे कोणताही प्रस्ताव मांडण्यापूर्वी कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये चर्चा होते. सन्माननीय सदस्य श्री.भास्करराव जाधव यांना सांगू इच्छितो की, मी गेली 18 वर्षे सदस्य म्हणून काम करीत आहे.जेव्हा एखादा प्रस्ताव मांडला जातो, त्या अगोदर कामकाज सल्लागार समितीमध्ये याबाबतीत चर्चा होत असते.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य पॉईंट ऑफ प्रोसीजर बाबत बोलत आहेत.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी बोलणार नव्हतो. पण सन्माननीय सदस्यांनी नियमाचा उल्लेख केला, म्हणून मी बोलत आहे. मग मी असे विचारु इच्छितो की, या पहिल्या नियमाची पायमल्ली कोणी केली ? अगोदर हा प्रस्ताव कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये ठेवावयास पाहिजे ही बाब सभागृहाच्या नेत्यांना माहिती नाही काय ? या नियमाची पायमल्ली कोणी केली ? मग विरोधी पक्षाचा प्रस्ताव असो किंवा सत्तारुढ पक्षाचा असो, तो आधी कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीसमोर ठेवावयास पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी साहेब, मी जे सांगत आहे ते बरोबर आहे की नाही. त्या बैठकीमध्ये विरोधी पक्षातर्फे येणारे प्रस्ताव, सत्तारुढ पक्षातर्फे येणारे प्रस्ताव मांडतो. त्यावरील चर्चेसाठी दिवस ठरवितो आणि त्याला सर्वांची मंजुरी घेत असतो. त्या समितीसमोर प्रस्ताव ठेवत असताना, तुम्ही सत्तारुढ पक्षातर्फे मांडण्यात येणाऱ्या प्रस्तावाचे ड्राफ्टींग करुन देता आणि आम्ही विरोधी पक्षाकडून मांडण्यात येणाऱ्या प्रस्तावाचे ड्राफ्टींग करुन देतो. तर याप्रमाणे कामकाज सल्लागार समितीमध्ये या प्रस्तावाबाबत चर्चा झाली होती काय ? अशा प्रकारे विरोधी पक्षाला न सांगता, कामकाज सल्लागार समितीमध्ये प्रस्ताव न आणता येथे एकतर्फी प्रस्ताव मांडण्यात आला आहे. तसेच चार सन्माननीय

. . . .2 ई-2

श्री.नितीन गडकरी . . . .

सदस्यांपैकी दोन सन्माननीय सदस्यांच्या सहया घेतल्या आहेत आणि त्यापैकी एका सन्माननीय सदस्याची तर घरी जाऊन सही घेतली आहे. चार वर्षापासून आजारी असलेल्या एका सन्माननीय सदस्याचे अशा प्रकारे सभासदत्व स्थगित करणे ही बाब कोणत्या लोकशाहीला शोभणारी आहे, कोणत्या नियमाला शोभणारी आहे ? सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी हे किती मोठे नेते आहेत. माझी त्यांच्यावर किती श्रध्दा आहे. ते अतिशय सुसंस्कृत नेते आहेत. शेवटी ही गोष्ट वेगळी आहे की, अशा या सुसंस्कृत नेत्याचे पक्षातील असंस्कृत नेते ऐकत नाहीत ही त्यांची अडचण आहे. पण त्यांच्या सुसंस्कृतपणाबद्दल प्रश्न उद्‌भवतच नाही.

श्री.अरुण गुजराथी (खाली बसून) : सन्माननीय सदस्यांनी विषयावर बोलावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी तुम्हाला सुसंस्कृत म्हणालो, त्याबद्दल तुमची हरकत आहे काय ? आपली हरकती नाही ना ? त्यांचे जरी ऑब्जेक्शन असले तरी सुध्दा सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथीच्या आणि आपल्या सुसंस्कृतपणाबद्दल प्रश्न उद्‌भवत नाही. सभापती महोदय, लोकशाहीमध्ये आपल्याकडून सत्तारुढ काँग्रेस पक्षाने आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने शिकले पाहिजे. आपण घाबरण्याचे कारण नाही. आपण लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाला आणि सत्तारुढ पक्षाला बरोबर घेऊन वागत असता. हीच लोकशाहीमध्ये वागण्याची खरी पध्दत आहे. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी मघाशी बोलताना नियमांचा आधार घेतला. मी मान्य करतो. मग आता जो प्रस्ताव आला, त्यासाठी नियम क्र.कोणता ? हा सत्तारुढ पक्षाचा प्रस्ताव आहे. या प्रस्तावावरील चर्चेसाठी कामकाज सल्लागार समितीमध्ये दिवस ठरलेला आहे काय ? मी आल्यानंतर माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेबांना विचारले की, तुम्ही या प्रस्तावाला मंजुरी कशी दिली ? तर ते म्हणाले की, हा प्रस्ताव कामकाज सल्लागार समिती मध्ये आलाच नाही. आता पहिला मुद्दा असा आहे की, जेव्हा सभागृहामध्ये सत्तारुढ पक्षातर्फे प्रस्ताव येतो, तो कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये ठरविल्याशिवाय येतो की येत नाही ? याबद्दल प्रथम सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी कायद्यातील बाब तपासून घ्यावी.

श्री.भास्कर जाधव : माननीय सभापतींचा तो अधिकार आहे.

श्री.नितीन गडकरी : कसा अधिकार आहे ? हे गढीवरचे निर्णय आहेत काय ? प्रसाद वाटण्याचे निर्णय आहेत काय ? अधिकार आहे म्हणजे काय ? मग कामकाज सल्लागार समिती ...

. . . . 2 ई-3



APR/ KGS/ MMP/ 13:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बरखास्त करा. बहिष्कार टाका, पद सोडून द्या. तुमच्या मर्जीप्रमाणे होत नाही. तुम्ही एकतर्फी लोकशाही चालवा. पण एक गोष्ट लक्षात ठेवावी की, आज तुमचे राज्य आहे. परंतु तुम्ही अमरत्व घेऊन आला नाहीत. आज तुम्ही असे वागत आहात, उद्या आमच्या हातामध्ये सत्ता येईल. तेव्हा नियम शिकवू नका. ही पध्दत बरोबर नाही. मी एक उदाहरण देऊ इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.कृष्णराव पांडव हे या सदनाचे सदस्य होते. त्यावेळी मी विरोधी पक्ष नेता होतो आणि माननीय कै.जयंतराव टिळकसाहेब हे सभापती होते. याबाबतीत येथील अनेक सन्माननीय सदस्यांना माहिती आहे. त्या वेळी सन्माननीय सदस्यांवर अशाच प्रकारची परिस्थिती आली होती. त्यावेळी आम्ही सर्वांनी अशी भूमिका घेतली की,माननीय सभापतींनी सन्माननीय सदस्यांना रिलॅक्सेशन द्यावे. मी त्याबाबतीत सभागृहामध्ये बोललो आणि सन्माननीय सदस्यांना रिलॅक्सेशन दिले जेणेकरुन त्यांचे सदस्यत्व जावयास नको. ते काँग्रेस पक्षाचे होते. आम्ही कसेही असलो तरी उच्च सभागृहाचे सदस्य आहोत.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी एक गोष्ट लक्षात घ्यावी की, येथे कोणत्याही पक्षाचा संबंध नाही. . . . .

श्री.नितीन गडकरी : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हा सत्तारुढ पक्षातर्फे आलेला प्रस्ताव आहे. माननीय मुख्यमंत्री हे सभागृहाचे नेते आहे आणि हा सत्तारुढ पक्षाचा प्रस्ताव आहे. या सभागृहाचे, काँग्रेस पक्षाचे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आणि दोन्ही सभागृहातील सन्माननीय विधीमंडळ गटाचे नेते असलेल्या माननीय मुख्यमंत्री साहेबांनी मांडलेला प्रस्ताव म्हणजे सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णीसाहेब, हा सत्तारुढ पक्षाचा प्रस्ताव आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी त्याचे स्वागत केले आहे. मी जे बोललो आहे, ते सर्व रेकॉर्डवर आलेले आहे. मी या प्रस्तावाच्या बाजूने सांगितले की, हा प्रस्ताव शासनाच्या वतीने आणि ज्या समितीच्या वतीने दिलेला आहे, तो स्वीकृत करावयास पाहिजे. तसेच तो कशासाठी स्वीकृत करावयास पाहिजे याचेही रिझनिंग दिलेले आहे आणि ते रेकॉर्डवर आहे. सन्माननीय सदस्य ते रेकॉर्ड पाहू शकतात.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, चांगले आहे. तुम्ही दिलेल्या रिझनिंगबद्दल मला आक्षेप नाही. तो तुमचा अधिकार आहे. ते योग्य असो वा अयोग्य असो किंवा कायदेशीर असो वा...

. . . .2 ई-4



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

बेकायदेशीर असो. एकदा वकिलाने फी घेतली, मग तो पक्षकार जरी खून करणारा असला तरी कोर्टामध्ये त्याने खून केलाच नाही असेच मांडावे लागते.

यानंतर श्री.बरवड ....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .......

कारण ते इथिक्समध्ये लिहिले आहे. He is always loyal to his client. This is a professional ethics. I know that Shri Gurunath Kulkarni is such a fine person.

(अडथळा) मला असा विश्वास आहे की, सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना जर राजकीय अभिनिवेश नसता तर ते माझ्या भावनेशी समरस झाले असते. बरेच असे सन्मानीय सदस्य आहेत. सहनही होत नाही आणि सांगताही येत नाही. सन्माननीय सदस्यांची अवस्था मला त्यांच्या चेहऱ्यावरुन दिसते. बिचाऱ्यांना मनामध्ये किती क्लेश होतो आहे याची मला कल्पना आहे. कारण त्यांच्यातील सुसंस्कृतपण मी जाणतो. त्यांच्या वेदना काय आहेत हे मी जाणतो. कधी कधी पक्षामध्ये अनेक अशा गोष्टी होतात की, ज्या सहनही होत नाही आणि सांगताही येत नाही अशा प्रकारच्या असतात. त्यामध्ये त्यांचा दोष नाही. त्यामुळे त्यांचे मोठेपण कमी होत नाही. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी नियमाचा उल्लेख केला. आपण मला निर्णय द्यावा. हा प्रस्ताव सत्तारुढ पक्षाचा होता. प्रस्ताव ज्या नियमाप्रमाणे येतो त्या प्रस्तावाची चर्चा कामकाज सल्लागार समितीमध्ये व्हावयास पाहिजे होती की नाही ? हे कायदेशीररित्या, संकेतानुसार योग्य आहे की अयोग्य आहे ? हे जर बरोबर नसेल तर माझी आपल्याला विनंती आहे. आपली खुर्ची ही सार्वभौम आहे. आपली खुर्ची सभागृहाच्या मध्यभागी आहे. एक सूत तिकडे नाही आणि एक सूत इकडे नाही. लोकसभेचे माननीय अध्यक्ष श्री. सोमनाथ चॅटर्जी यांनी सांगितले की, मी पक्षाचा नाही. हे आपण लक्षात ठेवावे. आपल्याला माहीत आहे की, काही वेळा क्लेश होतो, त्रास होतो....

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : त्यांनी असे सांगितले की, उद्या जर मतदान करावयाचे असेल तर मला भारतीय जनता पक्षाच्या संगतीने मतदान करावयाचे नाही म्हणून मी राजीनामा देत नाही.

श्री. नितीन गडकरी : त्यांनी आपल्या कानात येऊन सांगितले काय ? आधी आपण आपल्या नेत्याला विचारुन घ्या की, 21 तारखेला कोठे उडी मारणार आहेत ? त्यानंतर आपण बोलावे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : श्री. राम जेठमलानी यांनी काय म्हटले आहे ते सांगावे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण मला नियमाप्रमाणे न्याय द्यावा. सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी नियमाचा विषय उपस्थित केला. नियमावर चर्चा व्हावयास पाहिजे. या ठिकाणी प्रथा, परंपरा, नियम , संकेत आहेत. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचा अपमान केला.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, माझा पॉइन्ट ऑफ प्रोसीजर आहे.

श्री. नितीन गडकरी : माझे म्हणणे पूर्ण होऊ द्यावे.

श्री. उल्हास पवार : मी कामकाज सल्लागार समितीच्या संदर्भात सांगू इच्छितो.

श्री. नितीन गडकरी : माझे म्हणणे पूर्ण होऊ द्यावे. आजपर्यंत या सभागृहाच्या माझ्या 18 वर्षाच्या पूर्ण आयुष्यात, सचिन तेंडुलकरचे अभिनंदन करावयाचे होते, लता मंगेशकर यांचे अभिनंदन करावयाचे होते त्याबाबतचा विषय ज्यावेळी या सभागृहात उपस्थित झाला त्यावेळी आपले मित्र श्री. विलासराव देशमुख त्यांनी सांगितले की, त्यांचे अभिनंदन करावे अशी आमचीही इच्छा आहे पण आपण कामकाज सल्लागार समितीची बैठक बोलवू, दोन्ही पक्षाचे एकमत करु आणि अभिनंदनाचा प्रस्ताव सभागृहासमोर घेऊ. क्रिकेट टीमच्या अभिनंदनाकरिता, सचिन तेंडुलकरच्या अभिनंदनाकरिता, लता मंगेशकरच्या अभिनंदनाकरिता आपल्याला दोन्ही बाजूकडून एकमताने सभागृहात प्रस्ताव आणण्याची चिंता असते आणि बिचारा एक सदस्य अशा प्रकारे चार वर्षे अत्यवस्थ होऊन बिछान्यावर पडलेला आहे, ज्याची सदस्यत्वाची दोन वर्षे उरलेली आहेत त्यांच्या बाबतीत आपल्याला अशी कोणती निकड निर्माण झाली ? आपल्या सुसंस्कृत मनाला इतकी काय घाई झाली की ज्यासाठी दोन वर्षे वाट न पाहता जिवंत माणसाचे सदस्यत्व रद्द करण्याचे सौजन्य आपण का दाखवले ? महाराष्ट्रावर कोणते संकट आले ? सभापती महोदय, आपण मला याबाबत उत्तर द्यावे. दरवेळी आम्हाला श्री. देशमुख साहेबांनी उत्तर दिले आहे की, आम्ही अभिनंदन करण्यास तयार आहोत पण एकदा कामकाज सल्लागार समितीत दोघेही मिळून ठराव करु. माननीय सभापती महोदय श्री. देशमुख साहेबांनीही ज्यावेळी असे विषय आले त्यावेळी खास कामकाज सल्लागार समितीची बैठक बोलावली आणि त्या बैठकीमध्ये आम्ही दोघांनी मिळून एकमताने प्रस्ताव तयार केला आणि तो प्रस्ताव सभागृहासमोर आला. हा जो सत्तारुढ पक्षाचा प्रस्ताव आहे त्याबाबतीत सुध्दा तारीख आणि वेळ ठरत असते. हे काही न ठरता अचानक प्रस्ताव आला. एका सदस्याची घरी जाऊन सही घेतली. प्रस्ताव मांडल्यावर मग आमच्याकडे अहवाल आला. सभापती महोदय, हे सगळे आज आपल्या झेंड्याखाली सुरु आहे. साहेब, हे मंत्रालय नाही. आपण मंत्रालयाचा भाग नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

सभापती महोदय, सभागृहाला अहवाल सादर झाल्यानंतर आम्हाला तो वितरित केलेला आहे, ही लोकशाहीची क्रूर थट्टा आहे. हे सर्व नियमाप्रमाणे चालले आहे किंवा नाही याबाबत आपणच निर्णय द्यावा.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये काही विषय असे असतात की ज्यावर सभागृहासमोर येण्यापूर्वी तेथे चर्चा केली जाते. कामकाज सल्लागार समितीमध्ये हा विषय प्रथम मांडणे आवश्यक होते असे सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी भूमिका मांडली आहे. पण सदस्य अनुपस्थिती समितीचा हा अहवाल आहे.

श्री.नितीन गडकरी ( जागा सोडून ) : आजच्या कामकाजपत्रिकेवर माननीय मुख्यमंत्र्यांचा प्रस्ताव दाखविलेला आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हिंदुस्थानमध्ये अशा पध्दतीने घटनेची पायमल्ली करुन कोणत्याही प्रकारने मानवतावाद न दाखविता कोणाचे तरी राजकीय पुनर्वसन करण्यासाठी कोणतीही निकड नसताना या अहवालावर केवळ दोनच सदस्यांच्या सहया घेऊन निवडून आलेल्या सभासदाचे सभासदत्व रद्द करणे योग्य नाही. सन्माननीय सदस्य श्री.आव्हाड आज बेडवर आहेत. त्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात येत आहे. हिंदुस्थानमध्ये अशी घटना कधीही घडलेली नाही. सरकारच्या या कृतीचा आम्ही निषेध करुन सभात्याग करीत आहोत.

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य घोषणा देत सभात्याग करतात. )

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी हे चांगल्या मताधिक्क्याने निवडून आले असल्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करतो.

-----

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "वाशिंद येथील लिबर्टी ऑईल्स मिल्सने साठवून ठेवलेले हजारो लिटर केमिकलयुक्त पाणी भातसा नदीमध्ये दिनांक 10 जुलै, 2008 रोजी सोडल्याने असंख्य मृत मासे आढळून येणे व परिसरात दुर्गंधी पसरणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, प्रतापराव सोनवणे यांनी "शासनाने दिनांक 31 जुलै, 1997 च्या शासन निर्णयानुसार राज्याच्या क्रीडा धोरणानुसार तालुका क्रीडा प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्याचा निर्णय घेऊनही अद्याप काही प्रशिक्षण केंद्रावर अधिकारी व कर्मचा-यांची नियुक्ती न केल्याने पदे रिक्त असणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे यांनी "ठाणे महानगरपालिकेत शाळा व रुग्णालयांची साफसफाई करण्याकरिता नेमण्यात आलेल्या कंत्राटी कामगारांना न्यायालयाच्या आदेशाद्वारे त्यांचे वेतन धनादेशाद्वारे देण्याचे आदेश देऊनही त्यावर आजपर्यंत कार्यवाही न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "राज्यात अभ्यंकर समितीच्या अहवालानुसार 8665 वस्तीशाळा शिक्षक असून शासन निर्णय दिनांक 23 जून, 2008 नुसार नियमित होणा-या शाळेवरील, बंद होणा-या शाळेवरील असे एकूण 5695 वस्तीशाळा शिक्षक सेवेत असून उर्वरित 2970 वस्तीशाळा शिक्षक मागील 7 वर्षांपासून अल्प मानधनावर सेवा करीत असल्याने ते बेरोजगार होण्याची शक्यता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती....**

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी "समुद्रात मासेमारी करण्यासाठी वापरण्यात येणा-या बोटींना परवाने देण्यात मोठया प्रमाणात झालेला गैरव्यवहार, परदेशी बोटी मच्छिमारीकरिता राज्याच्या सागरी प्रदेशात घुसखोरी करीत असणे, इ.बाबत अखिल भारतीय मच्छिमार कृती समितीने चौकशी करण्याची मागणी करुनही त्यावर कार्यवाही न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "पंतप्रधान पॅकेज अंतर्गत बुलढाणा जिल्हयातील शेतक-यांना वाटप करण्यासाठी आलेले जिप्सम खत शेतक-यांना देण्याऐवजी व्यापा-यांना विकून बुलढाणा जिल्हयाच्या उपविभागीय कृषी अधिका-यांनी केलेला गैरव्यवहार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, गोपिकिशन बाजोरिया, डॉ.दीपक सावंत यांनी "दिनांक 2 जुलै, 2008 रोजी श्री.सय्यद अरीफ सय्यद लाल यांच्या विरोधात डॉ.सोहेल यांनी दिलेल्या खोटया तक्रारीची शहानिशा न करता बुलढाणा पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षकांनी त्यांना अटक केली असता श्री.सय्यद हे मधुमेहाचे रुग्ण असून त्यांना वेळेवर इन्शूलिन न मिळाल्याने त्यांची प्रकती गंभीर होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

उर्वरित 93 च्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

-----

4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचा मुद्दे

**उपसभापती** : आज काही सन्माननीय सदस्यांनी सभागृहामध्ये औचित्याचे मुद्दे मांडण्यास परवानगी मागितलेली होती. परंतु आता सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे पुढील कामकाज घेण्यात येईल.

5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: देवनार ( मुंबई ) येथे क्रिकेट खेळण्याच्या कारणावरुन उसळलेली भीषण दंगल आटोक्यात आणण्यासाठी पोलिसांनी केलेला लाठीमार.

**मु.शी.**: देवनार ( मुंबई ) येथे क्रिकेट खेळण्याच्या कारणावरुन उसळलेली भीषण दंगल आटोक्यात आणण्यासाठी पोलिसांनी केलेला लाठीमार यासंबंधी श्री.गुरुनाथ कुलकर्णी, प्रा.फौजिया खान, सर्वश्री जितेंद्र आव्हाड, रणजितसिंह मोहिते-पाटील, हेमंत टकले वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"देवनार (मुंबई) येथे दिनांक 6 जुलै, 2008 रोजी वा त्यासुमारास क्रिकेट खेळण्याच्या कारणावरुन उसळलेली भीषण दंगल, दंगल आटोक्यात आणण्यासाठी पोलिसांनी केलेला लाठीचार्ज, दंगल आटोक्यात येत नसल्याचे पाहून पोलिसांना हवेत करावा लागलेला गोळीबार, जमावानी केलेल्या दगडफेकीत एक बस व मंदिराची झालेली तोडफोड, पोलीस अधिका-यांसह काही व्यक्ती जखमी होणे, त्यामुळे त्या परिसरात निर्माण झालेले दहशतीचे वातावरण, परिणामी तेथील नागरिकांत पसरलेले भीतीचे वातावरण, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) :सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. असे करीत असताना मी आपल्या अनुमतीने निवेदनात पुढील दुरुस्ती करु इच्छितो. निवेदनातील तिस-या परिच्छेदातील शेवटच्या ओळीत "त्यामध्ये दोन जणांना अटक झाली आहे" याऐवजी "त्यामध्ये अठरा जणांना अटक झाली आहे" असे वाचण्यात यावे.

**उपसभापती** : सुधारल्याप्रमाणे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले.

<u>निवेदन</u>

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे. ) 6....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, देवनार येथे केवळ क्रिकेट खेळण्याच्या किरकोळ कारणाचे भीषण दंगलीमध्ये रुपांतर झाले. या दंगलीच्या वेळी पोलीस हजर होते किंवा नाही हा प्रश्न वेगळा आहे. मुंबई व संपूर्ण महाराष्ट्रामध्ये समांतर राज्य चालविण्याची भाषा काही राजकीय पुढारी करीत आहेत. एखाद्या ठिकाणी दंगल उसळल्यावर सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करण्याचे प्रकार वाढलेले आहेत.

नंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी...)

देवनार येथील घटना हे त्याचे एक उदाहरण आहे. देवनार या ठिकाणी क्षुल्लक कारणावरुन दंगल झाली. या दंगलीमध्ये सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले तसेच पोलिसांना मारहाण झाली असे निवेदनामध्ये नमूद केलेले आहे. तेव्हा अशा प्रकारे ज्या व्यक्तींकडून दंगली झाल्या त्यांच्यावर सामूहिक जबाबदारी म्हणून जबरदस्त कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सजेशन फॉर ॲक्शन

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्याच्या विदर्भ मराठवाडा आणि खनदेशात कापसावर मिली बगचा झालेला प्रादुर्भाव

**मु. शी.** : राज्याच्या विदर्भ मराठवाडा आणि खनदेशात कापसावर मिली बगचा झालेला प्रादुर्भाव यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, पाशा पटेल व जगदीश गुप्ता, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 13:25

**विशेष उल्लेख**

**पृ. शी.** : राज्यातील सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये धनुर्वाताच्या लसींचा असलेला तुटवडा

**मु. शी.** : राज्यातील सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये धनुर्वाताच्या लसींचा असलेला तुटवडा याबाबत श्री. संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

-----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सावंतवाडी तालुक्यात जुगारी टोळक्यांकडून विद्यार्थ्यांना गैरमार्गाला लावण्याचा होत असलेला प्रयत्न

**मु. शी.** : सावंतवाडी तालुक्यात जुगारी टोळक्यांकडून विद्यार्थ्यांना गैरमार्गाला लावण्याचा होत असलेला प्रयत्न याबाबत श्री.परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

----

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 13:25

**पृ. शी.** : चारकोप पोलिसांनी भगवती रुग्णालयामध्ये दाखल केलेल्या इसमावर औषधोपचार सुरु असताना त्याचा मृत्यू होणे

**मु. शी.** : चारकोप पोलिसांनी भगवती रुग्णालयामध्ये दाखल केलेल्या इसमावर औषधोपचार सुरु असताना त्याचा मृत्यू होणे याबाबत श्री. मधुकर चव्हाण,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

----

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ठाणे जिल्हयातील जव्हार, मोखाडा, विक्रमगड भागात पाळणाघरे अस्तित्वात नसणे

**मु. शी.** : ठाणे जिल्हयातील जव्हार, मोखाडा, विक्रमगड भागात पाळणाघरे अस्तित्वात नसणे याबाबत डॉ.दीपक सावंत,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

----

...7..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : विनाअनुदानित विविध कृषी अभ्यासक्रमासाठी संस्था चालकांनी मोठ्या प्रमाणावर केलेली गुंतवणूक

**मु. शी.** : विनाअनुदानित विविध कृषी अभ्यासक्रमासाठी संस्था चालकांनी मोठ्या प्रमाणावर केलेली गुंतवणूक याबाबत प्रा. फौजिया खान, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□□य सदस्या प्रा. फौजिया खान यां□ ए□ विशेष उल्ले□ाची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

प्रा. फौजिया खान (नामनियुक्त) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडते.

"कायम विनाअनुदानित विविध कृषी अभ्यासक्रमासाठी संस्था चालकांनी मोठया प्रमाणावर गुंतवणूक केली आहे. प्राप्त परिसिथतीत संस्था चालविणे जिकिरीचे बनले आहे. त्यातच संकेत स्थळाला भेट देऊन विविध कृषी अभ्यासक्रमांची दिनांक 20 मे 2008 ची जाहिरात पाहिली असता असे दिसून आले की, चालू वर्षापासून कृषी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता कमी करुन ती 60 तर कृषीतर पदवीअभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता 40 करण्यात आली आहे. एवढ्या कमी जागावर संस्था चालविणे केवळ अशक्यप्राय आहे. दर्जेदार शिक्षण देण्यात त्यामुळे अडसर निर्माण होण्याची शक्यता असून संस्थाचालकांची ही अडचण लक्षात घेऊन चालू वर्षापासाठी प्रवेश क्षमता पूर्वीप्रमाणेच ठेवण्याची आवश्यकता आहे. इत:पर प्रवेश क्षमतेत काही बदल करायचा असल्यास त्याचा अभ्यास करण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती नेमूण समितीने दिलेल्या अहवालानुसार पुढील वर्षापासून प्रवेश क्षमता ठरविणे सर्वार्थाने योग्य ठरेल. याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे."

उपसभापती महोदय, कायम विनाअनुदानित विविध कृषी अभ्यासक्रमासाठी संस्था चालकांनी मोठया प्रमाणावर गुंतवणूक केलेली आहे. प्राप्त परिस्थितीमध्ये संस्था चालकांना संस्था चालविणे जिकिरीचे बनलेले आहे. हे आपल्याला नाकारता येणार नाही की प्रायव्हेट संस्थांचे शिक्षण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. फौजिया खान...

क्षेत्रामध्ये खूप मोठे योगदान आहे. त्यातच चालू वर्षापासून कृषी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता कमी करुन ती 60 तर कृषीतर पदवीअभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता 40 करण्यात आलेली आहे. एवढया कमी जागांवर संस्था चालविणे केवळ अशक्यप्राय आहे. एमसीएआरच्या मिटींगमध्ये ठरल्यानुसार अे आणि बी ग्रेड मिळालेली आहे त्यांना दुसरा विभाग दिला जाईल असे प्रोसिडिंग्जमध्ये आलेले आहे. परंतु चालू वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरु होऊनही अद्याप तसे पत्र संस्थाचालकांना प्राप्त झालेले नाही. दुसरा विभाग दिल्यानंतरही म्हणजे 40 - 40 संस्था होऊनही 16 जागा कमी होत आहेत ही बाब विचारात घेणे गरजेचे आहे. ज्या ग्रेडिंगवर हा निर्णय घेण्यात आलेला आहे त्या ग्रेडिंगचे निकषच चुकीचे आहेत. उदा. फूड टेक्नॉलॉजीसाठी बैलांची गरज काय ? हे व यासारखे निकष तातडीने बदलून नव्याने ग्रेडिंग झाली पाहिजे किंवा अपग्रेड झाले पाहिजे अशी माझी मागणी आहे. दुसरी महत्वाची बाब म्हणजे पोस्ट हार्वेस्ट टेक्नॉलॉजी ही काळाची गरज असून भारत कृषिप्रधान देश असताना केवळ दोन टक्केच फूडचे प्रोसेसिंग होते. म्हणून यासारख्या कार्सेस विषयी शासनाने जागृती करणे आवश्यक आहे. विद्यार्थी संख्या कमी करणे हा त्यावरील उपाय होऊ शकत नाही. शिवाय खाजगी कॉलेजेस्‌ना सावत्र आई सारखी वागणूक न देता देशाला दर्जेदार आणि स्वयंपूर्ण बनविणारे शिक्षण देणा-या संस्थांना प्रोत्साहन दिले पाहिजे. अन्यथा येणा-या काळामध्ये आपल्याला फ्युएल टंचाईसारख्या अन्य टंचाईला देखील तोंड द्यावे लागेल. या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करुन शासनाने तातडीने निर्णय घ्यावा अशी माझी मागणी आहे. धन्यवाद.

--

...9..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : विशेष उल्लेखानंतर आता निवृत्त होणा-या सदस्यांना निरोप आणि त्यानंतर अशासकीय कामकाज आहे. विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. सभागृहाची संमती असेल तर मी पुढील कामकाज घेतो.

श्री. अरुण गुजराथी : उपसभापती महोदय, विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. त्यामुळे आजच्या कामकामपत्रिकेवर दाखविण्यात आलेले "निवृत्त होणा-या सदस्यांना निरोप" हे कामकाज आपण नंतर घ्यावे अशी माझी आपणास विनंती आहे.

**उपसभापती** : ठीक आहे. आता अशासकीय कामकाज घेण्यात येईल.

----

..10..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अशासकीय कामकाज**

**पृ.शी.**: (नागरी क्षेत्र) ईलेक्ट्रॉनिक कचरा (नियमन, नियंत्रण आणि विल्हेवाट) विधेयक

L.C.BILL NO. V OF 2008.

(A BILL TO PROVIDE FOR REGULATION AND CONTROL AND SYSTEMS FOR DISPOSAL OF ELECTRONIC WASTE BY MAKING THEIR REGISTRATION COMPULSORY WITH AN APPROPRIATE AUTHORITY AND PRESCRIBING NORMS AND STANDARDS FOR E-WASTE GENERATORS AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO)

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विनाअनुदान तत्वार सुरु केलेल्या माध्यमिक शाळांमध्ये असलेला शैक्षणिक सुविधांचा अभाव

**मु.शी.**: विनाअनुदान तत्वावर सुरु केलेल्या माध्यमिक शाळांमध्ये असलेला शैक्षणिक सुविधांचा अभाव या विषयावरील श्री. विक्रम काळे,वि.प.स. यांचा ठराव

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

--

...12..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई शहरामध्ये येणारे परप्रांतीयांचे लोंढे

**मु.शी.**: मुंबई शहरामध्ये येणारे परप्रांतीयांचे लोंढे या विषयावरील श्री. दिवाकर रावते,वि.प.स. यांचा ठराव.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

----

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. भास्कर जाधव )**

**पृ.शी.** : लोकभाषेवर आधारित राज्य व्यवहार कोष तयार करणे

**मु.शी.** : लोकभाषेवर आधारित राज्य व्यवहार कोष तयार करणे या विषयावरील श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांचा ठराव.

श्री. कपिल पाटील ( मुंबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडतो.

" महाराष्ट्राच्या मराठी राज्य व्यवहार कोषाचे क्लिष्ट स्वरुप बदलून लोकभाषेवर आधारित राज्य व्यवहार कोष तयार करण्यात यावा, अशी शिफारास ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

सभापती महोदय, या सभागृहात मराठीच्या प्रश्नावर, मराठीच्या भाषेच्या आग्रहाच्या संदर्भात अनेकवेळा चर्चा झालेल्या आहेत. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली आणि त्यावेळपासून आपण मराठी भाषा स्वीकारली आहे आणि तिचा वापर सर्वत्र व्हावा ही आपली रास्त अपेक्षा होती. शिक्षणाचे माध्यम मराठी बनावे, कोर्टाचे माध्यम मराठी बनावे, बाजार व्यवहाराचे माध्यम मराठी बनावे आणि स्वाभाविकपणे शासन व्यवहाराचे माध्यम सुध्दा मराठी बनावे हा आपला आग्रह सातत्याने राहिलेला आहे. आपण 1961 साली भाषा सल्लागार मंडळ निर्माण केले. त्यानंतर राजभाषेचे विधेयक सुध्दा विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी पारित केले. हे विधेयक पारित केल्यानंतर मराठीला भाषेला जो अपेक्षित दर्जा मिळावा आणि सर्व व्यवहार मराठीत होतील अशी सगळयांची अपेक्षा होती. परंतु आज चित्र वेगळे दिसते आहे. या घडीला या सभागृहात आपण मराठी भाषा बोलतो. शासनाचे निर्णय मराठीत निघतात ही गोष्ट देखील बरोबर आहे. पण राज्याची किंवा या राजधानीची भाषा मराठी राहिली आहे काय ? हा खरा मुद्दा आहे. ती न राहण्यामागच्या कारणांचा शोध घेतला तर त्याला शासन व्यवहाराची भाषा मराठी म्हणून आपण स्वीकारली ते एक कारण आहे. या सभागृहात अनेक वेळा राजकीय भाषणे केली जातात. त्या भाषणात राजकीय कारणे शोधली जातात. परंतु मुख्य कारणांकडे नेहमी दुर्लक्ष होते. मराठीचा आग्रह याचा अर्थ अन्य भाषांचा दुराग्रह, अन्य भाषांना अटकाव असे बिलकूल नाही. किंबहुना कोणतीही भाषा आपले दरवाजे बंद करुन कधी वाढू शकत नाही, कधी फुलू शकत नाही.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील....

मराठीच्या नावाने गळे काढीत असताना अन्य भाषेला विरोध करणे, अन्य भाषिकांना विरोध करणे, अन्य प्रांतियांना विरोध करणे अशी भूमिका जी मंडळी घेतात, तीच मंडळी भाषेची खरी मारेकरी असतात आणि मराठी भाषेच्या संवर्धनाला, तिच्या वाढीला मारक ठरतात हा आजवरचा अनुभव आहे. मराठी भाषा कोणी वाढविली ? मराठी भाषेचे व्याकरण सुध्दा परदेशातून आलेल्या माणसाने लिहिले आहे. त्यांचे लिखाण पूर्ण झाल्यानंतर मराठी भाषेला राजव्यवहाराचा दर्जा आपण दिलेला आहे. मराठी ही केवळ मराठी माणसांची मक्तेदारी आहे म्हणणे चुकीचे आहे. आमच्या सोबत कोणी नकोत, त्यांचे बरोबर मी बोलणार नाही, त्यांनी आमच्या जवळ यावयाचे नाही. अशी स्थिती दुस-या बाजूला सुरु झालेली आहे, ती चुकीची आहे. मी जो शासकीय ठराव मांडला आहे तो काही राजकीय भाषणासाठी मांडलेला नाही. कोणाचे राजकीय वैगुण्य सांगण्यासाठी हा ठराव मांडलेला नाही. शासनाने भाषा सल्लागार मंडळ निर्माण केले. भाषा संचालनालय तयार केले. राजव्यवहाराला एक वेगळी परिभाषा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परंतु जी परिभाषा आम्ही निर्माण केली, ती परिभाषा मराठी न राहता इतकी संस्काळलेली होती की, त्यामुळे ती भाषा परकी वाटावयास लागली. आज या राज्यातील सगळया समुहांची भाषा मराठी आहे काय ? अन्य राज्यातून आलेले आहेत, अन्य भाषेचे लोक आलेले आहेत. त्यांच्याबद्दल मी काही बोलत नाही. परंतु जे लोक या ठिकाणी मुळापासून राहतात, त्यातील अनेक घटकांना मराठी भाषा परकी वाटते. या राज्यातील अनेक आदिवासी समूह आहेत, अनेक जुने समूह आहेत की, त्यांची स्वतःची भाषा मराठी नाही. मराठी ही महाराष्ट्रीयन भाषा असली तरी त्या समुहाला मराठी भाषेची माहिती नसल्यामुळे त्यांना मराठी भाषा परकी वाटते. कोरकू भाषेत बोलणारी मुले असतील, गोंड भाषेत बोलणारी मुले असतील, माडीया भाषेत बोलणारी मुले असतील, त्यांना इंग्रजी इतकीच, हिंदी इतकीच, मराठी भाषा दुर्बोध आणि परकीय वाटत असते. कोरकू, माडीया, गोंड या समुहांचा उल्लेख यासाठी केला की, या सगळया समुहांना मराठी ही आपली भाषा वाटावयाची असेल त्यांना मराठी भाषेचे महत्व पटवून देणे गरजेचे आहे. हे मराठी राज्य तीन ते चार भागात विखुरलेले आहे. एका बाजूला विदर्भ आहे, दुस-या बाजूला मराठवाडा आहे, तिस-या बाजूला कोकण आहे....

यानंतर श्री. कानडे....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ..

चौथ्यास बाजूला खानदेश आहे आणि उर्वरित प.महाराष्ट्र आहे. या चारही किंवा पाचही विभागातील मराठी भाषा वेगळी आहे. कोकणामध्ये जी मराठी बोलतो ती वेगळी आहे, खानदेशातील लोक वेगळया पध्दतीने मराठी बोलतात. विदर्भातील मंडळी व-हाडी बोलतात किंवा विदर्भातील झ ाडीपट्टीतील भाषा वेगळी आहे. वऱ्हाडी आणि झाडीपट्टीतील भाषेमध्ये सुध्दा फरक पडतो. प्रत्येक 10 मैलावर भाषाशैली बदलते. त्यामुळे स्वाभाविकपणे प्रत्येक ठिकाणच्या भाषाशैलीला वेगळे वळण आहे. पण आपण राजव्यवहार कोष तयार करताना किंवा शासन व्यवहारकोष तयार करताना प्रामुख्याने सदाशिवपेठी मराठी स्वीकारली आणि संस्कृत हा मुख्य आधार बनविला. खरे पाहिले तर शासन व्यवहार कोष निर्माण करताना भाषा कशासाठी याबाबत जी भूमिका घेतली होती ती अतिशय योग्य होती. प्रस्तावनेतील मूळ परिच्छेद मी यानिमित्ताने वाचून दाखवितो. इंग्रजी राजव्यवस्थेबरोबर इंग्रजी भाषेचा वारसाही आमच्याकडे आला. प्रशासनिक भाषेची शैली आणि शब्दार्थाच्या निरनिराळया छटा या भाषेने आम्हांला दिल्या आहेत. याबरोबरच लोकशाहीतील कल्याणकारी राजव्यवस्थाही आम्हांला नवीन आहे. भूतकाळातील राज्यपध्दती अस्तित्वात असली तरी त्यावेळच्या अनेक कल्पना व्यक्त होणारे शब्द मराठीत आम्हांला मिळू शकले असते. कल्याणकारी राज्याचे ध्येय समोर असल्यामुळे त्या कल्याणकारी जीवनाला स्पर्श करीत आहेत. हा जो मुद्दा आहे तो आणि त्याच्यापुढील मुद्यामध्ये असा उल्लेख करण्यात आला आहे तो अधिक महत्वाचा आहे. आजच्या जीवनातील विकासाची गती इतकी प्रचंड आहे की तिच्यामुळे पुढारलेल्या देशातील भाषांनाही आपला देश सांभाळणे कठीण होते. अशा परिस्थितीत या भाषेच्या विकासाला अनेक वर्षे वाव मिळाला नाही किंबहुना लोकव्यवहाराच्या अनेक क्षेत्रात जिला मज्जाव होता तिला या जगाशी सामना द्यावयाचा म्हणजे शब्दनिर्मितीसाठी प्रचंड धडपड करणे अनिवार्य ठरले. त्यामुळे ठराविक चाकोरी सोडून नव्या वाटा शोधल्या पाहिजेत काही प्रयोग केले पाहिजे आणि भाषिक प्रयोगाचा अवलंब केल्यावाचून हे कार्य पार पाडणे हे या भाषेला अवघड आहे. भाषा सल्लागार मंडळाने हे उद्दिष्ट समोर ठेवून आजच्या निकडीची,उद्याच्या गरजेची भाषा निर्माण करण्याचे ठरविलेले आहे. हा उद्देश समोर ठेवून हा संपूर्ण व्यवहारकोष निर्माण करण्यात आला आहे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ..

सभापती महोदय, भाषा ही व्यक्ती तसेच समाजाच्या आविष्काराचे माध्यम आहे. याओळीकडे या प्रस्तावनेमार्फत मला आपले लक्ष वेधावयाचे आहे. प्रत्यक्षात शासन व्यवहारकोष निर्माण करताना ही एका ठराविक वर्गाची सदाशिवपेठी जो शब्द आता प्रचलित आहे म्हणून मी वापरतो कोण्या एका वर्गाला दुखविण्यासाठी वापरीत नाही तेवढीच मर्यादित केल्यामुळे ठराविक व्यक्तिंच्या आविष्काराचा हा कोष निर्माण झाला. त्यामुळे आजतागायत 1961 सालापासून 2008 पर्यंत यामध्ये कोणतेही बदल केले नाहीत. त्या काळात त्या समितीने जे काम केले ते अतिशय चांगले केले. गणितापासून विज्ञानशाखेपर्यंत तसेच आर्थिक क्षेत्रातील विषयांचे वेगवेगळे परिभाषा कोष त्यांनी तयार केले. अतिशयम मोठे असे काम केले. परंतु रोजच्या व्यवहाराच्या संदर्भातील जे कामकाज चालते त्या कामकाजाच्या बाबत मात्र कोणताही जो नवा बदल आवश्यक आहे किंवा जे नवनवीन बदल घडतात ते आत्मसात करुन त्यामध्ये जे बदल करण्याचे जे काम आहे ते काम पूर्णपणे थांबलेले आहे.

यानंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील.............

भाषा हे समाज अविष्काराचे मुख्य माध्यम आहे. यादृष्टीने आपण ते किती विकसित केले? किती वऱ्हाडी शब्द स्वीकारले? किती खानदेशी शब्द स्वीकारले? किती अहिराणी शब्द स्वीकारले? किती कोकणातील शब्द स्वीकारले? इंग्रजीला प्रती शब्द शोधताना कसरत करावी लागते. शास्त्रीय परिभाषा कोष तयार करण्यात आला. जे नियम त्यावेळी घालून देण्यात आले होते, त्या नियमांची पुरेशी जाण ठेवली गेली नाही. भाषा सल्लागार मंडळाने परिभाषेच्या निर्मितीसाठी आधारभूत निकष ठरवून दिलेले होते. त्यातील काही मुद्दे मी वाचून दाखवितो. पहिला मुद्दा असा होता की, आंतरराष्ट्रीय संज्ञा आहेत, त्या शक्यतो इंग्रजीतच ठेवाव्यात आणि मराठीत लिप्यंतर करावे. कारण आज आपण ते तत्व गणितात स्वीकारले, सायन्समध्ये स्वीकारले. म्हणूनच मराठी भाषिक मुले त्या शाखेमध्ये गेल्यानंतर सहजपणे प्रवेश करु शकतात. त्यांना अडचण भासत नाही. परंतु व्यवहारामध्ये काय दिसते? याकडे आपण पूर्णपणे पाठ फिरविली आहे. विज्ञानामध्ये चांगले शब्द आहेत, ते आपण स्वीकारले. ऑक्सीजन या शब्दाला पर्याय म्हणून आपण प्राणवायू हा शब्द स्वीकारला. परंतु टेबल ही नवीन संकल्पना आहे. पेन ही देखील नवीन संकल्पना आहे. पूर्वी लेखणी हा शब्द वापरला जात होता. आता पेन या शब्दाला लेखणी म्हणून बोलतो का? पूर्वी टाक देखील होते. पेटीबंद टाक असे म्हणत नाही. सिग्नलला अग्नि आवक-जावक म्हणून शब्दप्रयोग करीत नाही. जे शब्द व्यवहारात स्वीकारले आहेत ते स्वीकारलेच पाहिजेत. जी संकेत चिन्हे आहेत ती देवनागरी भाषेत स्वीकारावीत ही भूमिका स्वीकारली. सेंटीमीटर, मिलीमीटर हे शब्द स्वीकारले. जे शब्द मराठी भाषेत प्रचलित आहेत ते तसेच ठेवावेत. इंजिन, मशिन, मोटार, लिटर हे शब्द देवनागरी भाषेत वापरले जातात. जो परिभाषा कोष काढला त्यामध्ये अचूक उल्लेख केला आहे. परंतु शासन व्यवहार कोष आणताना याचे विस्मरण झाले. मशिन, इंजिन या शब्दांना जाणीवपूर्वक पर्यायी शब्द वापरावयाचे. जे लांबलचक असतात, अर्थहीन असतात, क्लिष्ट असतात असे शब्द स्वीकारत गेलो. अशा शब्दांचे मूळ अर्थ कायम ठेवावयाचे असते तर अनेक शब्दांचे रुपांतर केले असते. स्टेशनला आपण स्थानक म्हणत राहिलो असतो. अमुक स्थानकावर जा असे आपण म्हणत नाही. मग का नाही स्टेशन हा शब्द स्वीकारायचा? हा जो शास्त्रीय परिभाषेमध्ये जाणीवपूर्वक आग्रह स्वीकारला तो आग्रह शासन व्यवहारामध्ये का पाळला नाही. आजही पाळला जात नाही. अधिक सोपे करुन सांगावयाचे झाले तर आपल्याकडे आदेश दिले





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील............

जातात. ते आदेश कुठे दिले जातात? आदेश निर्गमित होतात. म्हणून ते आदेश लोकांपर्यंत पोहोचत नाहीत. पोहोचले तर वाचता येत नाही. मूळ इंग्रजी आदेशाची प्रत मागवावी लागते. ती वाचून मराठी अर्थ लावावा लागतो. जे मराठी शिकलेले आहेत, पदवीधर आहेत, अभ्यासू आहेत त्यांना शासनाच्या जी.आर.ची मराठी प्रत वाचता येत नाही, तो तर्जुमा वाचता येत नाही. म्हणून मूळ इंग्रजीचा आधार घ्यावा लागतो. याचा अर्थ आपले चुकते ते दुरुस्त केले पाहिजे. फाईलला आपण फाईल न म्हणता नस्ती म्हणतो. ती नस्ती म्हणजे नसती कटकट असते. ती नस्ती सापडत नाही. फाईल सापडते. मंत्रीमहोदयांना फाईल सापडेल. परंतु आपल्याला सापडत नाही. कारण ती नसतेच. ही भानगड कागदोपत्री आपल्याला सापडत नाही. शब्द सापडेल परंतु अर्थ सापडत नाही. अर्थाचा अनर्थ करायला प्रशासनातील मंडळी मोकळी होतात. एकवेळा पदनाम कोष शासनाने तयार केला. कै.आचार्य अत्रे यांनी त्या कोषाला बदनाम कोष म्हटले होते. आपण हा अट्टाहास कायम ठेवल्यामुळे आज प्रचंड मोठया प्रमाणावर शोषण यंत्रणा बनलेली आहे.

एल.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील........

जेव्हा भाषा ही शोषणाचे यंत्र बनते तेंव्हा तिचा तिरस्कार आणि विरोध सुरु होतो. या राज्यातील गोरगरीब व सर्वसामान्य माणसाला त्याचीच मराठी भाषा, मायबोली ही शासकीय भाषा म्हणून येते तेव्हा ती शोषणाचे महायंत्र बनते त्यावेळेस त्याला ती नकोशी वाटते म्हणून तो इंग्रजीकडे वळतो. इंग्रजीकडे तो प्रेमापोटी अथवा स्वार्थापोटी जात नसतो. पण त्याला व्यवहार म्हणून एका बाजूला मराठी शत्रूवत वाटायला लागते आणि ही भाषा मला मारत आहे, ही माझ्या विकासाला मारते, असे त्याला वाटत असते. जी भाषा जगविते तीच जगते, जी भाषा मारते ती मरते. म्हणून आज मराठी भाषा ही मरणपंथाला लागली आहे आणि त्यात सर्वात मोठा वाटा कोणाचा असेल तर तो म्हणजे शासन व्यवहार कोषाचा आहे. आणि हे आंधळेपणाने घेऊन जो व्यवहार आपण करीत आहोत त्यामुळे आज सबंध बहुजनाला ही मराठी भाषा मारक ठरलेली आहे. अनेक वेळा मराठीच्याच बाबतीत अजुनही आग्रह धरला जातो. परवा सभागृहात "गॅलरी" या शब्दावरुन जी चर्चा झाली त्यानंतर अचानक त्या शब्दाचे रुपांतर "दीर्घा" असे करण्यात आले. मग हा दीर्घा शब्द कोठून आणला, तो मराठी शब्द तरी आहे काय ? आधी त्यासाठी "सज्जा" शब्द होता मग "कक्ष" शब्द केला, कक्षचा अर्थ काय ? असे आपण एखाद्या अधिकाऱ्याला विचारले तर आता कोणी संस्कृत भाषेचा तज्ज्ञ राहिलेला नाही. एखाद्याचे आडनाव बघून त्याला संस्कृत येत असावे असे आपण गृहित धरतो आणि त्यांचा सल्ला घेतो, हे आता आपण थांबविले पाहिजे. "दीर्घा" हा शब्द जितका चुकीचा आहे तितकाच "कक्ष" हा शब्द देखील चुकीचा आहे. "गॅलरी" हा शब्द मराठीत स्वीकारलेला आहे, तो मराठी शब्द आहे. इंग्लंडची इंग्रजी भाषा का वाढली ? इंग्लंड देशाची राजभाषा सुध्दा इंग्रजी नव्हती, ती लॅटिन होती. आजही चर्चची भाषा आणि व्हॅटिकनची भाषा लॅटिन आहे. इंग्लिश यासाठी वाढत आहे कारण इंग्रजी ही आज खऱ्या अर्थाने व्यवहारिक भाषा बनली आहे. इंग्रजी ज्या ज्या देशात गेली त्या त्या देशातील शब्द तिने उचलले. मराठी, हिंदी, तामिळी, फ्रेंच, पोर्तुगीज, आफ्रिकन, डच असे अनेक शब्द तिने उचलले. म्हणून ज्या ज्या ठिकाणी इंग्रज गेले ते नुसतेच गेले नाहीत तर ते तिकडचे सगळेंच घेऊन गेले. ते घेऊन जाताना तेथील भाषा वैभव सुध्दा ते घेऊन गेले. नवीन अर्थशब्द त्यांना सापडले आणि त्यांनी ते जसेच्या तसे स्वीकारले म्हणून इंग्रजी भाषा ही अधिक समृध्द बनली. स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल मला नितांत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील.........

आदर आहे, प्रेम आहे. पण सावरकरांचा भाषा शुध्दीचा जो आग्रह होता ते शुध्दीकरणाचे भूत अजूनही आपल्या डोक्यातून गेलेले नाही. या शुध्दीकरणानेच आपली भाषा मारुन टाकली आहे. वास्तविक जगात सुध्दा काही शुध्द राहू शकत नाही. जितका वर्णसंकर होईल तेवढे चांगले आणि या शुध्द संकरातून अधिक चांगल्या प्रजाती निर्माण होत असतात. शब्दांच्या संकरातून, भाषेच्या संकरातून अधिक समृध्दता होत असते पण तेथेच आम्ही अटकाव करतो. शुध्दचा विचार केला तर आज जगाच्या पाठीवर फक्त आदिवासींचे दोनच वंश शुध्द आहेत आणि ते अंदमान व निकोबारमध्येच असल्याने आपण जाऊ शकत नाही. नागरी समुहातील माणसे आपल्या भाव-भावंडांपर्यंत पोहचू शकत नाही कारण त्यांनीच आपले जग बंद करुन टाकलेले आहे, आपला वंश शुध्द राखला आहे म्हणून ते संपत चाललेले आहेत. असे फार थोडे वंशजच शिल्लक आहेत आणि तेही संपत चालले आहेत. आपण भाषेचे दरवाजे ज्यावेळी बंद करतो तेव्हा ती भाषा मरणार आहे. आज मराठीचे सर्वात मोठे दुर्दैव हे आहे की, मराठीचा आग्रह धरुन ठेवणारे जे कोणी आहेत ते इतका चुकीचा मराठीचा अर्थ धरतात की मराठी मारुन टाकतात. मराठी समृध्दतेकडे गेली पाहिजे, मराठी वाढली पाहिजे, जे जे नवे आहे ते ते स्वीकारले पाहिजे. जी संकल्पना, जी संज्ञा नवी आहे ती मराठीत नाही म्हणून तिला काही तरी नवीन शब्द शोधायचा, असा काही तरी आटापिटा करण्यापेक्षा जी नवी कन्सेप्ट आहे ती तशीच्या तशी स्वीकारणे आणि स्वीकारुन पुढे जाणे हा सर्वात सोपा उपाय आहे. पण हे न करता आपण जाणीवपूर्वक संस्कृतच्या वर्चस्वाचा आधार घेऊन ठेवलेला आहे. यामध्ये भाषा एकरुप करण्याचा हा जो मुळ उद्देश आहे, ज्याच्यामुळे घोटाळा झाला आहे. एकरुप भाषा हे असे एक समान सूत्र म्हणता येईल, शिक्षण, विधी व तंत्रविज्ञान अशा अनेक क्षेत्रात एकरुप भाषा स्वीकार करुन वेगवेगळ्या भाषिक प्रदेशातील लोकांना आपण सर्व भारतीय आहोत, या व्यापक राष्ट्रीय भावनेचा परिकोष करता येईल. आता एकरुपचा अर्थ काय आहे हे शेवटी विविध भाषिकांचे समूह आहेत, विविध राष्ट्रकांचे समूह आहेत, विविध वंशांचा, विविध संस्कृतिंचा समूह आहे .........

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील.....

विविध संस्कृतिचा समावेश असल्यामुळे आपण सर्व भारतीय आहोत त्यामुळे आम्ही सर्व एक आहोत ही भावना आमच्यात आहे. ज्या दिवशी हिंदी हीच राष्ट्रभाषा असली पाहिजे किंवा अमुक एक भाषा राष्ट्रीय भाषा असली पाहिजे, अमुक एक धर्म राष्ट्र धर्म असला पाहिजे, अमुक एक संस्कृती राष्ट्रीय संस्कृती असली पाहिजे असा आग्रह आपण ज्या दिवशी धरु त्या दिवशी देश तुटेल. एकरुपतेचा अर्थ घेऊन आम्ही आमच्या सर्व बोलीभाषा मारुन टाकल्या आहेत. ज्या दिवशी हिंदी ही राष्ट्रीय भाषा स्वीकारली गेली त्यावेळी उत्तरेकडच्या अनेकांनी आक्षेप घेतला होता. उत्तरेच्या अनेक भाषा हिंदी भाषेने मारुन टाकलेल्या आहेत. हिंदी भाषेने मैथली, राजस्थानी, मगधी, मध्यप्रदेशातील भाषा, बिहार मधील अनेक भाषा, उत्तर भारतातील अनेक भाषा, राजस्थानातील अनेक भाषा, मारवाडी भाषा अशा अनेक भाषा मारल्या आहेत. हिंदी भाषेने खूप भाषा एकरुपतेच्या नावाने मारलेल्या आहेत. फक्त काही बोली भाषा टिकून राहिलेल्या आहेत आता त्यांचे भाषिक संवर्धन खुंटलेले आहे. या भाषा अतिशय उत्तम अशा भाषा होत्या. आपण मराठी भाषेमध्ये अनेक मारवाडी शब्द वापरतो. कारण आजचा मराठी समूह हा काही मूळ वंशांचा नाही. अनेकांच्या मिलनातून, संकरातून हा समाज निर्माण झालेला आहे. मराठी भाषा न वाढविता हिंदीच्या शुध्दीकरणाचा आग्रह धरला जात आहे. महात्मा गांधी यांनी सुध्दा हिंदी भाषेचा नाही तर हिंदुस्तानी भाषेचा आग्रह धरला होता. हिंदुस्तानी भाषेचा अर्थ म्हणजे अनेक भाषेच्या मिश्रणातून जी भाषा बनेल आणि जी भाषा प्रचलित होईल अशा हिंदुस्तानी भाषेचा त्यांनी आग्रह धरला होता. हिंदी सिनेमात ख-या अर्थाने हिंदी भाषेचा वापर केला जातो कारण हिंदी सिनेमात उर्दू, फारशीचा वापर केला जातो. मराठी भाषेमध्ये सुध्दा 30 टक्के फारशी शब्द वापरले जातात. त्यावेळच्या राजकोषात आपण हे शब्द स्वीकारुन पुढे गेलेलो आहोत. आता आपण मराठी भाषेमधून फारशी शब्द काढून टाकले तर काय शिल्लक राहील ? असेच जर आपण करीत गेलो तर उद्या मराठी भाषेतून संस्कृत भाषा सुध्दा काढून टाकावी लागेल. त्यामुळे माझे म्हणणे असे आहे की, जे जे सोपे आहे, जे जे शब्द मराठी भाषेत रुळू शकतात, जे शब्द प्रचलित राहू शकतात, जे शब्द वापरणे अधिक व्यवहार्य आहे, वापरण्यास सोपे आहेत ते ते शब्द ठेवा. जे शब्द वापरणे अडचणीचे होते ते शब्द दूर करा किंवा त्या शब्दाला आपल्या राज्यातील बोली भाषेतील अन्य प्रतीशब्द असेल तर तो घ्या.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील.....

त्याच बरोबर आपल्याला इंग्रजी भाषेचा स्वीकार डोळसपणे केला पाहिजे. इंग्रजीमध्ये जे जे चांगले शब्द आहेत ते स्वीकारले पाहिजेत. "आदेश निर्गमित करणे" अशी जी भाषा आहे ती बंद केली पाहिजे. अधिकारी "नस्ती" आणा असे कधी म्हणत नाही तर "फाईल" आणा असेच म्हणत असतो. त्यामुळे कशासाठी "नस्ती" शब्दाचा आग्रह धरावयाचा ? जो शिकलेला नाही, अडाणी आहे त्याच्या समोर "नस्ती" शब्द वापरावयाचा हे काही योग्य नाही. जे शब्द प्रचलित नाहीत ते शब्द बदला. जोपर्यंत अशा प्रकारचे शब्द आपण बदलत नाही तोपर्यंत या राज्यातील गोरगरीब समाजाचा विकास होणे शक्य नाही.

सभापती महोदय, मराठीला वैभव प्राप्त करुन द्यावयाचे असेल, संवर्धन करावयाचे असेल, मराठी भाषा अन्य भाषिकांनी स्वीकारावयाची असेल तर आपल्याला यासंदर्भात व्यापक धोरण स्वीकारावेच लागेल. मराठी भाषा पहिली पासून सीबीएससी, आयसीएससी मध्ये स्वीकारली गेली पाहिजे यासंदर्भात मी आणि सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी मागील अधिवेशनात आग्रह धरला होता व शासनाने ती बाब मान्यही केली होती व त्या प्रमाणे शासनाने आदेश सुध्दा काढले होते. मराठी भाषा त्या समुहाला स्वीकारावी असे वाटले पाहिजे. आज मराठी भाषा मराठी मुलांना सुध्दा परकी वाटते तर इंग्रजी माध्यमातील मुले, हिंदी भाषिक मुले, तामिळ भाषेतील मुले किंवा अन्य बोर्डातील मुलांना मराठी भाषा आपली म्हणून का वाटावी ? पर्सेंटाईलच्या संदर्भात आता बरीच चर्चा सुरु आहे. पर्सेंटाईलच्या संदर्भात मार्क आणि गुणवत्तेच्या संदर्भात कोर्टात प्रकरण गेलेले आहे. आयसीएससी आणि सीबीएससीच्या तुलनेत आपण मागे आहोत. आपल्या बोर्डात पहिला आलेला विद्यार्थी गौरव याचा क्रमांक आयसीएससी आणि सीबीएससीच्या बोर्डात 78 वा आलेला असून त्याच्यामध्ये अजून हजार मुले आहेत. याचा अर्थ पहिल्या दोन हजाराच्या ॲडमिशनमध्ये एसएससी बोर्डाची मुले टिकू शकत नाहीत ही अडचण आहे. ही अडचण कशातून आलेली आहे ? त्यांचा आणि आपला अभ्यासक्रम सुध्दा एक आहे. याची नेमकी मेख कोठे आहे? आपल्याकडील भाषा मारक आहे, आपल्याकडील पध्दती मारक आहे. आयसीएससी आणि सीबीएससीच्या बोर्डाने स्पष्ट म्हटले आहे की, व्याकरणाच्या चुकांकडे लक्ष घालू नका, स्पेलिंग चुकले तर लक्ष घालू नका. फक्त विद्यार्थ्यांने उत्तर बरोबर दिलेले आहे की, नाही एवढेच पहा. आपल्या बोर्डामध्ये मात्र वेलांटी चुकली तरी मार्क कट केले जातात. ...3



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** ( श्री. भास्कर जाधव ) : वेलांटी चुकली तर अर्थ बदलतो.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, वेलांटी चुकली तरी अर्थ बदलतो याची मला माहिती आहे. "ध" चा "मा" कसा होतो याची मला कल्पना आहे. आपल्याकडे पाठ्यपुस्तकांच्या चुकांच्या संदर्भात कमिटी स्थापन झालेली आहे. मराठी पाठ्यपुस्तकात जवळ जवळ 350 चुका झालेल्या आहेत. त्यामध्ये -हस्व, दीर्घच्या चुका असत्या तर त्या माफ केल्या गेल्या असत्या.

यानंतर श्री. खर्चे....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील ......

परंतु त्या पुस्तकामध्ये वाक्य रचनेच्या चुका आहेत, अर्थाच्या चुका आहेत, त्याचबरोबर ज्या मूळ बोली भाषेतील लेख या पुस्तकात घेत असतांना योग्य त्या दुरुस्त्या न केल्यामुळे काही चुका झाल्या आहेत. ज्यांनी या चुका केल्या ते डॉ. दादा गो-हे या तदर्थ समितीच्या बैठकी समोर साक्षीदार म्हणून आले होते . त्यांनी सांगितले की ,"मला जर फाशी देणार असाल तर यानंतर जे नवीन पुस्तक प्रसिध्द करण्यात आले होते त्यामध्ये देखील चुका आहेत त्यामुळे त्या मंडळीना देखील फाशी देण्यात यावे." अशा प्रकारे मोठया आवाजात ते समिती समोर बोलू लागले. सचिवांनी त्यांना आपली जागा दाखवली व असे सांगितले की समिती समोर अशा प्रकारे आवाज चढवून बोलू नका. जे नवीन मराठी पुस्तक प्रसिध्द करण्यात आले होते त्यामध्ये 35 चुका काढण्यात आल्या आहेत त्यामुळे मी ते पुस्तक पुन्हा वाचावयास घेतले होते. त्यांनी दाखविलेल्या प्रत्येक चुकांवर मी खूणं करीत गेलो. त्यावेळी मला असे आढळून आले की या पुस्तकामध्ये फक्त सात किरकोळ चुका झालेल्या आहेत त्या चुका सुध्दा -ह स्व आणि दीर्घ शब्दाच्या होत्या. परंतु त्यांनी 350 चुका काढल्या होत्या .

सभापती महोदय, या ठिकाणी मी आपल्याला एक उदाहरण देऊ इच्छितो. लोकमान्य टिळक शाळेत असतांना त्यांच्या शिक्षकानी संत हा शब्द लिहावयास सांगितला असतांना सर्व विद्यार्थ्यानी "संत " हा शब्द अशा प्रकारे लिहिला होता परंतु लोकमान्य टिळकांनी हा शब्द तीन पध्दतीने लिहून दाखविला होता. हा शब्द चुकीचा लिहिण्यात आला म्हणून गुरुजींनी त्यांना छडी मारली होती परंतु लोकमान्य टिळकांचेच बरोबर होते कारण संत हा शब्द तीन पध्दतीने लिहिता येतो. त्याचबरोबर जुन्या पध्दतीने " आश्चर्य " हा शब्द अशा प्रकारे लिहिण्यात येत होता परंतु तो शब्द या मंडळीनी चूक ठरविला आणि नवीन पध्दतीने तो शब्द " आश्चर्य " असा लिहावा असे सांगितले. मला असे म्हणावयाचे आहे की, त्या शब्दातील अर्थ तर बरोबर आहे ना ? शासनाला मार्गदर्शन करण्याकरिता अशा प्रकारची मंडळी बसलेली आहे आणि या मंडळीकडूनच शासन मार्गदर्शन घेत असते त्यामुळे गडबड होत असते. ज्यांच्याकडून मार्गदर्शन घ्यावयास नको त्यांच्याकडून मार्गदर्शन घेतल्यामुळे गडबड होते. व त्यातून नको तो उद्योग सुरु होत असतो..

**तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव)** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आपले भाषण सुरु होऊन 31 मिनिटे झालेली अहेत.

श्री.कपिल पाटील : या ठरावाला 45 मिनिटांचा वेळ देण्यात आलेला आहे.

18-07-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) NN 2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : अजूनही काही सन्माननीय सदस्यांना या ठरावावर बोलावयाचे आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय,एकच ठरावावर चर्चा होणार असून त्यानंतर सभागृहाचे कामकाज संपणार आहे. राज्यातील दहा कोटी जनतेच्या दृष्टीने हा ठराव महत्वाचा आहे.

श्री.चंद्रकांत हांडोरे : संध्याकाळ पर्यंत एकाच ठरावावर चर्चा चालू द्या.

श्री.कपिल पाटील : सन्माननीय मंत्रिमहोदयांना मी सांगू इच्छितो की, त्यांनी अशा प्रकारे उपरोधिक बोलू नये. आपल्या गरीब समाजाचे नुकसान होत आहे. त्यांचीच आज शिकार होत आहे. मी संध्याकाळ पर्यत हया ठरावावर चर्चा करणार नाही.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना मी सांगू इच्छितो की, मी आपल्याला अडवत नाही परंतु आपले भाषण सुरु होऊन बराच वेळ झाला आहे याची मी आठवण करुन दिली एवढेच.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय,मराठी ही ज्ञान भाषा बनली पाहिजे.यासाठी आपण सातत्याने आग्रह धरत असतो.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी देखील या प्रस्तावावर बोलणार आहेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मला त्याची कल्पना आहे. या सभागृहातील सर्वच सन्माननीय सदस्य पुरोगामी विचाराचे आहेत परंतु सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांच्या सारखा पुरोगामी आणि साने गुरुजीसारखा हृदय असणारा या सभागृहात दुसरे कोणीही नाही. आधुनिक काळातील भाषा म्हणून साने गुरुजी यांनी मराठी भाषेला वैभव प्राप्त करुन दिले होते. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी हे साने गुरुजी यांना मानणारे आणि त्यांच्या विचारानुसार चालणारे आहेत त्यामुळे या ठरावावर बोलण्यासाठी ते येथे आवर्जून थांबलेले आहेत म्हणून मी त्यांचेही आभार मानतो. साने गुरुजी यांच्यासारखी दुसरी कोणतीही व्यक्ती झालेली नाही त्यामुळे आपण सर्वचजण साने गुरुजींना मानतो.

सभापती महोदय, मराठी ही ज्ञान भाषा बनली पाहिजे असा आपला आग्रह असून देखील आज मराठी ही ज्ञान भाषा बनली नाही. मराठी भाषा ही नकोशी झालेली आहे. मराठी भाषेच्या याबाबतीत मी एक उदाहरण देतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्र विद्यापीठाच्या संदर्भात मागे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही



VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे

सभागृहामध्ये एक विधेयक मांडण्यात आले होते. त्यावेळी मी सभागृहाच्या प्रेक्षक गॅलरीत जाऊन बसलो होतों. त्यावेळचा एक प्रसंग मला आठवतो. त्यावेळी महाडचे सन्माननीय सदस्य श्री. शांताराम फिलसे यांनी अतिशय चांगल्या दोन सुधारणा सुचविल्या होत्या. त्यातील पहिली सूचना अशी होती की, तंत्र विद्यापीठातील जे पदविका किंवा प्रमाणपत्र अभ्यासक्रम आहेत ते मराठीतून शिकविण्यास सुरुवात करावी. हे लहान लहान अभ्यासक्रम असून अनेक गरीब विद्यार्थी तो अभ्यासक्रम पूर्ण करु शकतील. त्यामुळे ही कल्पना माननीय शिक्षण मंत्र्यांना आवडली.माननीय मंत्रिमहोदयांनी अधिका-यांच्या गॅलरीत पाहून तेथे बसलेल्या अधिका-यांना काही विचारावयाचे नसते परंतु माननीय शिक्षण मंत्र्यांनी अधिका-यांच्या गॅलरीकडे पाहून अधिका-यांना खूण करुन असे विचारले की, ही सुधारणा स्वीकारावयाची काय ? तेव्हा शिक्षण सचिवांनी मानेने नकार दिला. त्यामुळे यावेळी ही सुधारणा न स्वीकारता पुढच्या वेळी स्वीकारण्यात येईल असे माननीय शिक्षण मंत्र्यांनी सांगितले होते . त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी दोन सुधारणा सुचविल्या होत्या त्यापैकी दुसरी सुधारणा अशी होती की, विविध भाषेत, इंग्रजी भाषेत वा अन्य परकीय भाषेत ज्ञान विज्ञानाच्या संदर्भात जो काही नवीन उल्लेख येईल ते त्वरित मराठीत आणण्याची व्यवस्था आपण निर्माण केली पाहिजे. परंतु आतापर्यंत ही व्यवस्था आपण केलेली नाही.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

चीन, जपान, रशियाने ती व्यवस्था केलेली आहे. जगामध्ये विज्ञानात, तंत्रज्ञानामध्ये किंवा अन्य कोणत्याही शास्त्रामध्ये जे काही नवे घडेल ते त्वरित मराठीमध्ये आणण्यासाठी आपण काय करतो आहोत ? आज विविध भाषांतील कादंबऱ्या व अन्य कथा साहित्य मराठीमध्ये लगेच येते. परंतु जीवन शास्त्रात ज्या काही गोष्टी नव्याने येत आहेत त्याही मराठीत त्वरित आल्या पाहिजेत त्यासाठी आपण काय केले आहे वा करीत आहोत ? 1961 साली गतिशील जीवनाबद्दल स्व. यशवंतराव चव्हाणांनी सांगितले होते. परंतु त्यानंतर आजही अगदी स्फोटाप्रमाणे जग बदलत आहे. त्यावेळेस मात्र आम्ही हे सारे दरवाजे बंद केलेले आहेत. त्याबाबतीत डॉ.जयंत नारळीकर हे मात्र अपवाद आहेत. त्यांच्याशिवाय जगातील विज्ञान, तंत्रज्ञानातील नवनवीन विषय आणि घडामोडी मराठीत आणण्याचे काम फारच थोड्यांनी केलेले आहे. आपले साहित्य संस्कृती मंडळाने या संदर्भात काय केले आहे ? खरे तर हे त्यांचे काम नाही हे मला मान्य आहे. पण म्हणूनच शास्त्र विकास मंडळ काढण्याची आवश्यकता आहे परंतु आपण ते करीत नाही. इतर भाषांतील साहित्य आपल्याकडे भरपूर येत आहे परंतु ज्यासाठी आपला पैसा खर्च व्हायला पाहिजे ते काम मात्र होत नाही. त्यामुळे नवीन तंत्रज्ञान आणि विज्ञानापासून आजही महाराष्ट्र मागासलेला आहे. आज एसएससी मध्ये आपण देशामध्ये 12-13 व्या क्रमांकावर आहोत. अर्थात त्याला इतरही अनेक कारणे असली तरी हेही एक कारण आहे एवढे मात्र निश्चित. मला या ठिकाणी आणखी एक गोष्ट सांगावयाची आहे. आपल्याकडे 5-5, 10-10 वर्षे आपल्याकडील पाठ्य पुस्तके बदलत नाहीत. एकीकडे आपण 10वी-12वी पर्यंतचे शिक्षण सक्तीचे करीत आहोत आणि त्याची जबाबदारी आपण सरकार म्हणून घेतलेली आहे. अशा वेळी आपल्या शिक्षणातील पाठ्य पुस्तके देखील वेळोवेळी बदलली गेली पाहिजे. विशेष करून विज्ञानाची पुस्तके बदलली पाहिजेत. आपल्या पाठ्यपुस्तकांमध्ये काल झालेले बदल आज यायला पाहिजेत. एक वेळ भाषा विषयक पाठ्य पुस्तके 3-4 वर्षांनी बदलली तरी चालतील परंतु विज्ञानाची पुस्तके मात्र किमान दोन वर्षांनी, जरूर तर वर्षा-वर्षाने बदलली पाहिजेत, सुधारली पाहिजेत. कारण आज इतक्या गोष्टी नव्याने होत आहेत, येत आहेत आणि त्यामुळे काल असलेले नियम आज बदलत आहेत. हे सारे बदल ताबडतोब आपल्या मुलांना देखील आपण सांगितले पाहिजेत. या सगळ्या गोष्टींसाठी वेगळी व्यवस्था करणे आवश्यक आहे असे मला येथे आवर्जून सांगावेसे वाटते. सभापती महोदय, माझा हा ठराव राज्य

..... ओओ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

व्यवहार कोषासंबंधातील असला तरी त्यासाठी सल्लागार मंडळ हे आपण 1961 साली स्थापन केले होते आणि त्याची मुदत संपल्यानंतर 1997 साली त्याला आणखी मुदतवाढ दिली गेली होती. पण त्यानंतर 2000 सालापासून मात्र या सल्लागार मंडळाला मुदत वाढ दिलेली नाही किंवा ते नव्याने पुनर्घटित करण्यात आलेले नाही. त्यासाठी अजून नावे शोधण्याचे काम सुरू आहे. थोडक्यात सांगावयाचे तर हे सल्लागार मंडळ आज अस्तित्त्वात नाही. ते नव्याने गठित केले पाहिजे. या मंडळावर केवळ साहित्यिक असले पाहिजे असे नाही तर त्यावर विज्ञान-तंत्रज्ञानातील, सर्व क्षेत्रातील तज्ज्ञ माणसे शोधून आणली पाहिजेत. त्यासाठी डॉ.जयंत नारळीकरांसारखी माणसे असली पाहिजेत. कारण एक शास्त्रज्ञ आणि साहित्यिक म्हणून देखील ते मोठे आहेत. अशी विविध क्षेत्रातील पारंगत असलेली माणसे आपल्याला त्यावर घ्यावी लागतील. दुसरे म्हणजे विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रात जे काही नवनवीन शोध लागतील, शोध-निबंध, प्रबंध येतील त्यांचे तत्काळ मराठीत रूपांतरित करण्याचे काम झाले पाहिजे. कारण नुसत्या परिभाषा करून चालणार नाही तर विज्ञानातील जे जे नवे येईल ते आपल्याकडे आले पाहिजे. मराठी राज्य मजबूत करायचे असेल तर त्यासाठी मराठी भाषा प्रथमत: मजबूत झाली पाहिजे. ती मजबूत झाल्याशिवाय मराठी माणूस आणि मराठी राज्य मजबूत होऊ शकत नाही. हे सगळेच त्यात आहे. तिसरे म्हणजे या राज्यातील सर्व बोलीभाषांतील शब्दांचा स्वीकार आपण केला पाहिजे. जगातील नवनवीन संज्ञांचा स्वीकार करण्यासाठी एक विज्ञान कोष निर्माण करण्याची गरज आहे. ....

( यानंतर श्री. सरफरे .....पीपी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

आणि आपण एक गोष्ट करावी की, आपले जे शासन निर्णय निघतात, जी.आर. निघतात ते परिभाषेच्या पुस्तकातील शब्द बघून लिहिले पाहिजेत हा आग्रह आपण सोडला पाहिजे. त्या शब्दांचा अर्थ आपल्या शासकीय अधिकाऱ्यांना कळत नाही. त्यामुळे ते शब्द आपण गाळावेत. कारण त्याचा अर्थ कळत नसल्यामुळे त्यामधून गैर अर्थ निर्माण होतो. आणि त्यामुळे त्या जी.आर. ची अंमलबजावणी होत नाही. अंमलबजावणी न होण्याचे तेही एक कारण आहे. तेव्हा लोकभाषेमध्ये शासन व्यवहार निर्माण व्हावा, तो आपण तयार केला पाहिजे. केवळ व्यवहार कोष नाहीतर शासन व्यवहार कोष लोकभाषेमध्ये निर्माण झाले पाहिजे. आज मराठी ही बाजारची भाषा व्हावयाची असेल तर त्या पध्दतीने आपण भाषेचा विकास केला पाहिजे. आज इंग्रजी, गुजराथी आणि हिंदी या बाजारच्या भाषा आहेत. त्या भाषा म्हणून कां टिकल्या आहेत? कारण त्या वाकल्या आहेत, त्या लवचिक आहेत म्हणून सर्वांना संभाळून घेतात. आपण मराठी भाषा संकुचित केली. मराठी कोण, हिंदू मराठी,.हिंदू मराठी कोण? तर पुढारी मराठी. पुढारी मराठी कोण? तर फक्त सदाशिव पेठेतील मराठी. त्यामध्ये दलित गाळले, बौध्द गाळले, जैन गाळले, मुस्लिम गाळले, ख्रिश्चन गाळले, आदिवासी गाळले ते मराठी नाहीत असे आपण गृहीत धरतो. मराठी फक्त आम्ही, सदाशिव पेठेने ठरविलेले मराठी इतकी संकुचित व्याख्या केली आहे. कोकणातील मुस्लिमांची मातृभाषा मराठी आहे, खानदेशातील लोकांची भाषा अहिराणी व मराठी आहे, वसईच्या ख्रिश्चनांची भाषा मराठी आहे. अहिराणी भाषेमध्ये सुंदर सुंदर शब्द आहेत. इतकी ही भाषा समृध्द असल्यामुळे तीन-चार राज्यांमध्ये बोलली जाणारी भाषा असून ती मराठीची भगिनी भाषा आहे. तिला स्वतंत्र आब आहे, स्वतंत्र वैभव आहे. बहिणाबाईंच्या माध्यमातून मराठी भाषेला जेवढे वैभव प्राप्त झाले आहे, तेवढे खचितच अन्य कुणी करुन दिले असेल. तेव्हा आपण ते स्वीकारले पाहिजे एवढीच माझी विनंती आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की, सभागृहाने हा ठराव संमत करावा एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

ठराव प्रस्तुत झाला.

**तालिका सभापती (श्री. भास्कर जाधव)** : माननीय सदस्य श्री. कपिल पाटील आपण चांगले भाषण करीत होता, त्यामुळे मी आपणास मध्ये थांबविले नाही. परंतु आपल्या माहितीकरिता मी सभागृहाचे नियम सांगतो. या प्रस्तावावरील चर्चेकरिता अर्ध्या तासापेक्षा जास्त वेळ देण्यात येणार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

**तालिका सभापती**...

नाही. तसेच, कोणत्याही माननीय सदस्यांना या प्रस्तावावर 5 मिनिटांपेक्षा अधिक बोलता येणार नाही. आपण अतिशय चांगल्या प्रकारे 42 मिनिटे भाषण केले. धन्यवाद.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी अशासकीय ठराव क्रमांक 108 याठिकाणी मांडला आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. भाषा ही क्लिष्ट असावयास नको, ती समजायला सोपी असली पाहिजे हा त्यामागचा उद्देश आहे.

भाषा म्हणजे विचारांचे वहन आहे. तुम्ही शब्द कोणते वापरता हे महत्वाचे नाही. समोरच्या माणसाला भाषेतून तुमच्या भावना कळल्या पाहिजेत. या प्रसंगी मला दोन कविता आठवतात. माधव ज्युलियन यांची एक कविता आहे, "मराठी असे आमची मायबोली,जरी ती आज राजभाषा नसे". दुसऱ्या एका कविचे नाव आठवत नाही. गेल्या दोन-तीन वर्षापासून ती कविता ऐकावयास मिळाली आहे. "मराठी नसे आमची मायबोली,जरी ती आमची राजभाषा असे"
त्यामुळे भाषा ही अत्यंत महत्वाची आहे. सर्वात महत्वाची मातृभाषा आहे. जरी आपण भाषेचा विचार केला तरी खानदेश, विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात प्रत्येक 15 ते 20 किलोमीटरवर भाषा बदलते, बोली बदलते. अशी महाराष्ट्रात नाहीतर अनेक राज्यांमध्ये हीच परिस्थिती आहे. जळगाव जिल्हयात दोन भाषा आहेत. एक अहिराणी तर दुसरी खानदेशी भाषा. मी ज्याठिकाणी रहातो तो अहिराणी पट्टा आहे. त्यानंतर भुसावळ, जळगाव, यावल, रावेर या भागात खानदेशी भाषा आहे. ती देखील समृध्द आहे. बहिणाबाई म्हणतात की, "अरे माणसा, माणसा कधी होशील माणूस, माणसाचा झाला काणूस". त्या स्वत: शिकलेल्या नव्हत्या.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी . . . .

त्यांना सही देखील करता येत नव्हती. पण त्यांचे शब्दांवर किती प्रभुत्व होते हे सांगावयास नको. शब्दाला केवळ अर्थ नसतो तर शब्दाला गंध असतो, शब्दाला सुगंध असतो. शब्दांमध्ये भावना असतात, शब्दामध्ये विवेक असतो. शब्दाला पेहेराव असतो, शब्दाला चेहेरा असतो. अशा पध्दतीने शब्द वापरत असताना ते क्लिष्ट नसावेत ही अत्यंत महत्वाची बाब आहे. मला या राज्याचा सामान्य प्रशासन विभागाचा मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. तसेच याठिकाणी माननीय आदिवासी विकास मंत्री डॉ.विजयकुमार गावित साहेब उपस्थित आहेत.ते देखील त्यावेळी या खात्याचे मंत्री होते. पण आम्ही एक काम करु शकलो नाही आणि ते म्हणजे आम्ही जी.आर.ची भाषा सोपी करु शकलो नाही. ज्याअर्थी असे-असे-असे आहे, त्याअर्थी तसे-तसे-तसे आहे. पण याचा नेमका अर्थ काय ? जर तुम्ही दोन वकिलांकडे जी.आर.घेऊन गेलात, तर ते त्याचा वेगवेगळा अर्थ सांगतील. इतकी ही भाषा क्लिष्ट आहे.

सभापती महोदय, आज तीन शब्द फार परवलीचे झालेले आहेत. सरकार मध्ये जी.आर. हा शब्द महत्वाचा आहे. अधिकाऱ्यांसाठी सी.आर.हा शब्द महत्वाचा आहे आणि गृह विभागासाठी एफ.आय.आर. हा शब्द महत्वाचा आहे. आमच्या माणसांना जी.आर.म्हणजे काय ते समजते. माझ्या जिल्हयामध्ये, तालुक्यांमध्ये आदिवासी गावे भरपूर आहेत. तेथील माणसाला जी.आर. हा शब्द समजतो. पण त्याच्याऐवजी दुसरा शब्द असेल तर त्याला समजत नाही. मात्र ते लोक विचारतात की, आमदारसाहेब, अमुक जी.आर.निघाला आहे काय ? पण जी.आर.हा शब्द इंग्रजी आहे. त्याला मराठीतील एक चांगला शब्द दिला पाहिजे आणि आज तसा शब्द आहे पण तो त्या माणसाच्या लक्षात येत नाही. तेव्हा भाषा सोपी असणे हे अत्यंत महत्वाचे आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना सांगू इच्छितो की, व्याकरण तितके महत्वाचे नाही. पण थोडेफार व्याकरण देखील महत्वाचे आहे. आम्ही महाविद्यालयामध्ये असताना "पुष्पांच्या सहवासात" यासंबंधात एक मराठीमध्ये निबंध लिहिण्यासाठी प्रश्न आला होता. आमच्या एका मित्राने सरळ लिहिले की, मला एक पुष्पा नावाची मैत्रिण होती. सकाळी काय केले ? कोणत्या हॉटेलमध्ये जेवण केले ? रात्री कोणता सिनेमा पाहिला ? वगैरे. माझ्या त्या मित्राला अनुस्वाराचा अर्थ समजला नाही. पण जरी अनुस्वराचा अर्थ समजला नाही तरी चालेल, मात्र जीवनाचा अर्थ समजला पाहिजे आणि जीवनाचा अर्थ समजण्यासाठी भाषेचा अर्थ समजणे हे देखील तेवढेच महत्वाचे आहे.1960 साली आपण भाषा

. . . .2 क्यु-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी . . . .

संचालनालय सुरु केले. तेव्हा ही भाषा समृध्द, संपन्न करण्याच्या बाबतीत विचार केला. ही भाषा जास्त सोपी कशी होईल हा सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांचा हा ठराव आणण्यामागचा विचार आहे. भाषा सोपी व्हावयास पाहिजे आणि ती सहजपणे समजली पाहिजे. आपण याठिकाणी एक वाक्य उच्चारले की, "भाषा शोषणाचे यंत्र झाली आहे." ज्यावेळी इंग्रजी भाषा वापरली जात असेल, तेव्हा मी हे समजू शकतो. तसेच इंग्रजी भाषेचा अंमल असताना शोषण होत असे. आज भाषा शोषणाचे यंत्र नाही. पण भाषा सहजतेने समजून, त्यातील नेमका विचार काय आहे ? हे समजणे अत्यंत महत्वाचे आहे आणि त्या दृष्टीकोनातून . . . .

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आज आपण जी भाषा स्विकारलेली आहे आणि शासन व्यवहारामध्ये जी भाषा वापरली जाते, ती भाषा शोषणाचे यंत्र बनलेली आहे. तसेच जी तथाकथित मराठी भाषा मान्यता पावलेली आहे, ती देखील शोषणाचे यंत्र बनलेली आहे या अर्थाने मी ते वाक्य म्हटलेले आहे.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, ठीक आहे. मी काही तुमचा मुद्दा खोडत नाही. परवा एका वृत्तपत्रामध्ये असे आले होते की, आपण गॅलरीला "दीर्घा" असे नाव दिलेले आहे. ते चुकीचे आहे असे मला वाटत नाही. "दीर्घा" म्हणजे काय ? हे समजण्यासाठी आपल्याला चार-आठ दिवस लागतील.

**तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव)** : आज सगळीकडे "कक्ष" असे लिहिण्यात आलेले आहे.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, जेव्हा नवीन शब्द वापरात येतात, तेव्हा ते समजून घेण्यासाठी आपल्याला थोडा उशीर लागतो. पण नवीन शब्दच येऊ नयेत असे म्हणणे देखील तेवढे योग्य होणार नाही.म्हणून मी आजच्या प्रसंगी एवढेच सांगतो की, भाषेची समृध्दी, भाषेची संपन्नता, भाषेच्या माध्यमातून येणारे विचार आणि अजून ही भाषा समृध्द करावयाची असेल तर मराठी न्यायदानाची भाषा झाली पाहिजे, ती तंत्रज्ञानाची भाषा झाली पाहिजे, ती विज्ञानाची भाषा झाली पाहिजे, ती व्यापाराची भाषा झाली पाहिजे, ती उद्योगाची भाषा झाली पाहिजे, ती व्यवहाराची भाषा झाली पाहिजे.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ....

हे सर्व करीत असताना जनता आणि सरकार यांच्यातील अंतर कमी करावयाचे असेल तर शासनाची भाषा ही सोपी आणि सरळ असली पाहिजे. जर कायदाच समजला नाही तर त्यामुळे होणारे परिणाम आपल्याला माहीत आहेत. या ठिकाणी एक चांगला मुद्दा सन्माननीय सदस्यांनी मांडलेला आहे. महाराष्ट्राच्या मराठी राज्य व्यवहार कोषाचे क्लिष्ट स्वरुप बदलून लोकभाषेवर आधारित राज्य व्यवहार कोष तयार करण्यात यावा ही चांगली कल्पना आहे. आज आपल्या महाराष्ट्रामध्ये किमान 10-12 तरी लोकभाषा आहेत. प्रत्येक लोकभाषेतून काय घेता येईल ते घेण्याचा प्रयत्न शासनाने केला पाहिजे. माननीय मंत्रिमहोदय डॉ. विजयकुमार गावित या ठरावाला उत्तर देणार आहेत. मी त्यांना सांगेन की, भाषा किती सोपी होईल, किती सुलभ होईल, त्याचा अर्थ समजावण्यासाठी कोणाची आवश्यकता पडणार नाही हे पाहणे आवश्यक आहे.. आपल्याला भाषेचा अर्थ समजत नाही म्हणून ॲडव्होकेटकडे जावे लागते. ॲडव्होकेटकडे जावे लागू नये. केस वगैरे असेल तर ॲडव्होकेटकडे जावे लागेल ही गोष्ट वेगळी आहे. परंतु कायद्याची भाषा सुलभ असली पाहिजे. जी.आर.चा अर्थ इतका सुलभ असला पाहिजे की तो सहज समजला पाहिजे. म्हणून यातील क्लिष्टता कमी करण्याच्या संदर्भात शासनाने विचार करावा. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी अत्यंत चांगला ठराव या ठिकाणी आणला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ SBT/

डॉ. विजयकुमार गावित ( आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "महाराष्ट्राच्या मराठी राज्य व्यवहार कोषाचे क्लिष्ट स्वरुप बदलून लोकभाषेवर आधारित राज्य व्यवहार कोष तयार करण्यात यावा" यासंदर्भातील अशासकीय ठराव या सभागृहामध्ये मांडलेला आहे. 1960 साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. त्यानंतर आपल्या राज्याची कोणती तरी राज्यभाषा असली पाहिजे म्हणून राज्यभाषा अधिनियम संमत केला. अधिनियम संमत केल्यानंतर महाराष्ट्रामध्ये मराठी भाषा ही राज्यभाषा ठरविण्यात आली. महाराष्ट्राचे क्षेत्रफळ सर्वसाधारणपणे 3 लाख 7 हजार 713 चौरस किलोमीटर आहे आणि सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांनी सांगितल्याप्रमाणे 10-10 किलोमीटरवर सातत्याने भाषा बदलत जाते. त्यामुळे खूप भाषा झालेल्या आहेत. प्रत्येक भागात वेगवेगळ्या बोलीभाषा आहेत आणि त्या त्या ठिकाणी ती भाषा निश्चितपणे श्रेष्ठ आहे. जर 10-10 किलोमीटरवर भाषा बदलत असेल तर सर्वांना समजणारे शब्द, सर्वांच्या व्यवहारात वापरात येणार शब्द ठरविणे हे कठीण काम आहे. ते तेवढे सोपे काम नाही. म्हणून शासनाने असे ठरविले की एक भाषा सल्लागार मंडळ असावे. त्यादृष्टीने भाषा संचालनालयाची स्थापना करण्यात आली. त्याच्या माध्यमातून जे वेगवेगळे शास्त्रज्ञ असतील, जे भाषेमधील तज्ज्ञ असतील त्यांच्या मंडळाने मराठी भाषा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तज्ज्ञांना मार्गदर्शनाखाली त्यांनी हे केले. खूप प्रयत्नानंतर त्यांनी अशी परिभाषा तयार करण्याचा प्रयत्न केला. ही परिभाषा निर्माण करीत असताना लोकांना सहज समजावे यासाठी त्यांनी लोकांना सहज समजतील असे जास्तीत जास्त संस्कृत भाषेतील शब्द वापरले. तसा त्यांनी प्रयत्न केला. भाषा तयार करीत असताना शिक्षण क्षेत्रामध्ये, व्यवहारामध्ये तसेच सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे वैज्ञानिक शब्द असतील, तांत्रिक शब्द असतील ते घेत असताना सहज समजणारे शब्द आले पाहिजेत. मी सांगितल्याप्रमाणे 10-10 किलोमीटरवर मोठ्या प्रमाणावर भाषा बदलत असेल तर तसे करणे फार कठीण आहे. तसा प्रयत्न करुन आपण ही भाषा निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित....

मला वाटते की, वेळोवेळी आवश्यकतेनुसार असे बदल भाषा संचालनालयाने केलेले आहेत. भाषा सल्लागार मंडळ आता स्थापन होईल. ते स्थापन झाल्यानंतर ज्या काही अडचणी आहेत त्या शासनाच्या माध्यमातून सोडविल्या जातील. हे मंडळ निर्माण झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केले आहेत ते मंडळाच्या माध्यमातून सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल. सर्व बोली भाषांचे मराठीत रुपांतर करणे तेवढे सोपे काम नाही. कारण आपल्याकडे एवढया भाषा आहेत की त्यामुळे ते कठीण काम आहे असे वाटते. तरी सुध्दा शासन त्याबाबत निश्चित विचार करील. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी आपला अशासकीय ठराव मागे घ्यावा अशी विनंती मी त्यांना विनंती करतो.

श्री.कपिल पाटील : सन्माननीय मंत्रिमहोदयांच्या भावना व अडचणी मी समजू शकतो. त्यांच्यावर अचानकपणे जबाबदारी आल्यामुळे त्यांची अडचण झाली असावी. तथापि, त्यांनी असेही सांगितले आहे की, सध्या भाषा सल्लागार मंडळ अस्तित्वात नाही ते मंडळ लवकर स्थापन करण्यात येणार आहे. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. ते मंडळ स्थापन झाल्यानंतर या कामाला गती द्यावी. बोली भाषेसंबंधी मंत्रिमहोदयांनी उल्लेख केला आहे. मराठी विकास संस्थेकडे अशा प्रकल्पाचे काम सुरु आहे, त्यासाठी निधीची आवश्यकता आहे. या संस्थेला आवश्यक तेवढा निधी देण्याची आवश्यकता आहे. आता नवीन तंत्रज्ञान विकसित झालेले आहे त्यासाठी लागणारा पैसा उपलब्ध करुन दिला पाहिजे. येत्या अर्थसंकल्पामध्ये यासाठी तरतूद करुन देण्याचा आग्रह धरला जाईल असे आश्वासन मंत्रिमहोदयांनी द्यावे.

डॉ.विजयकुमार गावित : सर्व बोली भाषेचे मराठीत रुपांतर करण्यासंबंधी जो निधी लागेल त्यापैकी जेवढा उपलब्ध करुन देता येणे शक्य असेल तेवढा करुन दिला जाईल.

श्री.कपिल पाटील : लोक व्यवहारातील भाषेला राजभाषेचा दर्जा मिळावा यासाठी सभागृहासमोर मांडण्यात आलेला अशासकीय ठराव मागे घेण्यास सभागृहाची मी अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील बहुसंख्य गावात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण टंचाई व अनेक बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजना.

**मु.शी.**: राज्यातील बहुसंख्य गावात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण टंचाई व अनेक बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजना या विषयावरील श्री.केशवराव मानकर, वि.प.स. यांचा ठराव.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

## सभागृहाच्या कामकाजासंबंधी

**तालिका सभापती ( श्री.भास्कर जाधव )** : आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेला निवृत्त होणा-या सदस्यांचा निरोप समारंभ पुढे ढकलण्यात आला आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 21 जुलै, 2008 रोजी दुपारी 12 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 24 मिनिटांनी सोमवार, दिनांक 21 जुलै, 2008 रोजीच्या दुपारी 12 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही